मुद्रक-प्रकाशक सुशीला पानसे ज्ञानविज्ञान प्रकाशन सोनोरी ३६ चरई ठाणे. मुद्रण ७ बुधवार पुणे २. (२) संगम प्रिंटिंग प्रेस जुना मुंबई रप्रिन्ट मुंबई. संपादक रमेश पानसे सुनील कर्णिक.

म. ग्रं. सं. ठाणें.
विषय काव्य
सं. क्र. २३५५

# अनुक्रमणिका

अव्यक्त नंदा आपटे वासंती इनामदार निस्सीम ईझिकेल निरंजन उजगरे मनोहर ओक सुरेश कदम हेमंत कर्णिक कमलाकर कांदळगावकर अर्जुन कांबळे प्रकाश हरी कार्लेकर शशिकला ज. कार्लेकर सतीश काळसेकर अनिल दिगंबर कुलकर्णी अशोक रा. केळकर गोविंद केळकर अरुण कोल्टकर ह. शि. खरात श्रीराम खांडेकर वसंत दत्तात्रेय गुर्जर दिलीप घोलप प्रल्हाद चेंदवणकर प्रफुल्ल चौधरी विजया जहागिरदार तुकाराम जाधव प्रकाश जाधव परेन शिवराम जांभळे सुधा जोशी सु. म. ठाणेकर सतीश तांबे सुरेश दलाल फ्रान्सिस दिब्रिटो किशोर दीक्षित सरिता देवस्थळे चंद्रकांत प्रभाकर देशपांडे वंदना देशमुख गुरुनाथ धुरी अशोक नायगावकर जयंत नेरूरकर विजया पंडितराव तुलसी परब माधुरी परांजपे विजयकुमार पवार ज्योती पाटील राजा पाटील रमेश पानसे सुनीता पुजारी राम बर्डे अशोक बागवे मेधा बापट सुधीर बेडेकर मधुरे नीलकंठ महाजन स. गं. मालशे अंबरीष मिश्र अनंत येवलेकर शंकर रामाणी पुरुषोत्तम शिवराम रेगे रवींद्र दामोदर लाखे अजित वाकडे वसंत वाहोकार शंकर वि. वैद्य इब्राहीम उस्मान शहा गिरीश शिरसाळकर राजा सरनोबत राजन साटम शरद साटम पोपट सातपुते गुरुनाथ सामंत अशोक सोनवणे वा. रा. सोनार शोभना क्षीरसागर

पागनं
कृ. श्र
तुळशी
REFBK-0022364
REFBK-0022364

REFBK-0022364

# अंधश्रद्धा

लघु-अ-नियतकालिक. अंक केवळ खाजगी वितरणासाठी आणि विनामूल्य. फक्त पोस्टेज आणि इतर अनुषंगिक खर्चासाठी किमान चार रुपये देणगी पाठवावी.

प्रकाशक–मुद्रक . सुशीला पानसे, ज्ञानविज्ञान प्रकाशन, सोनोरी, ३६, चरई, ठाणे ४००६०१. मुद्रणस्थळ : ज्ञानविलास छापखाना, २७ बुधवार पुणे २. मुखपृष्ठ : अक्षरांकन: परमानंद शेलार, रेखांकन : पोपट सातपुते. संपादक : रमेश पानसे, सुनील कर्णिक.

अंक १/१० जानेवारी १९७६




# सत्तर वर्षांपूर्वीचे हस्तलिखित लघुनियतकालिक : ' विश्व '

—डॉ. स. गं. मालशे

हस्तलिखित हा एक हौसेचा मामला, शाळकरी मुलांचा नसता उद्योग या दृष्टीने सामान्यतः त्याकडे पाहिले जाते. पण असा उपेक्षेचा सूर सोडून द्यावा लागावा, असे अपवादभूत प्रयत्नही आढळतात. प्रसिद्ध विनोदी लेखक वि. आ. बुवा हे अनेक वर्षे नामवंत लेखकांच्या साहित्यानिशी, उत्तम सजावटीनिशी मोहोरदार हस्ताक्षरात एक वार्षिक काढीत असत. अशाच धर्तीचा एक गंभीर उपक्रम सत्तर वर्षांपूर्वी झाला होता, हे नुकतेच माझ्या पाहण्यात आले. हा उपक्रम म्हणजे ' मनोरंजक पुस्तकमाला, भोर ' यांच्यामार्फत निघालेले लघु हस्तलिखित षाण्मासिक, ' विश्व.'

' विश्व ' या हस्तलिखिताचे एकत्र बांधलेले पहिल्या वर्षाचे दोन अंक मला अलीकडेच उपलब्ध झाले आहेत. पहिला अंक जानेवारी १९०७ व दुसरा जुलै १९०७ चा असून दोन्ही अंकांची मिळून डेमी आकाराची ९६ (४८+४८) पृष्ठे आहेत. ' कीं हे शब्दरत्नांचे सागर । कीं हें मुक्तांचें मुक्त सरोवर । नाना बुद्धींचे वैरागर । निर्माण झाले ॥ ' ही कविप्रशस्ती दोन्ही अंकांच्या प्रारंभी उद्धृत केलेली आहे. एकंदरीत हे हस्तलिखित केशवसुतोत्तर काळातील साहित्यकारण व लो. टिळकप्रणीत जहाल राजकारण यांचे प्रतिनिधीभूत ठरणारे आहे.

पहिल्या अंकातील संपादकीयात हस्तलिखिताच्या उपक्रमाचे हेतुकथन आलेले आहे. त्याचा आशय असा : शिक्षणप्रसार बराच होत असला तरी त्याचे परिणाम मर्यादित लोकांपर्यंतच दिसून येतात. अज्ञानांधकारात असलेल्यांना सूज्ञ करण्यासाठी ' विश्व ' काढण्यात येत आहे. ' विश्व 'मध्ये विचारस्वातंत्र्य व मतस्वातंत्र्य यांना वाव मिळेल; या दृष्टीने सुधारक व सनातनी, जुन्या व नव्या लेखकांनी लेखन करावे, लेखकाला उपेक्षेसारखे दुसरे भय नाही, तेव्हा रसिकांनी आपले मतभेदही अवश्य कळवावे, त्यांचे स्वागतच होईल.

सर्वसामान्य मुद्रित मासिकात जी सदरे देण्याचा शिरस्ता आहे, तशीच सदरे 'विश्व'मध्ये आहेत. त्यात गद्यपद्यात्मक स्फुट लेखन, उत्कृष्ट उतारे, वाचकांचा पत्रव्यवहार, जाहिराती, पोच व अभिप्राय, 'सार व विचार' म्हणून स्फुटे अशी सर्व प्रकारची विविधता आणलेली आहे. दोन अंक पूर्ण होताच 'अंकासोबत अनुक्रमणिका व मुखपृष्ठ पाठविले आहे, पुस्तके बांधावी' अशी सूचना दिलेली आहे, तसेच शेवटच्या पृष्ठावर 'विश्व'ची जाहिरातही आहे. ती अशी : वरील नावाचे षाण्मासिक–पुस्तक भोर येथे दर जानेवारी व जुलै महिन्यात मनोरंजक पुस्तकमालेतर्फे प्रसिद्ध होते. वर्षाची वर्गणी ट. ह. सह ८८ (आठ आणे) आहे. ग्राहकांनी खालील पत्त्यावर पत्रव्यवहार करावा.' मॅनेजर म्हणून 'वामन आबाजी पाटणकर' यांचे नाव दिलेले आहे. हस्ताक्षरावरून या दोन्ही अंकांचे लेखन कै. ना. म. भिडे यांनी केलेले असावे. हे हस्ताक्षर एकटाकी, तिरपे, अत्यंत सुवाच्य व वळणदार आहे. 'इंद्रधनुष्य' या नावाचा भोरच्या भिडेकुटुंबियांच्या निवडक लेखांचा एक संग्रह प्रसिद्ध झालेला आहे. (प्रका. त्र्यं गो. भिडे, कल्याण, १९६४), त्यात यासंबंधी उल्लेख आढळला, तो असा : 'भाऊ (ना. म. भिडे) व नाना (गो. म. भिडे) यांनी विद्यार्थीदशेतच 'विश्व' नावाचे एक स्वतंत्र व 'भाषांतर' नावाचे दुसरे अशी हस्तलिखित नियतकालिके काही वर्षे चालविली होती' (पृ. १७८). याच पुस्तकात भिडेमंडळींची जी माहिती दिलेली आहे, तीवरून हे मासिक काढले, तेव्हा ना. म. भिडे हे बावीस तर गो. म. भिडे हे वीस वर्षांचे होते, तसेच 'विश्व' चे मॅनेजर श्री. वामनराव पाटणकर हे या दोघांचे आतेबंधू होते, असे ठरते.

साहित्य व राजकारण यांना वाहिलेल्या या षाण्मासिकाच्या दोन्ही अंकात प्रारंभी ईशस्तुतीपर कविता आहेत. तसेच माधव (मा. के. काटदरे) कवीच्या 'एक फूल' व 'कवीची विनवणी' या कविता आल्या आहेत. शिवाय 'देशभक्त लाला लजपतराय' ही 'सिंधुसुता' या लेखक भगिनीची एक कविता असून तीत 'लाला लजपतराय तुजला श्री रमेश यशस्वी करो' हा मंत्र आद्याक्षरांतून गुंफलेला आहे. कवितांचा दर्जा फारसा स्पृहणीय नाही.

यात साहित्यविषयक लेखन वरेच आले आहे. यातला 'कवी आणि कवित्व' (बहुधा ना. म. भिडे यांनी लिहिलेला) हा लेख दोन्ही अंकांत-मिळून पूर्ण झालेला आहे. त्यात सत्काव्याची व नीरस काव्यांची (हीच आधिक्याने) उदाहरणे देऊन काव्यविषयक रास्त कल्पना मांडण्यात आलेली

आहे. 'आमचे संस्कृत कवी' या सदरात 'कालिदासा'वर एक लेख आलेला आहे; पण तो छोटेखानी आहे. माधव कवीच्या 'काव्य मकरंद' या पहिल्यावहिल्या काव्यसंग्रहावर दहाबारा ओळींचा अभिप्राय आहे; त्यात 'केशवसुतांचे नाव ( प्रस्तुत कवी ) चालवील' असा उल्लेख येतो. ह्या उल्लेखाबाबत भावी काळाचा कौल जरी उलटा मिळालेला असला; तरी मराठी कवितेचे मानदंड केशवसुतांना मानण्यामागे जी जाण दिसून येते, ती १९०६ साली तरी दुर्मिळच म्हणावी लागेल.

या दोन्ही अंकांतील राजकीय मजकूर अधिक जिवंत व मौलिक स्वरूपाचा आहे. तत्कालीन इंग्रज सरकारची 'वंदे मातरम्' या गीतावर वक्रदृष्टी झालेली होती; त्यासंबंधातील 'वंदे मातरं' ( ले. गो. म. भिडे ) हा वाचनीय लेख आहे. 'साम्राज्यमद आणि स्वातंत्र्यप्रियता' हा त्याच लेखकाचा दुसरा लेख आहे. त्यात सत्तांध रोमन लोकांनी कार्थेजचे स्वातंत्र्य नष्ट करून त्या लोकांना कसे नेस्तनाबूत करून टाकले, त्याचे हृदयाला पीळ पाडणाऱ्या भाषेत वर्णन केलेले आहे. स्वदेशाभिमानाची व त्यागाची शिकवण हाच त्या लेखाचा हेतू दिसतो. लो. टिळकांनी कलकत्त्याच्या काँग्रेसच्या वेळी 'टेनेट्स् ऑफ् द न्यू पार्टीं' म्हणून एक ऐतिहासिक भाषण केले होते. 'विश्व'च्या दुसऱ्या अंकात या भाषणाचे वीस पानी प्रतिवृत्त गो. म. भिडे यांनी दिलेले आहे. धैर्यमेरू टिळकांच्या निर्भय व्यक्तित्वाचे व राजकीय दूरदृष्टीचे दर्शन घडविणारे असेच हे भाषण आहे. हे भाषण मराठीत अन्यत्र छापलेले नाही. (सांगण्यासारखी गोष्ट म्हणजे केसरीसंस्थेने 'समग्र टिळक वाङ्मयां'त घालण्यासाठी प्रस्तुत भाषण माझ्या संग्रहातील 'विश्व' वरूनच उतरवून घेतले आहे.)

'विश्व' मासिक पुढे किती वर्षे चालले हे सांगता येत नाही. ते बहुधा तेथेच थांबले असावे. आपले लिखाण प्रथितयश मासिके छापीत नाहीत, म्हणून काही ते निघालेले दिसत नाही. त्यात चित्रांची सजावट वा विनोदाची पेरणी मुळीच केलेली नाही. मात्र गांभीर्य व नेटकेपणा यांमुळे त्याला एक खास व्यक्तित्व लाभलेले आहे, तेच आपल्या डोळ्यांत भरते व मनात घर करून राहते. असे हे 'विश्व' हे मनाला देशभक्तीची आग लागलेल्या तत्कालीन तरुणांच्या राष्ट्रीय व साहित्यिक आकांक्षांचे व जिद्दीचे प्रतीकच म्हणता येईल. या लघु हस्तलिखिताची अपूर्वाई त्यातच आहे.

# चार कविता : वास्को पोपा; अनुवाद : मनोहर ओक

**वास्को पोपा** (Vasko Popa) : युगोस्लाव कवी. जन्म १९२२. याने दुसरे महायुद्ध आपल्या किशोरवयात पाहिले. त्या अनुभवाच्या खुणा त्याच्या कवितेत जागोजाग आढळतात.

या कवीचे एक वैशिष्ट्य असे की एखादी सुटी कविता लिहिण्याऐवजी काही कवितांचा मिळून एक गुच्छच (' सायकल पोएम्स ') निर्माण करणे तो अधिक पसंत करतो. आशय अधिकाधिक नेमकेपणाने व्यक्त करणे व त्याची अनेक अंगे रेखाटणे यासाठी पोपाची ही पद्धत अत्यंत उपकारक असल्याचे समीक्षकांनी लिहिले आहे. प्रस्तुतच्या चार कविताही याच प्रकारच्या आहेत.

पोपाच्या निवडक कवितांच्या इंग्रजी अनुवादांचा संग्रह पेंग्विनतर्फे १९६९ मध्ये प्रसिद्ध झाला आहे.



## १. घोडा

बहुधा
तो आठपाई असतो

त्याच्या जबड्यांत
माणूस रहायला आला
आपल्या जगाच्या चौ दिशांतून
त्याने आपले ओठ चावून बंबाळ केले
त्याला खायचेवते
मक्याचे देठ चुसून
ही सारी फारा दिवसांची गोष्ट

त्याच्या देखण्या डोळ्यांत
उदासता
गिरकी घेऊन लय पावलेली

अत्यंत असलेल्या रस्त्यावरून रखडत
पाठीशी या जगाचा गाडा घेऊन
त्यालातं चाललंच पाहिजे

## २. गाढव

कधी कधी तें बरळतं
लोळतंसुद्धा धूळींत
कधी–कधी
मगच, तें तुमच्या नजरेंत भरतं

इतर वेळेस
तुम्ही पाहतां त्याचे केवल-कान
एका ग्रहाच्या मानेवर
पण तें केव्हांच
अंतर्धान पावलेलं असतं

## ३. बदक

बदसूर चालींत झोके घेत धुळींतून
मासे जिथे नसतात हंसून
चालतं तें आपलीं जुवारं
पाण्याच्या अस्वस्थतेनं भरून

बगरूळ
तें चालतं सावकाश
मनांत असलेल्या वेळूच्या बनांत
पोचण्यास फक्त अवकाश

छे !
छे ! छे !! आतां परत
आरसे नांगरत तें कधीही
चालूं शकणार नाही

## ४. डुक्कर

जेव्हां नरड्याखाली ती रानटी सुरी
जाणती झाली
तेव्हां लाल पाटावर
सडे-तोड झाली खेळाची

आणि त्या संध्याकाळीं
तुर्‌तुर्‌त आनंदाचे भरांत
चिखलाच्या गप्पगारींतून अंग उसवून
शेतांतून परतल्याचा
त्याला खेद झाला
त्वरेच्या त्या पिवळ्या दाराशी

फ्रान्सिस दिब्रिटो

## माझे हात मला :

माझे हात मला झालेयत जड
तुझे हात हाती घेऊ कसा ?

माझे ओझे मला झाले आहे भारी
तुझा भार सये वाहू कसा ?

माझा जाता तोल मला सावरेना
तुझा समतोल राखू कसा ?

माझ्या वर्तुळाचा परिघ इवलासा
त्यात प्रिये तुला घेऊ कसा ?

माझ्या ग नौकेला शीड ना सुकाणू
पैलतिरी तुला नेऊ कसा ?

अंधारी अंधार अंतरी बाहेरी
तुझ्या हाती दीप देऊ कैचा ?

इब्राहीम उस्मान शहा

## मैफील

धुंदफुंद कणाकणांतून
मैफील जमून गेली आहे.
नितळ गळ्यांतील शब्दसजावट
भाव खुलवून गेली आहे.

धुंद पुनव, चांदणंही शुभ्र
ठिबकणारं दुधाळ
गहिऱ्या दर्हिवरातून दर्वळता
प्रकाश झुलत-डुलत आहे.

रात्र सरे, भान नाही
शिणलीं गात्रें, मन नाही
उधळल्या सुरांची पखरण
पहाटवारा मिरवीत आहे.

बटमोगरी आवाजाला
साज गहिरा सोनचाफी
मनामनांतून केवडा फुलून
दिशा बहरून गेली आहे.

धुंदफुंद कणाकणांतून
मैफील जमून गेली आहे.
नितळ गळ्यांतील शब्दसजावट
भाव खुलवून गेली आहे.

## कविता : सुरेश दलाल;  अनुवाद : रमेश पानसे

सुरेश दलाल (९–१०–१९३२). गुजरातीमधील मान्यवर कवी. चार काव्यसंग्रह आणि बालगीतांचे सात संग्रह प्रसिद्ध. 'कविता' या काव्यविषयक द्वैमासिकाचे, गेली आठ वर्षे यशस्वी संपादन. 'कविता' हे आजचे गुजरातीमधील लोकप्रिय आणि दर्जेदार द्वैमासिक. काव्याचे वार्षिक संग्रह संपादित करण्याचे, गेली पाच वर्षे कार्य. शिवाय अलिकडेच, जागतिक काव्याचा प्रातिनिधिक संग्रह 'काव्यविश्व' या नावाने संपादित. मराठी कविता गुजरातीमध्ये भाषांतरीत करून लोकप्रिय करण्याचे श्रेय, प्रामुख्याने, सुरेश दलाल यांनाच द्यावे लागेल. पाच टीकाग्रंथांचे संपादकत्व आणि दोन ललितनिबंध-संग्रहांचे लेखनही केलेले आहे.

### अर्थ

खूपच गोष्टी आठवतात; खूपच विसरूनही जातात.
काळही स्वत: स्वत:शी स्पर्धा करीत नाही.
प्रेमाच्या केलेल्या पोकळ गोष्टी
सरत्या रात्रींबरोबरच विरून जातात.
लहान-सहान केलेले उपकार.
मध्यान्हीच्या उन्हासारखे नागडेच फिरतात.

शिशिरातच वृक्षांच्या आठवणी जाग्या होतात; फुलांच्या.
गळल्यानंतरच फुलांनाही उमगतो अर्थ.....
डहाळ्या म्हणजे काय याचा !
मेघांना महत्त्व असते धरतीचे; तेवढे आकाशाचे असत नाही.
येवढ्या लाटा आदळून फुटतानाही
सागराची रेशिम-काळजी घेणे वाळूला कुठे सुचते ?

तू जवळ असताना, माझ्यातच मग्न मी.
तुझे अस्तित्वच नाकारीत गेलो असेन किती वेळा.
आणि आज तर मी मलाच स्वीकारायला नकार देतोय.
तू आज जवळ नाहीस; याचा अर्थच मुळी, की तू आहेसच.
आणि माझ्या इथे असण्याचा अर्थही इतकाच, की मी नाहीच.

वासंती इनामदार

**भावमुद्रा :**

अनेक भावमुद्रा उमटवून
परतीची वाट तूं सुसह्य केलीस;
केलीस शर्थ पहाटेचे दंवबिंदू अक्षय राखण्याची !
मला जातां येईल अशी उन्मनी वाट
तू जपमाळेसारखी भारून ठेवलीस !

.....मी आल्येय्
नवखेपणाच्या कोवळ्या उनकवडशांसह !

इथल्या दरक्षणांच्या
आता साकळत्या रेखा झाल्या आहेत...!
स्वप्नांकित धूळ पिसाटून उठलीय.
ही वाट परतीची नाहीच.
डहुळत्या वाऱ्यांतून आठवणी पेटताहेत...नवोन्मेष !

सावध हो रे ! सावध हो !
माझे शब्द केव्हांपासूनच विझत चाललेले होते !

मेघा बापट

**दुःख :**

माझ्या प्राक्तनाच्या सेवेसाठी
दुःखच सरसावलें !

नयनांतील अश्रूंच्या
ओलाव्यांत गारठलें !
पण तेंच राहिलें एकनिष्ठ
पुंडलिकापरी

त्यानेच सुखाला केलें
उभें विटेवरी !

ऋचा / दहा

सरिता देवस्थळी

**आतून बाहेरून सुकून–विझून :**

पहाटे कशाला उमलतात आठवणी
आपल्या नादावणाऱ्या सुवासासकट ?
दंव-भिजल्या अंगणांत जावं,
तर कांहीच कसं नाही ?
फक्त पोकळ काळोख...
चाहूल लागताच अशी कां सगळी फुलं
परदेशी होऊन जातात ?

उन्हाच्या पाकळ्या सोलता सोलता
किती किती म्हणून छिलून जावी बोटं ?
जळूनच जातं आतलं चांदणं
सुकूनच जातात सगळी कारंजी
असं आतून बाहेरुन सुकून–विझून,
कसं, कसं म्हणून व्हायचं
तान्हुल्या अंकुराची आई ?

अजित वाकडे

**चूक :**

...नाही !
हा अंधार म्हणजे
दिव्यांची चूक नाही
त्यांना तेलवात झालेली नाही.

नाही; नाही !
हे लोक दिवे पेटवायला
विसरलेले नाहीत
कुणीतरी यांना
तेल म्हणून यांच्याच डोळ्यांतलं
पाणी विकलंय !

ऋचा / अकरा

राजन साटम

**गर्भा :**

डोळ्यामध्ये नीज आणखी घेऱ्याभवती फेरा ग,
कडकडली ती वीज आणखी मनमोराचा तोरा गं !

वाणीमध्ये गान पोरीच्या गळी गोडवा गुणगुणतो,
नुरले सारें भान पोरिच्या भाळीं भरला गुलाल ग !

रंग उधळले मंडपांत अन टिपऱ्या ट्रिपट्रिपल्या कानीं,
दंग जाहले सूर मनीं अन टिंबच झालें शरीर ग !

पक्षी नाहले आंत आंत अन लक्षीं न राहे कांही ग,
काळोखाची कोरित नक्षी माता आली हासत ग !

फिरफिर फिरलें गिरगिर गिरलें आत्मीं आली भोवळ ग,
डोळ्यामध्ये नीज आणखी घेऱ्याभवती फेरा ग !

तुळशीदास बेहेरे

**शृंखला :**

ही सदाची शृंखला
बंधनाने ह्या जिवा
रडविते ही कां अजूनि
सोड ना ! आता जरा

खोल वर्तुळात काळ्या,
रंग फिरवुं दे जरा;
मोकळ्या केसांत आतां
माळूं दे ना ! मोगरा

...रक्तिमा चढे न गाली
तेज लोपलें तिचें !
फिरविण्यास मोरपीस
मुक्त हस्त हे कुठे ?

## हॅम्लेट :

विचार
विचार
विचार...!

विचाराने
जे उखाणे
सुटत
नाहीत
ते
अविचाराने
सुटतात
चुटकीसरसे...

टु बी ?
ऑर
नॉट टु बी ?
देऊन
टाकू
हॅम्लेटला.

क्षणभर
थांबव
मनांतिल
हिंदोळा
बसू दे
त्यावर
मला...!

शरद साटम

## एकाकीपण :

एकाकीपणाला शब्द नसतात
आणि
गिचमीड अक्षरें
एकाकीपणाला चार भिंती
किंवा दिशा नसतात
तें वाऱ्याने हलत नाही
किंवा प्रकाशाने उजळत नाही
त्याची पाठ स्वच्छ असते आणि हलकी
आणि उचलूं म्हणणाऱ्याच्या पाठीवर तें
परकं रहातं
एकाकीपण दिसत नाही
माझं त्याला, त्याचं मला
समुद्राचं वाऱ्याला
वाऱ्याचं काडीला
तें धुमसतं गंजीसारखं ओलं
पेटत नाही
धूर गिळून आंतल्या आंत वहिवाट शोधतं विनाकारण
तें माझ्यासारखंच स्वयंभू असतं

# कवितेची कात टाकून

सु. म. ठाणेकर

## अरुण कोलटकर

### टचकन उमलते बेवारशी तृप्ति :

टचकन उमलते बेवारशी तृप्ती
पाण्यांत झुगारलेल्या सिगरेटसारखी.
पिकतात खपतात जन्मांध वांगी
तृष्णाकाठी. स्पर्शजन्य कमळें
एकामागून एक तोडत निळीफोल घोडी जाते
नसानसांत चिवचिवणारी एक व्हिनस नासून जाते

तृप्तीने बाळगलेला विफल तंबाखू
उघडकीस येतो आणि कोणताही वारा
वेचत नाही ते वांझोटे पुंकेसर
निर्वंश भाकणाऱ्या शंभर पाकळ्यांची
कमळें उगवतात मरणप्राय पाण्यावर
असाध्य रावणाच्या मुंडक्यागत दुर्दम्य

मानवी जीवनाची एक गंमत अशी की माणूस सतत स्वत:ला सुधारण्याचा प्रयत्न करीत असतो, अडचणींवर मात करण्याची धडपड करीत असतो आणि त्याची विषयवासना त्याला मागे खेचत असते. बहुसंख्य व्यक्तींच्या बाबतीत हे घडते. त्याच्या सांस्कृतिक जीवनाशी या वासनेचे काहीच नाते नसते–त्या दृष्टीने ती बेवारशीच असते. पण तरीही ती अटळ असते आणि जेव्हा तिची तृप्ती होते तेव्हा समजदार डोळ्यांत टचकन पाणी यावे तशी ती जाणवते. कैफ आणणारी सिगरेट संपल्यावर पाण्यात फेकून देताच ती उमळून यावी तशी मनाची अवस्था होते. कृष्णेच्या काठी जसे वांग्यांचे अमाप पीक येते, आणि पिकणे आणि खपणे याशिवाय काही दृष्टीच त्यांना नसते, ती जन्मांध असतात, तसे या विषय-तृष्णेच्या काठी

पिकणाऱ्या मनुष्यजातीचेही चालले आहे. लोकवाङ्मयातल्या एका गीतात जशी 'हनुमंताची निळी घोडी, येतांजातां कमळें तोडी'त जाते, तशी ही विषयवासनेची घोडी शरीरस्पर्शांतून उमलणारी मनांची कमळे तोडत जात असते. ( त्यामुळेच ती निळी असली तरी निळी-भोर नसते; 'निळीफोल' असते ) आणि याचा परिणाम काय होतो ? तर सर्वांगात लहरणाऱ्या नाजूक प्रेमभावनेचा विचका होऊन जातो.

उमळलेल्या सिगरेटमधील तंबाकू पुंकेसरांच्या पुंजक्यासारखा उघडा झाला तरी वारा त्याला वाहून नेत नाही; कारण तो पुंजकाच वांझोटा आहे. मानवाच्या सांस्कृतिक जीवनात वासनापूर्तीही अशीच वांझोटी, विफल ठरते. त्याचे वैचारिक चैतन्य या विषयवासनेला आपल्याबरोबर नेऊच शकत नाही. पण तरीही ही वासनेची कमळे फुलून येतात अनेक अंगांनी विचारशून्यतेतून. त्यांचा नाश करणे अशक्यच होऊन बसते...

कोलटकरांच्या कवितेची नेहमी आढळणारी वैशिष्ट्ये याही कवितेत आढळतात. अभिव्यक्तीची स्वतंत्र पद्धत; रूढ शब्दयोजनेत किंचित बदल करून नेमका आशय व्यक्त करणे (कृष्णाकाठची वांगी त्यांच्या कवितेत तृष्णाकाठची होतात); पारंपरिक संदर्भ; सिगारेटसारखे स्वतंत्र रूपक यांनी ही कविता लक्षणीय ठरली आहे. 'नसानसांतून चिवचिवणारी व्हिनस नासून जाते' ही अप्रतिम ओळ तर विसरता येणे अशक्य.

---


**अभिप्रायार्थ प्राप्त : जन्मात राहिलो वजा**

दीर्घकाव्य–कल्याण इनामदार. मूल्य दोन रुपये.

प्रकाशिका : सौ. प्रतिभा इनामदार. १२८९ शिवाजीनगर, पुणे ५

# निस्सीम ईझिकेल

## इंग्रजीतून कविता लिहिणारा भारतीय :

## काही वैशिष्टयपूर्ण प्रवृत्ती

कांची किंवा टीकाकारांची नावे न घेता हा लेख लिहिण्याचे मी ठरविले आहे. याचे एक कारण माझा स्वत:चा भित्रेपणा, आणि दुसरे म्हणजे संबंधित लोकांचा विचार. त्यांतल्या बहुतेकांशी माझी ओळख आहे. ओळख नसती तर बरे झाले असते असे या घटकेला वाटतेय. कारण मग असे अवघडल्या-सारखे वाटले नसते, जे बोलायचे आहे ते सरळ बोलता आले असते. पुस्तकांच्या जगातल्या डावपेचांत न गुंतता असे बोलणे हे फार नाजूक, कठीण काम आहे. एखाद्या वाङ्मयकृतीचे निरीक्षण करणे हा उद्योग वरवर साधा वाटला तरी प्रत्यक्षात किती गुंतागुंतीचा असतो हे डोळसपणे वाङ्मय वाचणाऱ्या सर्वांना ठाऊक असेल. बाहेरून दिसतो तितका तो उद्योग सोपा नसतो.

मी स्वत:वर लादलेली जबाबदारी ही इंग्रजीतून कविता करणारा भारतीय कवी कसा आहे हे पाहण्याची आहे. अर्थातच या कामात ज्याप्रमाणे इतरांचे निरीक्षण करायचे आहे त्याप्रमाणे माझे स्वत:चेही करायचे आहे. शीर्षकात सुचविल्याप्रमाणे, मला बोलायचे आहे ते त्याच्या अंगभूत प्रवृत्तींविषयी– म्हणजे बहुतेकांमध्ये सामान्यपणे ज्या प्रवृत्ती दिसतात त्यांच्याविषयी. अपवाद म्हणून जे कवी दिसतात, त्यांच्याबद्दल किंवा त्यांच्या कर्तृत्वाबद्दल मी बोलणार नाही. फक्त काही वेळा विशेष दर्जा किंवा दिशा दाखवणारे म्हणून त्यांचा उल्लेख करीन. दर्जासंबंधी बोलले नाही तर या किंवा इतर कोणत्याही विषयावरील चर्चेला काही अर्थच नसतो असे मला वाटते. म्हणून मी सुरुवात करणार आहे ती दर्जाच्या प्रश्ना-पासूनच.

आपल्याकडे इंग्रजी कवींबद्दल ज्या चर्चा होतात, त्यांतल्या बऱ्याचशा चर्चांचा लक्षणीय विशेष असा की, त्यात एका पातळीवरच्या कवीचे यश आणि दुसऱ्या पातळीवरच्या कवीचे यश यांत काहीच फरक केला जात नाही. उच्च पातळी, नीच पातळी, आणि या दोन पातळ्यांमधील सगळ्या पातळ्या, यांच्यासाठी सारखेच शब्द योजले जातात, टीकेचा एकच सूर लावला जातो, आणि आपण

---

राजस्थान विद्यापीठाने १९७३ मध्ये 'भारतातील इंग्रजी लेखन' या विषयावर भरवलेल्या परिसंवादात वाचलेला निबंध 'ओपिनियन लिटररी क्वार्टर्ली', जानेवारी ७४ मधून साभार अनुवादित.

काव्याच्या आणि ज्ञानाच्या गुणवत्तेबद्दल बोलत आहो असे वरवर दाखवीत प्रत्य[illegible] त्यांच्याबद्दल गोंधळ निर्माण केला जातो. त्यामुळे ' तत्त्वचिंतक ' हा शब्द—[illegible] यांतल्या उत्तम कवींनाही लावताना साशंक व्हावे—अगदी मुक्तपणे सगळ्यांना लावला जातो, जे जेमतेम कवी या पदवीस पात्र आहेत किंवा जे निव्वळ पद्यात रचना करतात अशांनाही.

भारतीय मनातच असे काहीतरी आहे की, जे अगदी साध्या प्रकारचा विचार दिसला तरी त्याला ' तत्त्वचिंतनात्मक ' म्हणून कवटाळते. मी जर एखाद्या कवितेत म्हटले की, प्रामाणिकपणा हेच धोरण उत्तम, किंवा दोन अधिक दोन बरोबर चार, तर माझी खात्री आहे की एखादा टीकाकार आपल्या विद्याविभूषित सिंहासनावरून झटकन उठेल आणि माझी वैचारिक समज, माझे वास्तवतेचे आकलन, माझी संपन्न नीतिमत्ता आणि सत्य व साधेपणा यांच्यावरील माझे प्रेम याबद्दल कौतुक करील.

आपल्या कवीवर याचा जो परिणाम होतो तो पाहण्यासारखा आहे. विद्वत्तेचा बुरखा घालून हे जे गांवढळपणाचे प्रदर्शन चाललेले असते त्यावर वैतागण्याऐवजी तो त्यात भलताच रस घेतो, आणि अशाच प्रकारचे आणखी काही पदरात पडावे अशी इच्छा बाळगतो. तो लवकरच स्वत:ची खात्री पटवतो की, त्याच्याजवळ " बुद्धीचे आणि हृदयाचे जातिवंत गुण "—बुद्धिमंताचे वर्णन करण्यासाठी भारतात हा शब्दप्रयोग प्रचलित आहे— आहेत. परिणामी तो आपल्या काव्यातील तीच तीच स्थळे त्यांच्या असंख्य आवृत्त्या काढून घोळवतो आणि मग हेच ' तत्त्वचिंतनात्मक ' असल्याचे ठरविले जाते. म्हणून मी तरी माझे निश्चित मत नोंदवून ठेवतो की, या विद्यमान कवींमध्ये आणि पूर्वकवींमध्येही, खऱ्या अर्थाने ' तत्त्वचिंतक ' म्हणता येईल असा एकही कवी नाही.

श्री अरविंदांबद्दल बोलायचे तर, त्यांच्या तत्त्वज्ञानाचे मूल्य काहीही असो– त्याबद्दल मला येथे वाद घालायचा नाही–, ते तत्त्वज्ञान त्यांच्या पद्यात काव्य बनण्यास पूर्णपणे असमर्थ ठरते, कारण ते इंग्रजी भाषा मृत, ठोकळ असल्यासारखी वापरतात– त्यांची भाषा ही शेक्सपिअर, मिल्टन, रोमँटिक कवी आणि टेनिसन यांची भाषा असते; विसाव्या शतकातली इंग्रजी भाषा नसते.

मी नावे न घेण्याचे कबूल केले खरे, पण एक उदाहरण देतो. नाहीतर मी उगाच अतिशयोक्ती करतोय असे वाटण्याचा संभव आहे. या उदाहरणाने दोन कामे साधतील. ' तत्त्वचिंतनात्मक ' हा शब्द ' नावीन्यशून्य ' किंवा ' निरर्थक ' या शब्दांच्या ऐवजी कसा वापरला जातो ते याने दिसेल, आणि दुसऱ्यांवर प्रभाव पाडण्यासाठी प्रशस्तिपत्रांचा आधार घेण्याची आपली प्रवृत्तीही उघड होईल. यातली खरी शोकांतिका अशी की दुसऱ्यांवर त्या गोष्टीचा खरोखरच प्रभाव पडतो.

माझा हा कवी एक कॉलेजशिक्षकही आहे. त्याने आपल्या कवितांचा संग्रह प्रसिद्ध केला आहे. फक्त आठच कविता आहेत. त्याला " प्रकाशकाचे दोन शब्द " आहेत. त्यात कवीची तुलना उमर खय्यामशी करण्यात आली आहे आणि त्याला मिळालेली देणगी ईश्वरी असल्याचे म्हटले आहे. भारतीयांच्या इंग्रजी लेखनावरील अधिकारी आणि साहित्य अकादमीचे उपाध्यक्ष, एवढ्या दर्जाच्या व्यक्तीचे प्रास्ताविक आहे. मी अगोदर अंदाज केला होता त्याप्रमाणे कवीचा " तत्त्वचिंतना-कडे कल " असल्याचे त्यांचे म्हणणे आहे. संग्रहाला दोन " अभिप्राय "ही जोडले आहेत– एक एका नामवंत उपकुलगुरूंचा, आणि दुसरा एका " टीकाकारा "चा. शिवाय कवीची स्वत:ची प्रस्तावना आहे, ज्यात तो स्वत.च्या कवितांना " प्रगल्भ, गूढगुंजनात्मक, सूचक आणि अत्यंत संवेदनाक्षम " म्हणतो. याच्यानंतर एका ख्यातनाम प्राध्यापकाची प्रस्तावना. तो संगती, पिसाटपण, शांती, गोंधळ, भक्तियोग आणि कालाची संकल्पना यांनी चार पाने भरतो. नंतर कवी हा " इंग्रजीतून लिहिणारा प्रमुख भारतीय कवी " असल्याचे जाहीर करतो.

या एकूण सहा प्रास्तविकानंतर––त्यात कवीच्या उघडउघड आत्मस्तुतीचाही (ती अर्थात भाबडेपणाने केलेली आहे) समावेश आहे––आपल्याला या प्रमुख कवीचे लेखन वाचायला मिळते :

माणूस धडपडतो शांतीकरता
वस्तुनिष्ठ शांती आणि विषयनिष्ठ शांती
हृदयाची शांती आणि मनाची शांती
आत्म्याची विश्रांती आणि सर्व तऱ्हेची शांती.
माणसाची गडबड आणि गोंधळ निष्फळ आहे
चमत्कार घडवण्याचा त्याचा यत्न कच्चा आहे
त्याच्या हाका आणि दावा यांना मूळ नाही
स्वर्गीय, परमप्रिय शांती मिळण्याजोगे.

कधीकधी असे म्हटले जाते की, एखादे पुस्तक जसे असते तसेच त्याकडे पाहिले पाहिजे; त्याच्याबद्दल तोंड वाकडे करणे किंवा टोमणे मारणे म्हणजेसुद्धा त्याला फार महत्त्व देण्यासारखे आहे. उगाच एका टोकाचा विचार करणे किंवा स्वत:विषयीच्या भ्रामक कल्पना असणे अशातला हा प्रकार असता तर मी हे म्हणणे मान्य केले असते. पण तसे असत नाही. वरचा प्रकारच थोड्याफार फरकाने नेहमी घडताना दिसतो. स्वत: फार मोठे असल्याचा समज या ना त्या प्रकारे व्यक्त केला जातो. त्यांच्या लेखी जगातले हेच एकमेव सत्य असते. या कवींमधले असे अगदी थोडे असतील की, ज्यांच्याबद्दल " हा प्रमुख कवी आहे " असे उद्‌गार इतर कवींनी (जे स्वत: अर्थातच प्रमुख असतात) किंवा ख्यातनाम प्राध्यापकांनी काढलेले नाहीत.

खरे सांगायचे तर आपल्याकडे वाचण्याजोगे दुय्यम कवीसुद्धा अगदी थोडे आहेत. काहीनी एखाददोन वाचनीय कविता लिहिल्या आहेत आणि कदाचित आणखी काही लिहितील. यापेक्षा जास्त काही म्हणणे वेडेपणाचे आहे. इंग्रजीत लिहिलेल्या भारतीय कवितेचे जग असल्या वलगनांनी दूषित झालेले आहे.— त्यांनीच टीकेची जागा घेतली आहे. या कवीची खास अशी प्रवृत्ती ही : मला प्रतिभावंत म्हणा, नाहीतर माझ्यापुढून चालते व्हा. मला कलासमीक्षेमधलाही काही अनुभव असल्यामुळे असे म्हणावेसे वाटते की भारतीय चित्रकारांच्या बाबतीतही हीच स्थिती आहे आणि बहुधा आणखी बऱ्याच जणांच्या बाबतीतसुद्धा तसेच असण्याचा संभव आहे. भारतीय म्हणून जन्माला आल्यानेच असे नशिबी येते की काय, हे पाहिले पाहिजे.

थोर असण्याचा प्रयत्न करण्याऐवजी आपण आजच्या अवस्थेत प्रामाणिक आणि वास्तवाला धरून राहण्याचा प्रयत्न केला पाहिजे. ज्यांच्याजवळ खरोखरच काही प्रतिभा आहे असे कवीही संधी मिळताक्षणी स्वत:च्या प्रतिभेला उच्च स्वरात संबोधू लागतात आणि अगदी जाणीवपूर्वक स्वत:च्या प्रतिभेचे कौतुक करतात. उदाहरणार्थ, एक जण आपल्यापेक्षा वयाने लहान असणाऱ्या एका तरुणीला (जी अद्याप पदवीधरही झालेली नसते) त्याच्या कवितेविषयी एका मासिकात लिहिण्यास सांगतो आणि तो लेख चांगला वठावा यासाठी आपल्या कवितेचे एक वैशिष्ट्य " भावोत्कटता " हे असल्याचे नोंदवण्यास आग्रहपूर्वक बजावतो. दुसरा एकजण स्वत:ची पुस्तके स्वत:च प्रकाशित करतो. त्याने गेल्या काही वर्षांत कमीत कमी दहा संग्रह प्रकाशित केले आहेत. प्रत्येक संग्रहात स्वत:बद्दल उच्चरवात लिहिले आहे आणि दर वेळी हा सूर जास्त जास्त चढत गेलेला आहे.

अशी उदाहरणे देत राहणे कंटाळवाणे होईल हे खरे आहे; पण 'जगात सगळीकडे असेच घडत असते' असे मानून सुटकेचा नि:श्वास टाकणे योग्य नाही. अशा प्रकारच्या उद्योगांनी इंग्रजी आणि अमेरिकन कवितेवर किंवा ऑस्ट्रेलियन, कॅनेडियन आणि न्यूझिलंडच्या काव्यक्षेत्रावर परिणाम झालेला नाही. भारतातल्या इंग्रजी काव्यक्षेत्रावर तो झालेला आहे आणि त्याचे निश्चित स्वरूपच अजून कोणी स्पष्ट करीत नाही. इतर ठिकाणच्या टीकादृष्टीमुळे तेथे त्याचे स्वरूप स्पष्ट केले गेले आहे. भारतातली इंग्रजी टीका आवश्यक ते मानदंड निर्माण करण्यात कमी पडते आणि त्यामुळे स्पष्टपणा येण्याऐवजी तिच्यात गोंधळच अधिक झालेला असतो.

मी खरा उद्विग्न होतो तो 'प्रमुख' या शब्दाच्या वापराने. मला एक प्रसंग आठवतो. मी एका नव्या काव्यसंग्रहाची चर्चा काही कवींबरोबर करीत होतो. एक जण म्हणाला, " हँ:—हा काही प्रमुख कवी नाही. " बाकीच्यांनी त्याला होकार

दिला. मी म्हटलं की आपल्यातला कोणीच प्रमुख नाही, तेव्हा सगळ्यांनी असा अर्थ घेतला की मी त्यांना ती उपाधी लावण्याचे टाळतोय आणि ती स्वत:ला लागू असल्याचे सुचवतोय. त्यांच्यातला एक जण उपरोधाने म्हणाला, "–अर्थातच तुम्ही वगळून." यावर मी माझे म्हणणे पुन्हा मांडले. त्यावर ते म्हणाले, "उगाच कमीपणा घेऊ नका." सांगण्याचा मुद्दा हा की आम्ही कवींनी स्वत:चे स्वत्वच गमावले आहे. आम्ही काय मिळवले आहे आणि काय नाही हेच आम्हाला ठाऊक नाही. आम्ही तिथे पोचू शकत नाही, कारण आमचा समज आहे की आम्ही अगोदरच तेथे पोचलेले आहोत.

भारतीयांनी लिहिलेल्या इंग्रजी कवितेचे जे प्रातिनिधिक संग्रह आतापर्यंत प्रसिद्ध झाले आहेत ते याच पूर्णपणे भ्रामक वस्तुस्थितीवरच जोर देतात. उदाहरणार्थ, साहित्य अकादमीने 'ए गोल्डन ट्रेझरी ऑफ इंडो–अँग्लिकन पोएट्री' नावाचा संग्रह प्रसिद्ध केला आहे. मी त्याला 'गोल्डन वेस्टपेपर बास्केट' म्हणतो. अगदी अलीकडच्या अहवालाप्रमाणे दोन वर्षांत त्याच्या सात प्रती संपल्या आहेत. या कोरड्या ठणठणीत वाळवंटाचा आढावा लांबलचक प्रस्तावनेत घेतला आहे आणि ते शेकडो फुलांनी आणि अत्यंत मौल्यवान रत्नांनी समृद्ध असल्याचा शोध लावला आहे. संपादकांनी डोळ्यांना जास्तीत जास्त ताण देऊन या दारिद्र्याचे निरीक्षण केले आहे आणि ते संपन्न असल्याचे जाहीर केले आहे.

दुसरा एक संग्रह आहे. तो तर प्रचंड आहे. स्वत:वर कमीत कमी बंधने घालून प्रसिद्ध होणारा असा दुसरा संग्रह नसेल. शिवाय त्यात सादर केलेल्या प्रत्येक कवीने आपल्या काव्यविषयक मूल्यांचे एक निवेदन सादर केले आहे. सोबत त्याचा फोटो, शिवाय कविता. या संग्रहातला 'मुक्तपणा' माझ्या अनुभवातली उदाहरणे देऊन स्पष्ट करता येईल.

'पोएट्री इंडिया'चा संपादक असताना मी मुंबईतल्या एका पारसी तरुणाच्या दोन चांगल्यापैकी कविता स्वीकारल्या होत्या. मी त्याला पत्र पाठविले आणि आम्ही भेटलो. तो म्हणाला की मी यापुढे कविता लिहीन असा संभव नाही. तुझ्याजवळ खरोखरच प्रतिभा आहे असे मी कितीही सांगितले तरी तो ऐकायला तयार नव्हता. मी कविता प्रसिद्ध केल्या. वर ज्या संग्रहाचा मी उल्लेख केला आहे त्यात त्या कविता 'पोएट्री इंडिया'मधून माझ्या परवानगीशिवाय घेतल्या गेल्या. कवीबद्दलची माहिती, त्याचे गुण, त्याचे काव्यक्षेत्रातील कर्तृत्व वगैरे चौकशी न करता त्याच्या कविता बेधडक अशा संग्रहात छापणे हे या क्षेत्रातील बेजबाबदारपणाचे आणि टीकात्मक समज नसण्याचे चित्र माझ्या परिचयाचे आहे. पुढे दोन वर्षांनी मी एका परिषदेला हजर राहण्यासाठी श्रीनगरला गेलो असताना एका तरुणाने

मला घरी नेले आणि इंग्लंडच्या 'क्रिटिकल क्वार्टर्ली'ने प्रसिद्ध केलेल्या एका संग्रहातील एका इंग्रज कवीच्या दोन कविता दाखवल्या. माझ्या मुंबईतल्या तरुण पारसी मित्राने लिहिलेल्या दोन कविता त्या याच होत्या. आज त्या सगळ्यात मोठ्या भारतीय इंग्रजी काव्यसंग्रहाची कीर्ती वृद्धिगत करीत आहेत.

पुन्हा एकदा मला हे सांगितलेच पाहिजे : सगळीकडे असेच चालते असे म्हणून चालणार नाही. माझे ठाम मत आहे की या गोष्टी योगायोगाने घडत नाहीत. सामाजिक लाचलुचपतीच्या घटना प्रकाशात आणल्याने समाजातील लांडी-लबाडी जशी उघड होते तसे यावाबतच्या सत्याने डोळे उघडायला हवेत. या प्रकारांतून जी मनोवृत्ती दिसून येते तिची मुळे जर खोल गेलेली असतील तर अशाच घटना सतत घडत राहतील.

मी सुरुवातीला म्हटले की माझी स्वयं-स्वीकृत जबाबदारी ही इंग्रजीतून कविता लिहिणारा भारतीय कवी खरोखर कसा आहे हे पाहणे ही आहे. त्याचे एक विविध गुणांनी युक्त असलेले व्यक्तिचित्र आता काढून दाखवितो. ते जसेच्या तसे कोणत्याही एका कवीचे म्हणता येणार नाही, पण अंशतः ते सगळ्यांना लागू आहे, किंवा किमानपक्षी बऱ्याच जणांना लागू आहे : नवागताच्या नम्रतेने आणि प्रयत्नशीलतेने त्याने आपल्या कॉलेजच्या दिवसांत काही कविता लिहिल्या आहेत. त्या कवितांबद्दल तो गंभीरपणे विचार करू शकत नाही, कारण भारतीय विद्यापीठांनी अजून त्याची चारचौघांची पातळी बदललेली नाही. त्याचे आईवडील, काकामामा, अविवाहित आत्या आणि बरोबरचे नातेवाईक, मित्र, नामवंत प्राध्यापक आणि शारीरिक शिक्षण देणारा शिक्षक यांनी त्याला उत्तेजन दिले आहे आणि त्याला कवी म्हटले आहे. त्याने काही कविता कॉलेजच्या मासिकात प्रसिद्ध केल्या आहेत, काही वेगवेगळ्या वृत्तपत्रांना आणि मासिकांना पाठविल्या आहेत. त्यांना ताबडतोब प्रसिद्धी मिळाली आहे. भारतीयांच्या इंग्रजी कविता प्रकाशित करणारा एक प्रकाशक--ज्याच्या नजरेतून क्षितिजावरील नवा तारा कधीच सुटत नाही--त्याला पत्र लिहितो आणि छपाईचा खर्च करणार असाल तर आपण संग्रह प्रसिद्ध करण्यास तयार आहो असे कळवतो. खर्चासाठी पैसे जमवले जातात.

आणखी एक कवी प्रकाशात येतो. बाकीचे बरेच जण त्याच्या स्वागतासाठी पुढे सरसावतात. एकजण त्याला प्रमुख कवी म्हणतो, तर दुसरा त्याचे वर्णन 'तत्त्वचिंतक' म्हणून करतो. मध्यंतरीच्या काळात त्याला नोकरी मिळाली आहे, किंवा स्त्री असल्यास तिला नवरा मिळाला आहे. आता आपला हा कवी तक्रार करू लागतो की त्याला लिहायला वेळच मिळत नाही--पण तो तसेच लिहीत राहतो. दहा वर्षांनी त्याला नोकरीत चांगल्यापैकी बढती मिळाली आहे किंवा त्याच्या जागी स्त्री असल्यास तिला तीन मुले झाली आहेत. एकांतवासातल्या एका टीकाकाराच्या लक्षात येते की या कवीनें कॉलेजमध्ये असताना लिहिलेल्या कविता या

त्याच्या उत्तम कविता आहेत. कमीतकमी त्या आशा करण्याजोग्या तरी होत्याच. आता, पुढच्या कवितांमध्ये आशेचे चिन्ह आढळत नाही. निर्मितीसुद्धा कमी कमी होत गेली आहे. तुम्ही त्याला नव्या कवितांबद्दल विचारले तर तो तुम्हाला ३९ शब्दांच्या १७ ओळींनी बनलेल्या दोन कविता पाठवतो. 'प्रतिमा : १' व 'प्रतिमा : २' अशी त्यांची नावे असून त्या तीन वर्षांपूर्वीच्या 'वेस्टर्न रेल्वे क्लार्क्स-युनियन क्वार्टर्ली बुलेटिन'मध्ये प्रसिद्ध झालेल्या आहेत.

आणखी दहा वर्षांनी, एकदा तो तुम्हांला चहापानाचे आणि त्याच्या कुटुंबियांबरोबर जेवण्याचे निमंत्रण देतो. त्याला त्याच्या काही नव्या कविता तुम्हांला दाखवायच्या असतात. चहाच्या आणि जेवणाच्या प्रलोभनाने तुम्हीही जाता. तो कवितांचा एक लहानसा जुडगा तुमच्या हातात ठेवतो आणि अभिमानाने म्हणतो, "या माझ्या मुलाने केल्या आहेत." पंधरासोळा वर्षांचा एक गोंडस मुलगा तुमच्याशी लाजतलाजत हसतो. तुम्ही त्याला विचारता, मोठेपणी तू कोण होणार? तो म्हणतो, मला जाहिरातीच्या क्षेत्रात शिरायचंय. कवितेचं काय? लिहिणार आहे, तो म्हणतो, मी कविताही लिहिणार आहे.

आणि तो खरोखरच तसे करतो. शनिवार संध्याकाळपासून ते रविवार सकाळपर्यंत तो एखादा तास सवड काढतो आणि एखादी कविता लिहितो. लगोलग त्याच दिवशी तो एखाद्या वृत्तपत्राकडे किंवा मासिकाकडे—ज्याने त्याच्या आधीच्या कविता छापलेल्या असतात—ती पाठवून देतो. आता ही कविताही छापून येते. इंग्रजीतून लिहिणाऱ्या भारतीय कवींची नवी पिढी जोमात आलेली असते.

अशा वातावरणातून—किंबहुना, कवितेच्या शत्रूद्वारे—निर्माण होणाऱ्या कवितेकडे गंभीरपणे कसे पाहावे? इंग्रजीतून कविता लिहिणारा भारतीय कवी म्हणजे असा कवी, की ज्याची आपले कवित्व टिकविण्यासाठी काही किंमत देण्याची तयारी नसते, हालअपेष्टा सहन करण्याची इच्छा नसते—कारण कवितेचे वारे त्याच्या दैनंदिन निर्णयांच्या विरुद्ध दिशेने वाहत असते, नोकरी आणि काव्य यांच्यात संघर्ष मांडावा असे त्याला वाटत नाही. फार काय, काव्यामुळे आपल्यात आणि आपल्या बायकोत खटके उडावेत हेही त्याला बरे वाटत नाही. भयानक काळोख्या दरीत तो पाऊल टाकत नाही. त्यामुळे पलीकडचे तेजस्वी शिखर त्याला दिसू शकत नाही. आत्म्याची भयाण रात्र तो अनुभवत नाही, त्यामुळे दैवाचा प्रसन्न प्रकाशही त्याला ठाऊक नसतो. काव्य हे त्याच्या स्वयं-प्रतिमेचे साधन असते; त्याला परा-काष्ठेचे दुःख किंवा आनंद देणारी देवता नसते.

खरा कवी स्वतःची इतकी कडवी परीक्षा करीत असतो की इतरांच्या टीकेचा त्याला त्या मानाने फारच थोडा त्रास होतो. दुसऱ्यांची टीका ही त्याच्या दृष्टीने सहज जाता जाता केलेली टीका असते. आपण केलेल्या प्रत्येक तडजोडीचा आपल्या

कवितेवर परिणाम होत असतो हे तो जाणून असतो, आणि त्यामुळे दिवसरात्र तळमळत असतो. पण त्यामुळेच तो मनःपूर्वक जगतही असतो—आवश्यक त्या तडजोडीनिशी, आणि त्या परिस्थितीवर मात करण्याच्या धडपडीनिशी. इंग्रजीतून कविता लिहिणारा भारतीय हा युद्धकाळातसुद्धा अगदी नेहमीचेच जीवन जगताना दिसतो, तर खऱ्या कवीला ठाऊक असते की त्याच्यासाठी नेहमी युद्धकाळच असतो; त्याचे जीवन सर्वसामान्याचे नसते.

बाकी सगळे साधणे आणि त्याबरोबरच काव्यनिर्मिती करणे हे कारकुनी स्वप्न आहे. कवितेसाठी इतर साऱ्यावर पाणी सोडणे हा कलंदर माणसाचा मार्ग आहे. या दोन टोकांच्या मध्ये अनंत शक्यता दडलेल्या आहेत. खरा कवी हा नेहमी भटक्या असतो—शरीराने नसला तरी मनाच्या अरण्यात भटकत असतो. आणि ही अरण्ये खऱ्याखुऱ्या--काल्पनिक नव्हे--हिंस्रप्राण्यांनी भरलेली असतात; त्यांचे चेहरे प्राध्यापकांच्या थंड चेहऱ्यांशी जुळणारे नसतात. खऱ्या कवीला या श्वापदांकडे पाहावे लागते, त्याचप्रमाणे ती श्वापदे त्याच्याकडे पाहतात तेव्हा जीवाच्या आकांताने पळावेही लागते. कविता ही त्याच्याकरिता जीवनमरणाचा प्रश्न तरी असते, नाही तर काहीच नसते.

कवी असणे म्हणजे काय या मूळ प्रश्नालाच प्रथम सामोरे गेलो तर पुढचे भाषा, भारतीयत्व हे आणि यांच्यासारखे इतर प्रश्न सहज सोडविता येतील. मला कदाचित सांगितले जाईल की भारतीय भाषांतून लिहिणाऱ्यांपुढेही याच समस्या आहेत. मला त्यांची चिंता नाही. मला—आणि या परिषदेत तुम्हालाही--विचार करायचा आहे तो इंग्रजीतून कविता लिहिणाऱ्या भारतीयाविषयी आणि त्याच्या टीकाकाराविषयी--ज्यांनी इतरांकडे पाहण्याऐवजी स्वतःकडे पाहणे आवश्यक आहे.

आजच्या घटकेला प्रस्तुत विषयावर शेवटी असे म्हणता येईल : एकोणिसाव्या शतकाच्या पहिल्या पंचवीस वर्षांत भारतीय लोक इंग्रजीतून प्रथमच कविता लिहीत होते. ती सुरुवात होती. एकोणिसाव्या शतकाच्या मध्याला आणि अखेरच्या पंचवीस वर्षांतही तिच्या कच्चेपणाचे कारण असे दिले जात असे की ती तिची सुरुवात होती. पहिल्या महायुद्धापर्यंत आणि ते चालू असतानाही ती आणखी एक सुरुवातच होती. स्वातंत्र्यप्राप्तीपासून १९७० पर्यंत इंग्रजीतून लिहिलेल्या भारतीय कवितेच्या सर्व चुकांना या कारणावर माफ केले गेले की ती नुसती सुरुवात होती. आता या चालू दशकात आपल्याला उत्तेजन दिले जातेय आणि सहानुभूतिपूर्वक रागवले जातेय ते या कारणाने की आत्ता तर सुरुवात होत आहे. म्हणजे इंग्रजीत लिहिल्या गेलेल्या भारतीय कवितेचा इतिहास हा सतत सुरुवातीच्या अवस्थेतच आहे; तो प्रगल्भावस्था कधीच प्राप्त करू शकत नाही. मला वाटते की ती अवस्था प्राप्त करण्याचा काळ आता तरी यायला हवा.

कमलाकर कांदळकर

**एका सकाळी**

**स्वस्त आवृत्ती काढली**
**माझ्याच कल्पनांची/भावनांची**

**फुलें आलीं तेव्हां**
**उन्मळलों होतों**

**निवान्त**
**एकान्त**
**हवा आहे**

**वाट मागे जाते**
**पायाखालून**
**एका सकाळीं कानच हातांत आला.**

卐 卐

हेमंत कर्णिक

**या रंगीत घोड्यांवर बसून**

**एकदा एक भेटला मारवाडी**
**वाटेल ते महाण ठेवून घेणारा**
**त्याच्याकडे उद्याची पहाट महाण ठेवून बघितलं**
**तर हसून त्याने एक कचकड्याचा खेळ दिला.**
**चार घोडे गोल चक्रांत आणि त्यांना जोडणारी सुई**
**ती फिरवली की घोडे पळत सुटत गोल गोल.**
**चक्रांतल्याच एका ठिकाणीं लाल खूण.**
**तिथे येईल तो पहिला.**
**मग परत सुई फिरवायची.**
**असच.**

**व्याजापोटीं परवाची पहाट देऊन खेळ ठेवून घेतला.**
**आता त्या घोड्यावर बसायची प्रॅक्टिस करतोय.**
**जमलं पाहिजे. न जमून कसं चालेल ?**
**उगवल्याशिवाय असणाऱ्या दिवसांमधून**
**या रंगीत घोड्यांवर बसून तर वाट काढायचीय.**

पोपट सातपुरे

## विराट इच्छा

दऱ्याखोऱ्यांतून पहाडांतून झाडांतून दृश्यादृश्यांतून
एक विराट इच्छा पसरली आहे : मी.
हा प्रकाश अचेतन होणार आहे
आपण एखादा सूर्य मिळवूं हें शक्य नाही
ही विराट इच्छा धुळीला मिळूं पाहील तर धूळही उरणार नाही
प्रकाश उरणार नाही अंधार उरणार नाही भीती नाही दुःख नाही
आनंद नाही स्थिती नाही गती नाही
एखाद्या प्रेतासारखी ही विराट इच्छा पडून राहूं शकणार नाही
आणि तिला नष्टही होता येणार नाही
तिला आनंदलोकाचें स्वप्न पडणार नाही
आणि दुःखलोकांतील यातनाही भोगाव्या लागणार नाहीत...

माधुरी परांजपे

## दुःख असें दे

दुःख असें दे
ज्या दुःखाला
लाजिरवाणी नसेल झालर !
दुःख असें दे
ज्या दुःखाला
परावलंबी नसेल पाझर !
दुःख असें दे
ज्या दुःखाला
वीरत्वाची छटा असावी !
दुःख असें दे
ज्या दुःखाला
जननिंदेची तमा नसावी !
दुःख असें दे
ज्या दुःखाचा
कढ हृदयांतून यावा !
दुःख असें दे
ज्या दुःखाने
सुगंध निर्माल्यात हसावा !

सतीश तांबे

## माझीं दारं

गडद रंगाचा दरवाजा उघडून
संध्याकाळ आंत येते
तशी दरवाजा मिटतों.

ईझीचेअरवर बसून मी बघत असतों
भितीवर टांगलेली एक पेशी
नुकतंच मीं बघितलेलं असतं
रक्तासारखं सळसळसारं दुःख
पेशीच्या नसानसांतून

दरवाजा बंद केला सौम्य रंगाचा
तेव्हां मळभ किंचित् कलत होतं
मला तुझी आठवण येत होती
माझ्या नसानसांतून.

पाण्याने भरलेल्या फुग्यासारखा
एक ढग कचकन् फुटला अंगणांत
तेव्हा माझ्या मेंदूंत कळ आली
आणि मीं दरवाजा बंद केला...
खरं तर भिती तेव्हां कोऱ्या होत्या.

एकटक बघत बसल्यावर दिसूं लागली
एक पेशी स्क्रीनसारखी.
(मध्यबिंदूचं ॲक्टिंग सुपर्ब होतं.
झऱ्यासारखं पाझरणारं तें द्रव्य
दुःखं होतं समजतांच
संध्याकाळ दरवाजा उघडून आंत आली ..

माझ्या एकाकीपणाचा फायदा घेत
कुणीतरी माझीं दारंही गडद रंगवलीं.

**अभिप्रायार्थ प्राप्त** : १. **जाहीरनामा** : नारायण सुर्वे; किंमत ६ रुपये; २. **सकीना** : वसंत बापट; किंमत ९ रुपये—**पॉप्युलर प्रकाशन**, ३५ सी ताडदेव रोड, मुंबई ४०००३४

## रमेश पानसे

## ' जाहीरनामा ' :

नारायण सुर्वे यांच्या कवितांनी मला खूप आकर्षित केलेले आहे. त्याला कारणे अनेक. एक म्हणजे ज्या काळात नुसती फुलणारी-झुलणारी कविता उदंड पिकत होती, त्या वेळी सुर्व्यांची बोचणारी कविता एकदम पुढे आली. तिच्यातील जिवंत बोच आणि तत्कालीन वेगळेपणा मला आकर्षित करून गेला. दुसरे म्हणजे, एरवी मला माहीत नसलेल्या जीवनाला मी प्रथमतः त्यांच्या कवितेकरवी सामोरा गेलो. शिवाय, निव्वळ कलात्मकतेच्या दृष्टिकोनातून कविता वाचण्याची, कवितेचे अभिव्यक्त आकार शोधण्याची मला खोड आहे; आणि सुर्व्यांच्या कवितेत मला एक वेगळ्या प्रकारची पण दमदार लय प्रत्ययाला आली. माझ्या मनात असलेल्या ' चांगल्या कविते 'च्या प्रतिमानात सुर्व्यांची कविता बरीचशी बसत होती. आणि म्हणून सुर्वे हे माझे आवडते कवी होऊन बसले.

' ऐसा गा मी ब्रह्म ' आणि ' माझे विद्यापीठ ' हे त्यांचे दोन्ही काव्यसंग्रह मला अपेक्षित आनंद देऊन गेलेले आहेत. आता मी त्यांचा ' जाहीरनामा ' वाचतोय. त्यातून दोन गोष्टी प्रत्ययाला येताहेत. एक माझ्या मनातील सुर्व्यांच्या कवितेबाबतच्या भावनेस उणेपणा येईल अशा काही गोष्टी. आणि दोन, पुन्हा एकदा नव्याने प्रत्ययास येऊ लागलेल्या काही, जमेस धराव्या अशा गोष्टी.

प्रथमतः ' उणे 'पणाविषयी लिहितो.

आता सुर्वे काही एक निश्चत भूमिका मनात धरून कविता लिहिताहेत. वास्तविक संग्रहाच्या शेवटी जोडलेल्या ' कविता आणि मी ' या परिशिष्टात सुर्वे लिहितात, " अमूक एक भूमिका मनात वागवून कविता लिहितो असे कधी घडलंच नाही. मला ते पटत नाही. भूमिका लक्षात ठेवून कविता लिहिली की, ती घोषणा होते, स्लोगन होते, कविता बिघडते. "

१९६६ साली लिहिलेल्या स्वतःच्या कवितांबाबत त्यांनी असे म्हणणे मला थोडेसे पटेल. परंतु ' जाहीरनामा ' विशिष्ट ' भूमिके ' वर अधिष्ठित नाही असे म्हणणे पटवून घेणे कठीण जाते. ' जाहीरनामा ' हे संग्रहाचे स्वीकारलेले नाव हेही केवळ ही स्वीकारलेली भूमिका स्पष्ट करायला पुरेसे आहे. मार्क्स-लेनिनवादी विचारसरणीचा प्रभाव या कवितांतून स्पष्टपणे दृग्गोचर होतो. सुर्वे कदाचित कवितेशी प्रामाणिक असतील, पण मग हा विशिष्ट विचारसरणीचा हात झटकून ते आता कविता लिहू शकत नाहीत असे म्हणावे लागते. विशिष्ट भूमिका मनात वागविणे वावगे नाही; पण मग कविता बिघडते हेही खरे !

' जाहीरनामा 'मधील कवितांचा साकल्याने विचार केला तर सुर्वे क्रांतीची भाषा बोलताहेत हे स्पष्ट आहे. परिस्थिती फारच जाचक आहे याची जाणीव

वेळोवेळी व्यक्त झालेली आहे. यातून केव्हातरी क्रांतीची (दणदणीत) पावले पडतील असा आशावादही यात आहे. परंतु उणेपणा जाणवतो तो यात की, कवी असा नुसता आशावाद व्यक्त करतो; आशावाद निर्माण करू शकत नाही. कुठेतरी निराशेचे सूर, कुठेतरी हताशपणाचे सुस्कारे, कुठेतरी तडजोडीची भाषा, हे सारे एरव्हीच्या सुर्व्यांच्या कवितेशीं सुसंगत नाही; तसेच सुर्व्यांनी स्वीकारलेल्या भूमिकेशीही सुसंगत नाही.

या ' उणे 'पणाला दोन कारणे असावीत. एक, कवीची आणि कवी ज्याचे प्रतिनिधित्व करतोय ज्या समाजाची, इतिहास-संस्कृती वगैरेशी परंपरेने बांधलेला संबंध तोडून टाकण्याची मानसिक तयारी झालेली आहे; परंतु कवीला असे सुचवायचे आहे की व्यापक क्रांतीसाठी ही भूमी अजून पुरेशी भिजून तयार नाही. त्यामुळे तूतं तरी, निराशा, सुस्कारे, तडजोड यांच्या साहाय्याने उभे रहावे लागणार. दुसरे कारण वैयक्तिक स्वरूपाचे; काव्यनिर्मितीच्या प्रक्रियेशी जवळचे. ते म्हणजे, सुर्व्यांची पहिली कविता त्यांच्या होरपळलेल्या वैयक्तिक जीवनाशी नाते सांगणारी म्हणून अधिक सच्चेपणाने अभिव्यक्त झालेली होती आणि आता कळत नकळत सुर्वे अधिक ' सामाजिक ' बनू पहात आहेत आणि यातून कवितेचे ' सहजपण ' दुरावत आहे. काहीही असो, 'जाहीरनामा 'मधील कविता काहीतरी ठरविलेले सांगण्यासाठी पुढे येत आहे असे सतत जाणवते, हे मात्र नाकारता येत नाही.

कवीला काहीतरी निश्चितपणे सांगायचे आहे आणि आपण ते गृहीत धरून कविता वाचायची आहे हे एकदा ठरविले की मग सुर्व्यांची कविता खूपच प्रभावित करून जाते. त्यांची सरळ बजावणारी भाषा, मित्रत्वाच्या नात्याने स्पर्श करणाऱ्या त्यांच्या ओळी, टोचक सत्य सांगणारी आणि क्षणार्धात मनाचा ठाव घेणारी विधाने, वजनदार स्पष्टार्थगर्भ शब्द आणि वाचतानाच आनंद देऊन जाणारी कवितांची अंतर्गत लय ही सारी सुर्व्यांची जमेची बाजू फार मोठी आहे. मराठी काव्यप्रांतात सुर्वे आपले वेगळेपण अजून टिकवून आहेत.

प्रत्येक कवीचे काव्यही शैशव, तारुण्य, प्रौढपण आणि थकलेले असे म्हातारपण या अवस्थांतून प्रवास करीत असते, असे मानायला हरकत नाही. नारायण सुर्वे यांची माझ्यासमोर आलेली' ऐसा गा मी ब्रम्ह'मधील कविता आपल्या तारुण्यावस्थेत होती; ' माझे विद्यापीठ ' आणि ' जाहीरनामा 'मधील कविता तारुण्य आणि प्रौढतेच्या सीमेवर उभी आहे असे जाणवते. अर्थात कोणत्याही कवीचा काव्यसंभार कवीच्या वयाबरोबरच म्हातारपणाकडे झुकला पाहिजे असा गैरसमज कोणीही करण्याचे कारण नाही. कलेच्या प्रांतात चिरतरुण कलानिर्मिती करून संपलेले कलावंतही असतातच ! सुर्व्यांची कविता मात्र याच सीमेवर स्थिरावणार की काय अशी शंका दाट होऊ लागली आहे.

# तीन कविता : इ. इ. कमिंग्ज  अनुवाद : मनोहर ओक

---

**इ. इ. कमिंग्ज** : ( e. e. cummings ) अमेरिकन कवी. जन्म १८९४; मृत्यू १९६२. कमिंग्जच्या सरस कविता या पारंपारिक पद्धतीने लिहिलेल्या आहेत; तरी त्याची प्रसिद्धी आहे ती तऱ्हेवाईक लेखनासाठी. विरामचिन्हांचा वापर वेगळ्या पद्धतीने करणे, शब्द आणि ओळी यांच्या मांडणीत निरनिराळे प्रयोग करणे, विशेषनामांची आद्याक्षरेही लहान (' लोअर केस 'मध्ये ) काढणे, उच्चारानुसारी शब्दलेखन ( फोनेटिक स्पेलिंग ) करणे, क्रियापदाचा वापर नामासारखा करणे, अशा कारणांमुळे कमिंग्जच्या कवितेने वाचकांचे लक्ष वेधून घेतले आहे. पण 'नवते'चा असा साज असला आणि अनेक ठिकाणी आक्रमक उपरोध असला तरी खरे म्हणजे कमिंग्ज भावकवी आहे. आणि कमिंग्जचे विश्व बरेचसे सरळ-सोपे आहे, पण या मर्यादेची भरपाई करते ती त्याच्या सुरेख बांधणीच्या भाव-कवितेतली उत्कटता.

---

१

असंच काही नेहमी असेलच असं नाही
पण माझी सांगी आहे की
मी अलवार चुंबलेले तुझे ओठ
तसेच दिलवर वेगळ्या ओठांवर आणि
तुझ्या सलोखी सामर्थ्यवान बोटांची जबर पकड
कब्जा करील त्याच्या हृदयावर
जसं राज्य केलंतं माझ्या हृदयसिंहासनावर
हेंही नाही फार दूरवर
तुझ्या किर्र्र्रगोड केसांची शांतता
शाकारेल निवांत दुजाचा चेहरा
ही माझी ओळख वा तसेच
अथांग उदमळून येणारे शब्द
ओतून ओपून उतू जाऊन असाहाय्यपणे
अंत:करण ओहोटीच्या समुद्राला तोंड देत उभं.

असंच जर नशीब असेल मी म्हणतों
असेल जर असंच नशीब
तर माझ्या जाने-कुर्बा हें माझ्या कानीं घाल

की मी त्याच्या दारीं जाईन
घेईन त्याचा हात हातात
नि म्हणेन स्वीकार माझं सर्वस्व माझं आनंद निधान
मग मूकपणे वळेन नि ऐकेन
एका पाखराचा भकास आक्रोश
दूरस्थ हरवलेल्या क्षितिजावरून.

२

मानवते मी तुझ्या प्रेमांत पडलोंय्
कारण ज्यांचा जीव खिशांतल्या घड्याळाच्या साखळीला
लटकत असतो त्यांची विचारपूस करण्यापेक्षां
तू यशाचे बूट चाटत बसशील
आणि जें आपल्या दोन्हीपक्षीं अडचणीचं ठरेल
कारण तू निकराने प्रशंसा करशील सर्व गाण्यांची
ज्यांच्यांत स्वदेश, घरकुल, आई या शब्दांची पेरणी केली जाईल

मानवते माझा तुझ्यावर जीव आहे
कारण जेव्हा तुझी पैशाची गोची होते तेव्हा
तू अक्कल गहाण टाकतेस एका चौक्याकरता
आणि चलतीच्या वेळी बुद्धीच्या गौरवरौरवात मग्न असतेस
आणि अविरत चालणारी तुझी कटकट जी
खास करून तुझ्या स्वत:च्या घरात

मानवते माझा तुझ्यावर जीव आहे
कारण आपली जीवनरहस्यें तू चिरस्थायीपणे
योनींत लपवतेस आणि
बेमालूमपणे विसरतेस, बसतेस थंड स्वस्थून कारण
आणि निरंतर मृत्यूच्या मांडीवर
कविता करण्याचे तुला प्रभुत्व
मानवते मी तुझा तिरस्कार करतो.

सर्व वस्तुनिरपेक्ष तुम्ही टवटवीत नि आनंदी व्हा
तुम्ही टवटवीत असाल तर ज्या ज्या आयुष्याचा
स्वीकार कराल तें तें स-स्वरूप होईल
नि आनंदी असाल तर जें जें चिरंजीव आहे
तें तें तुमच्याशी एकरूप पावेल.
तरुणतरुणी नि तरुणीतरुण एकमेकांत
पूर्ण आत्मनिर्भर असतील
जिची अवधी प्रेममूर्ती मी असेन.

जिची एक एक गूढरम्यता
सर्व मानवी आशयास अवकाश धारण करायला लावते
आणि अतर्क्य अशा काळाचं ओझं
खांद्यावरून उतरवते

तुम्ही असं चिंतावं देवाच्या मनांत विपरीत न यावं
(तो दयार्द्र) आणि लाभावी प्रेमिकांना मेहेरनजर
हीच ज्ञानाची सांगता जिथे गर्भार थडग्यांना
प्रगती मानतात नि नकारमृत्यूचा साजरा होतो वाढदिवस

हजारों तारकांनी कसं न नाचावं हें शिकविण्यापेक्षा
एखाद्या पाखराकडून कसं गावं हें मी शिकेन.

शब्दा

लघु-अ-नियतकालिक. मुद्रक–प्रकाशक : सुशीला पानसे, ज्ञानविज्ञान प्रकाशन, ३६, चरई, ठाणे ४००६०१. मुद्रणस्थळ : ज्ञानविलास छापखाना, संपादक : रमेश पानसे, सुनील कर्णिक.

अंक २/१२

३ एप्रिल १९७६

## दोन अनुवाद : अशोक रा. केळकर

नॉर्मन मॅक–क्रेग

### मी आणि तुझा आठव मीं केलेला

आठवतं तें वाळकं कांटेरी झुडूप
चकित झालेलं
आपल्याच एकुलत्या फुलाला पाहून ?

जर मी शेजारी उभा राहिलों तर झाकाळून नाही कां जायचं तें
जेविं प्रतिबिंब झाकाळुन जाई जधीं
तें ठाके
निज बिंबासन्निध

मूळ : Norman MacCraig, 'I and My Thoughts of You', **Encounter**, August 1972

जॉन कॉटन

### मार्गस्थ

दर रविवारीं सकाळीं दहाच्या सुमाराला
जित्रापं ट्रकात भरूनशानि चालवत्याति
एन्समकडून पशुवधकेंद्राकडे
ट्रक आपला हुबा व्हातो की रस्त्याच्या कडंला
ड्रायव्हरचा चहा व्हायचा असतो ना
बाजूच्या फटींतून बघत्याति पानीशार डोळं टकटका
बाहेरचा उजेड ( आत तर सर्व अंधार व्यापून राहिलेला
रानं आन शिवारं हलत्याल कशी डोळ्यापून )
प्रद्रोष बाऱ्यावर तरळत जातो एक अनोळखी हंबर
कळवळूनश्यानि ( म्हंजि आसं बगा ) कुठं आपून चाललों तेसाटी नव्हं
तर कुठं काय आपला सोडून आलों त्याखातर.

मूळ : John Cotton, 'En Route', **Encounter**, October 1972

# दोन कविता : कृ. श्री. पेडणेकर

## तिच्या कृपेने

तिच्या कृपेने आलें ओझें
त्याच्या कर्मीं :
घाव लागला तिज तो वर्मीं

पण नियतीची तऱ्हाच होती
चराचराला खेळविण्याची
नेण्याची, देऊन घेण्याची

प्रणयभग्न हें
तरी लग्न ती लावीत आहे
विघ्नांचें चवचाल सुखाशी
कभिन्न काळा काळ उपाशी
दोघांनाही खास बाधतो
तरी सांधतो आहे दोघे
ओढुनिया पळतांना मागे

## माझी बायको

माझी बायको
चित्रें बघते
मासिकांतील माझ्या
अक्षरशत्रु
अडाणी न ही
सुशिक्षितासम गिरिजा

वाजविते ही
मस्त तुणतुणें
फुगवित छाती बाजा
मटण पाहतां
ओठ मुरडते
खाते तृण फळभाज्या

त्रैलोक्याची ही अधिराणी
मजला म्हणते राजा

राजा सरनोबत

## संज्ञेचीं मिटतां दारें

भानांतून आर्त स्वरांची ही कोण मारतें हांक ?
बुडणाऱ्या ओळीमागे पाऊलें कुणाचीं लाख ?

आभाळही अंधाराने पेटून असें उठलेले
पाय न् वाटांमधले कां बंध असे तुटलेले ?

कां तुझ्याच अस्तित्वाने शंकाकुल व्हावीं रानें ?
मीं चिडून फेकून द्यावीं तूंच जडविलीं पानें

कां माझ्या अस्तित्वाचें मलाच व्हावे ओझें ?
जगण्याच्या अर्थामधले शब्द कसे ना माझे ?

हे शब्द घेऊनी जा रे तमांतही फुलणारें
सह्य होऊं दें भार संज्ञेचीं मिटतां दारें

हेमंत कर्णिक

## काळा सूर्य

काळ्या सूर्याच्या किरणाने नेम साधला
आणि मी झालों आरशांतल्या प्रतिबिंबाचा बंदी
किरण सरकत त्याच्यावर गेला;
दिसले मला त्यालाही बांधलेले कठपुतळी दोरे
सूर्याने मोर्चा वळवला दोऱ्यांवरही,
दोऱ्यांनी मात्र युद्ध पुकारले
हिसके बसूं लागले मला. टवके उडूं लागले माझ्या त्वचेचे
जागा झालों जेव्हां बेशुद्धींतून
प्रतिबिंब नव्हतें, दोरे नव्हते, आरसा नव्हता
मी मुक्त !

माझ्यांत सामावलेला काळा सूर्य मग निघाला दिग्विजयाला

## दोन कविता : किशोर दीक्षित

### मी जरी मेलों तरीहि

मीं जरी शोकांत माझ्या जीवनाची राख केली
आसवे माझीं पुसाया तूं तरी येणार नाही !

भग्न अवशेषांत स्वप्नांच्या जरी निःशेष झालों
होऊनी माती तरी तूं आसरा देणार नाही !

ठेवूनी उघडेच डोळे मी जरी मेलों तरीहि
दूर करूनि कफन माझें तूं मला बघणार नाही !

मी जरी शिशिरांतल्या वृक्षापरी निष्पर्ण झालों
झांकण्याला दुःख माझें तूं धुकें बनणार नाही !

जाहलें इतुकें तरीहि मी असा कैफांत आहें;
मीं लिहावें काव्य अन् तुज ओळही रुचणार नाही !

## नको

साशंक तुझा मज शब्द नको
सांशक तुझा अभिसार नको
नयनांचें फसवें जाल नको
हें दान म्हणोनी प्रीत नको

देऊन दिल्याची जाण नको
त्यागाचें हें अवसान नको
स्पर्शाचे केवळ भास नको
हृदयाविण रुजली आण नको

मोजून तोलले भाव नको
साथीचा थरथर हात नको
प्रीतीचा हा अपघात नको
अपघाताचा आघात नको

भेटीचा केवळ आव नको
भेटून पुन्हां ते घाव नको
माहीत असोनी चूक नको
शपथांची ती रुखरूख नको

ऋचा/सदोतीस

## जगाला हें कसें सांगूं

स्वतःला लाज वाटे या  स्वतःच्या क्षुद्र हृदयाची
जगाला हें कसें सांगूं ?

मनाला जिद्द ना उरली  सुगंधी श्वासगंधाची
जिवाला कीड जडलेली  अशा अदृश्य जंतूंची
सुवासा हें कसें सांगूं ?

कधी किरणांत बघते मी  हजारों मलिनकण माझे
झरोके झांकुनी करते  मनाचे बंद दरवाजे
प्रकाशा हें कसें सांगूं ?

समाजाचीं ऋणे कळती  व्यथेच्या पाहतें राशी
तयां ओलांडुनी जाते  प्रतिष्ठित मंदिरापाशी
दयेला हें कसें सांगूं ?

कधी या कोरड्या हृदयीं  विवेकाची शिखा चमके
तिला स्वार्थांत विझवोनी  मढें हें नांदले सौख्यें
विवेका हें कसें सांगूं ?

अतां हसतात सवयीनें  कितीदा हुंदके माझे
उपेक्षा एकदा जमली  अतां प्रेतासही हसते
प्रभुला हें कसें सांगूं ?
जगाला हें कसें सांगूं ?

# दोन कविता : रमेश पानसे

## पाऊस

भागे एकदां त्याने न येऊन चकविलें होते;
आतां येऊन
थाड थाड वाऱ्यावर स्वार होऊन
निद्रिस्त जगाला जागें करून
त्याने अंधारावर केले विजेचे वार.
त्यासाठी त्याने आपलें तारुण्यसुलभ शौर्य
पणाला लावलें, आणि
विजेतून उजळणाऱ्या दाणेदार सरींतून
फुलवलें इंद्रधनुष्य आमच्या हृदयांत
अवेळीं.

## आतां

ओहो !
पाहिलेत ?
माझ्या आयुष्यांतील आनंदाचे महान
हे चार क्षण !
ज्यांच्यासाठी जगण्याची ईर्षा ठेवली होती ! !

हा पहिला,
मुंबईच्या गाडीगर्दीत मीं एक मोकळा श्वास घेतला.
दुसरा,
मीं तिला आपलें म्हणायचें ठरवलें.
तिसरा,
आकाश स्वच्छ दिसलें कुजबुजीविना.
चौथा,
मीं त्याला ओळखलें : तोही एक माणूसच.

मीं आतां संपायला सुरुवात करतोंय.

## प्रवासी : पोपट मानपुते

१.

तो पाहा तो कांहीतरीच्या विचित्र वेडाने भरकटत निघाला आहे
आणि त्याचा तो प्रवासी सोबती
निर्जन प्रदेशांतून अज्ञात आवाजाचा मागोवा घेत
स्वप्नांत तरंगत असल्याप्रमाणे चालला आहे...
आता त्यांना आपल्या माणसांच्या शोधार्थ
राजवाडा सोडून निघालेल्या राजकुमारीचे शब्द
अज्ञात प्रदेशावरील अविनाशी वास्तव्यासारखे वाटत आहेत.
संधिप्रकाशांतील सरोवराप्रमाणे असलेले हे गूढ प्रवासी
यातनारहित अवस्थेतील संदिग्ध काळोखांतून
सूर्यांशिवायच प्रकाश असलेल्या माणसाच्या मूळ रूपात
प्रवेश मिळविण्यासाठी चालले आहेत...

२.

...पण आपला हा प्रवास म्हणजे
निःसंग दिक्कालाचा चिरंतन हर्षनाद असल्याचे समजल्यावर
अतीत उल्हासाने ते आपली क्षमा मागण्यास आले
आणि आपल्या अफाट लखलखीत हास्याने
आपण त्यांना भेवडावलेंत...
आपल्या हास्याच्या स्वरधारेपार पसरलेल्या
आपल्याच अगम्य हृदयाला देहभान विसरून ते घट्ट चिलगले
तेव्हा निरुपयोगीपणाने पडून राहिलेल्या ओळखी थरारल्या
आणि पुढे पसरलेल्या असीम क्षितिजावरून
दिवसांचे हजारोहजार थवे
घरट्याच्या ओढीने उडून गेले महाराज !

३.

दिशांना हांका मारीत तो धावत सुटतो
मग तो थांबतो आणि खाली मान घालून उभा राहतो
मग तो हात फैलावतो आणि कारुण्यगर्भ आवाजांत म्हणतो,
सगळीं वस्त्रं फाडून झालीं, आतां मी काय करूं ?
मग तो ओरडतो आणि उड्या मारतो
तो झाडें कवटाळतो आणि दगडांवर अश्रू ढाळतो
अनंतकाळाचा तो प्रवासी मग विनाशाच्या तालावर चालूं लागतो
आणि दिसेनासा होईपर्यंत चालत राहतो...

## कविता !

रचना. आकृतिबंध.
शब्दांच्या कवायती आणि माझ्या कविता !
सिक्वेन्स टु रमी
डेल्ट १२ कार्ड्स
आणि तेरावं मिळत नाही.
माझ्या कविता :
रडारवर कितीही सावध असलं तरी
काहीतरी जातंच पळून अनोळखी दिशेत.
डार्लिंग,
मी कोणाला हाका मारतोय,
तुला ?
मी कुठेतरी आंत आंत बोलावतोय
तेरावं पान पुढल्या गेमला नेमकं जोकर
हातात फंटूश आणि चार ट्रायो पुन्हा.
कशी होणार कविता ?
डार्लिंग, तूं ओ दे.
तुझा चेहरा मी विसरलोय
किंबहुना मला माहितीच नाही तो खराखुरा.
फंटूशएवढीच किंमत तुला
पण मी आता रोज खेळू लागल्यावर रमी
कविता ? डिपॉझिट ? फक्त एक क्वार्टर!
तुझी 'ओ' डार्लिंग मी आऊट
जोकर फ्लोट
तुझी ओ फंटूश
डार्लिंग, मी खरंच लिहूं शकत नाही कविता.
एक क्वार्टरमध्ये आपण विरघळून गेलों आणि मी ?
गुप्तद्वाराने येऊन बसलोंय या रमीच्या अड्ड्यावर
अगदी एकटा फक ऑफ कविता.

# तीन कविता–तिच्या : अर्जुन कांबळे

१.

तिने
ओळया भोवतीचीं वर्तुळें
आकाशांत भिरकावून दिलीं
: चंद्राला आतां खळें पडलेंय

२.

तिने
दोन्ही हातांनी डोळयांतील बाहुल्या चाचपल्या
जेव्हा तो म्हणाला होता :
" आयो, मी आलों ! "
मग तिचे दोन्ही हात
त्याला न्याहाळायला लागले... -

३.

तिने
वसंताची
डोळयांत प्राण आणून प्रतिक्षा केली
पण शिशिर आला अन् गारठवून गेला
मग तिने पावसाळ्याचा पोशाख केला
आणि
वसंत आला तेव्हा
तिला तो उतरवताच आला नाही !...

# दोन कविता : नीलकंठ महाजन

## सोबत

येतील तर येऊं दे आंत सरळ माझ्यापर्यंत
त्या खिडकीपलिकडच्या समुद्राच्या हांका
तोंपर्यंत काळजाच्या पहिल्या पायरीवर
संयमाच्या शोकाची रक्तात तेवत
ठेवणार आहें मी वात

असतील शेकायचे तर शेकून घ्यावे
वादळाने आंपले गारठलेले हात
मी पाहतोंय वाट पाठीवर ओळखीची
थाप पडण्याची.
अजून कुठलंच दार कसं करकरत नाहीय ?
का निर्वंशच झालाय माझा पाठलाग ?

## धूळ

मी पाठविणार नसतों माझ्यासोबत
संयमाचे तुटलेले साखळदंड
अथवा हजार आरशांतल्या माझ्याच
प्रतिमांचें पराभूत सैन्य

तुझ्यापर्यंत न पोहचल्यानं
माझ्याच हृदयांत तडफडणारे
पाठविणार नसतों मी डोळ्यांचे निरोप
शिणगाराला थकवा येईपर्यंत
नाचतच असतेस तूं
अशा वेळीं मला उधळून द्यावीशी वाटते
माझ्या रक्तमांसाची पेटलेली धूळ

सरिता देवस्थळे

## काळोखांत काळ्या

काळोखांत काळ्या  काजळाच्या वाटा
पावलांत कांटा  मोडताहे

वाट कोठे जाई  कांहीच ना कळे
पाय माझे झाले  निरक्षर

साऱ्या अस्तित्वाचा  करोनिया डोळा
अंधाराचा बंध  घेत आहे

नसनस होते  तार तंबोऱ्याची
नाद माझ्या देहीं  आकारतो

कडेवर कोठे  तेजाची चाहूल
वणव्यांचें भय  श्वासांमधे

गर्भांमधे माझ्या  स्वराचा ग कोंभ
ओठाच्या पाकळ्या  कोमेजल्या

अडकला प्राण  बावरला डोळा
हातींपायीं त्राण  जात आहे

काळोखांत काळ्या  काजळाच्या वाटा
पावलांत कांटा  मोडताहे

मनोहर ओक

## चार भिंताडांत

चार भिंताडांत पिसला जातों मी
स्वतःतला स्वतःत गुंतत गुंता

अंगभर वेल, जाळीं माजल्येत
जंजाळ-पिंजरींत ओळखत नाही मी

ही जांचक वाढ
भुयारांतून बोलतों मी
या हालचाली माझ्या
पोचत नाही मी

ढांढूळत जातात
दिवसभराचे उंदीर खडबडतात
मला वाटतं आपलीं
रात्रीनेत्रींचीं प्रमाणंच बदलल्येत

सगळीं वळणं पडल्येत
पडल्याएत वळ्या
क्षणोक्षणींच्या
गोवले गोवल्या

हीं माणसं मला
ओळखतां येत नाहीत
सगळीं
रंगसफेतींत अस्पष्ट भासतात

## वसंत दत्तात्रेय गुर्जर

**वा**

वा
तुम्ही एकटे आहात
तुमची काय मजा बुवा
ना पुढे ना पाठीं
ना सुख ना दुःख
एकटा जीव सदाशिव खर।

व्वा
काय काय तुमच्या घरांत
कांही नाही असं नाहींच

तुमची काय मजाच मजा
अरे वा
गुलाब फुलले आहेत वाटतं

आणि हीं एवढीं चित्रं
दाटदाटीने
कसं हिरवं हिरवं गार
प्रसन्न

वा
तुम्ही एकटे आहात

गुरुनाथ सामंत

## इतकंच

दुसरीला आपण
आई करूं शकणार नाही
याची वाढती खात्री
पटत चालली आहे.

हीं आपल्या रक्तांतलीं
कैक दिवसांपासूनचीं माणसं
आपल्या आयुष्यांतून
दिवसातासांनी
आक्रसत जाताहेत
त्यांच्या रक्ताचा गुणाकार करणं
शक्य नाही आपल्याला.

त्यांनी आपणाला घर दिलं;
पुढे कांही दिवस
घराचं भाडं आपण देऊं, इतकंच.
यापलिकडे या भिंतींना
मायाळू रंगाचे दोन हात
देऊं शकणार नाही आपण.

**अभिप्रायार्थ प्राप्त :** वस्ती : दत्ताराम बावस्कर, संगीता प्रकाशन, मुंबई–४

लघु-अ-नियतकालिक मुद्रक-प्रकाशक : सुशीला पानसे, ३६ चरई, ठाणे-४०० ६०१

भेटीं

मुद्रणस्थळ : संगम प्रिंटिंग प्रेस, जुना मुंबई रस्ता, ठाणे ४०० ६०१ संपादक : रमेश पानसे, सुनिल कर्णिक
अंक ३/१० २१ मे १९७६

इंद्रियगम्यता हाच एक विशेष नसून प्राप्त इंद्रिये, भावना, विचार, कल्पना आणि एकूणच अनुभवविश्व— थोडक्यात म्हणजे माहीत असलेले वा माहीत होऊ शकेल असे सर्व काव्याचे माध्यम म्हणून वापरले जाऊ शकते. हा सर्व कच्चा माल असतो. या कच्च्या मालातील एखादाच प्रकार प्रकर्षाने अस्तित्वात असला किंवा काहींचा अभाव असला तरी त्या कारणामुळे काव्य निकृष्ट ठरू शकणार नाही. कच्च्या मालाच्या श्रीमंतीनें झगमगणारी कविता आणि कच्च्या मालाच्या बाबतीत तुलनेने दरिद्री झालेली कविता यांच्यात त्या कारणामुळे दर्जात्मक फरक पडण्याचे कारण नाही. फक्त व्यक्तिवैशिष्ट्यांमुळे त्या कमीअधिक लोकांना आकृष्ट करू शकतील.

विशिष्ट अनुभवाची विशिष्टताच केवळ सामर्थ्याने पूर्णपणे व्यक्त करणारी कविता या कार्यात यशस्वी होऊनही कच्च्या मालाच्या स्तरावरच राहते. अशा कवितांच्या बाबतींत संपन्नता, तंत्र इत्यादी कारणांमुळे दर्जात्मक तुलना संभवतात.

कच्च्या मालाची संपूर्ण जाण देणारी कविता ही श्रेष्ठ कविता होय. ही जाण कच्च्या मालात नसते, कच्च्या मालाच्या बाहेर असते. 'बाहेर'चे परिमाण असल्याशिवाय कोणत्याही अभिव्यक्तीचे अस्तित्वसमर्थनीय कार्य अस्तित्वात येत नाही. या 'बाहेर'तेतून लिहिलेल्या कविता या स्वतःचा कच्चा मालही शेवटी अप्रस्तुत ठरवतात. म्हणूनच कच्च्या मालाच्या स्वरूपावरून त्यांची श्रेष्ठकनिष्ठता ठरू शकत नाही.

सर्वच चांगल्या कलाकृती या या अर्थाने काव्य असतात. एखादी कादंबरीही काव्य असते. कादंबरी आणि कविता हे वाङ्मयप्रकारांचे भेद हे बरेचसे परंपरा आणि सवय यांवरून ठरतात. ढोबळ मानाने रचनांच्या प्रकारावरून आपण हे भेद मानून चालतो. अशा भेदावरून कलाकृतीचे मोजमाप होत नसल्याने हे भेद असेच ढोबळ मानाने अस्तित्वात असले तरी काही बिघडत नाही.

नुसत्याच कच्च्या मालाच्या नावीन्यावर टाळी घेणारी कलाकृती अल्पजीवी असते—तिचा लौकरच कंटाळा येतो. परंतु 'जाण' व्यक्त करणारी कोणतीही कलाकृती नित्यनूतन असते, कारण ती आपल्यात कधीच सामावली जाऊ शकत

नाही. कंटाळा हा फक्त 'आपल्याला'च येऊ शकतो आणि अशी कलाकृती तर आपल्याला आपल्याबाहेर नेत असते.

मग बाकीच्या कलाकृती कशाला ? तर करमणूक, पळवाटा, उदात्तीकरण आणि आपल्या हातात जर फक्त कच्चा मालक असेल तर तोच एक महान प्रकार आहे असा सुखद भ्रम निर्माण करायला. अशा सर्व कलाकृती म्हणजे फक्त कच्चा माल. रचनेची कौतुके अपेक्षिणारा आणि काही प्रमाणात वसूलही करणारा.

बीज भाजुनि केली लाही
आम्हां जन्ममरण नाहीं

या ओळी घेतल्या तर बीज भाजताना लाही होते हे आपल्या माहीत आहे. परंतु 'आम्हां जन्ममरण नाही' यातील सर्व शब्दांचे अर्थ आपल्याला माहीत असले तरी ही प्रत्यक्ष स्थिती आपण पाहिलेली नाही. परंतु त्या स्थितीचा बीज भाजताना होणाऱ्या लाहीशी—फुलण्याशी प्रस्थापित झालेला संबंध लाही होण्याची घटना अशी एकदम अज्ञातात उचलतो. एकूण प्रक्रियेची बरीचशी कल्पना येते, पण आपल्या व्यक्तित्वाच्या मर्यादा टाकल्याशिवाय याचा अर्थ आपल्यात पूर्णपणे फुलणार नाही हे लक्षात येते. बीज भाजल्याशिवाय म्हणजे कच्च्या मालाची *नाशप्रक्रिया झाल्याशिवाय लाही फुलत नाहं*—म्हणजे फुलण्याइतकी सहज, सुखद, स्फोटक साधी अवस्था अस्तित्वात येत नाही. आणि हें फुलणे असे की ना फुलण्याची सुरुवात ना कोमेजण्याचा अंत—जन्ममरणाच्या मर्यादाच नसलेले. —या साऱ्या प्रकारात बीज भाजणे, लाही, जन्म, मरण मी (आम्ही), नसणे हे सगळे शब्द माहीत असूनही शब्द म्हणून वा केवळ एक अभिव्यक्ती म्हणून निरर्थक ठरतात. या अभिव्यक्तीच्याहा नाशातच तिचे आकलन होऊ शकते.

सदर अभंगाच्या पुढच्या ओळी अशा आहेत :

आकारासी कैंचा ठाव
देह प्रत्यक्ष जाला देव
साकरेचा नव्हे उंस
आम्हां कैंचा गर्भवास
तुका म्हणे अवघा जाग
सर्वांघटीं पांडुरंग

हा संपूर्ण अभंगच 'जाण' म्हणजे काय हे व्यक्त करणारा आहे. पर्यायाने तो चांगली कलाकृती म्हणजे काय हेही सांगून जातो. इथे आकाराला—म्हणजे

अनुभवक्षेत्राला – म्हणजे कच्च्या मालाला – स्वतंत्र स्थान वा महत्त्व नसते. अनुभव – देह – हा प्रत्यक्ष देव – म्हणजे 'जाण'च असतो. उसाचे अस्तित्व जेव्हा त्यातल्या साखरेपुरते मर्यादित नसते तेव्हा सुरुवात आणि शेवट— गर्भावास —जन्म—मरण यांना काहीच स्वतंत्र अर्थ नसतो. 'अवघा जाग' म्हणजे 'जाण' म्हणजेच अनुभवाच्या संपूर्ण प्रक्रियेचे त्या प्रक्रियेबाहेर असलेले संपूर्ण अवधान हेच 'पांडुरंग' असते – सर्वसत्य असते. ऊस म्हणजे कलाकृती म्हटले तर त्यातली साखर हा अनुभव किंवा कच्चा माल म्हणता येईल. परंतु ही कविता वा कलाकृती कच्च्या मालापुरती नसते. उसाला त्याच्यातल्या साखरेबाहेरचे एक 'अवघा जाग' परिमाण लाभलेले असते. माणसाच्या आयुष्याचे काय किंवा कलाकृतीच्या आयुष्याचे काय अंतिम असे अस्तित्वसमर्थनीय परिमाण – लक्षण हेच असू शकते. कारण हे केवळ वेगळ्या अनुभवात जखडले जाण्याचे उदात्तीकरण अथवा अशा अवस्थेची रडकथा नसून अनुभवप्रक्रियेपासूनच मुक्त होण्याची, स्थल-कालव्यक्ती ओलांडून राहण्याची शुद्ध 'जाण–जाग' असते.

अशा तऱ्हेचे सत्य तार्किक वा काल्पनिक दृष्ट्या अशक्य वाटेल. तसे असेल तर सदरचा अभंग हा एक निव्वळ वेडेपणाचा प्रकार म्हणून टाकून द्यावा लागेल. परंतु या अभंगाची स्वातंत्र्यलक्षी शक्ती इतकी प्रचंड आहे की आपली तर्कशक्ती आणि कल्पनाशक्ती यांसह आपण त्याला शरण जाणेच योग्य ठरते.

# दोन कविता : कृ. श्री. पेडणेकर

## अवशेष

कांही नाही राहिलें
फक्त अवशेष हे
आठवांचे पसरले
विश्वावरी विश्वापरी

भावनाही नासल्या.
दडवलेले शब्द तेव्हा
हासले होते विदग्ध
ते पुन्हा ना वाहती
खांद्यावरी
ओढल्या फांद्यांवरी
फक्त आतां घसरती
शेषांवरी
मोकळ्या केशापरी

## काळोख

काळोख : आकृती तळ्यावरी
चांदणे गीतसें गळ्यामधी
रात्रिच्या.
फूटपाथ : ऐकती माणसें जरा
घट्टपणे
झरोक्यांत प्रीतही गातांत
कबुतरें.
चिरशांती : नीज डोळ्यांत दाट
नेईल पार ते जीव
अलगद.
काळोख : आकृती तळ्यावरी
चांदणे गीतसें गळ्यामधीं
रात्रिच्या

सुरेश मथुरे

# ग्रहण जसें अंधारून येतें

ग्रहण जसें अंधारून येतें
तशी उजळते चिंता
मुग्ध ज्वरावळ देहामधली
युद्ध पुकारून येतां

सूर किती शृंगारून वदले
कसा भरंवसा द्यावा ?
श्वासामधले श्वासच सरले
भास कसा विसरावा !

ऊन जसें फांदीवर झुलते
तसें डुलावें वाटे
डोळ्यामधलीं लटपट बुबुळें
उगाच टिपती कांटे

शिल्प जसें अवघडतें...घटतें ..
तसें जिण्याचें होतें
या देहाच्या गात्रांवरती
सरणसावली पडते

ग्रहण जसें अंधारून येतें
तशी उजळते चिंता
देह पळवतां पैलथडीला
मरण घोकते संथा

# दोन कविता : ज्योती पागनीस

## दचकून जागं झाल्यावर

त्यांना भीती वाटलीच नाही
माझ्या मनगटावर अनेक भयगंड रुजवतांना.
पुस्तकाआडून ओळखीचं कपाळ दिसलं तरी
माणूस विसरूं लागलेय मी
तें कशामुळे ?
आता शहरांतील परिचित पक्ष्यांपलिकडच्या
इतर पक्ष्यांचीं नांवेंही मला आठवत नाहीत नीटशी
तांबट पक्ष्याचा संदर्भ मी विसरून गेलेय.
पानांवर रेषा असतात का ?
मला परवांच जुन्या पुस्तकांत एक जाळीदार पान सांपडलं मऊसं
तें कोण विसरलं असेल
याचा विचार करतांना मी थकते हल्लीं.
दचकून जागं झाल्यावर मध्यरात्रीं, पुढे
सलगपणे झोपताना मला कांहीच वाटत नाही हल्लं.

## आत्मविश्वासानं उमलणाऱ्या प्रत्येक फुलाला

आपापल्या आत्मविश्वासानं उमलणाऱ्या प्रत्येक फुलाला
माहिती असतेंच का आपले प्राक्तन ?
रात्रीं खोल अंधारांत हलणाऱ्या पानाला देठापासून तुटतांना काय वाटते ?
निरोपासाठी हात उचलताना मला काय वाटतें ?
स्वतःच्या शैलींतली दुःखं किती आतपर्यंत माझींच.
माझ्या स्पंदनांनाही सक्त ओढून आणणारीं.
माझ्या गाण्यातल्या शब्दांना, तुझ्या श्वासांना,
फक्त माहिती आहे हुंदक्याची सूक्ष्म थरथर
तरीही संवेदना किती पर्यायहीन एकट्या असतात, हें
मला उमजून चुकलंय...
तुझ्या तळहातावर माझा हात घट्ट मिटून ठेवला तरी,
नाही ठेवला तरी.

विजया पंडितराव

जिप्सी

सुंदर होतें आकाशाचें रूप लाजरें

एकच वेळीं;

एकच वेळीं

फुलपानांचा रंगगालिचा होता सुंदर.

नक्षत्रांच्या लावण्याने मन मोहरलें

एकच वेळीं,

एकच वेळीं

भान हरपलें, धुंद भासलें जें जें दिसलें

अर्घ्यी वाटेवरी टाकलीं दोन आसवें

डोळ्यांमधलीं

गडद सावली

तिथेच उरली भूतामधली कात पांघरून.

दूरदूरचे भविष्यांतले रंग भुलविती

आज मनाला,

आज मनाला

दुःख डसेना भरकटलेल्या खुळेपणाचें.

वळणावरूनी वळून बघतां दिसती सावल्या

जरी कधीही,

तरी कधीही

जिप्सी चाले फूल टाकुनी पायखुणेचें.

## माझा बाप

माझ्याही स्वप्नांना
पालवी फुटावी
पैशांची रसरशीत हिरवीगार वेल
कोवळ्या लुसलुशीत
सूर्यकिरणांसारखी दुडदुडत
माझ्याही घरांत यावी
म्हणून
मणामणाच्या गोण्या
मानेवर वहात वहात
माझा बाप
तरण्याचा म्हातारा झाला...

माझ्या पडवळासारख्या
देहावरून
हात फिरवीत
माझा बाप
मला म्हणायचा,
" आरं " पोरा !
चार बुकं शिकलास
तर सायब व्हशील,
खुर्चीवर बसशील,
चार पैसं मिळवशील,
झीट येऊस्तर त्या बामणाचीं
लाकडं फोडण्यापरास,
आरं, सोताचा कागद निदान
सोता तरी वाचशील.
आरं पोरा !
आमच्या वेळंचा मास्तर
लई चारा बोड्याचा !
साळंच्या बाहेर
आमास्नी बसवायचा
शिकवायचा तर
कायच न्हाय पण
मुतूंस्तवर बडवायचा..."
असा माझा बाप
मला जुन्या गोष्टी सांगायचा,
नाहीच गेलों मी शाळेत तर मला
गुरावाणी बडवायचा...

एकदां काय झालं,
मी मराठी चौथींत असतांना
माझा बाप
मळकट धोतर, गळेबंद
मांजरपाट अंगरखा,
पैलवानी थाटाचा
झिळमिळीत गुलाबी पटका
असा शाळेत आला, तेव्हां
मास्तरांचा हवाबंद चेहरा
पाळ्यावरच्या नेटक्या
अक्षरांसारखा
जागच्या जागींच स्थिरावला.
" मास्तऽर... तुम्ही शिकवा
माझा पोरगा शिकतूय कसा
हें मी खाडा करून
आलूय बघायला —"
असं माझ्या बापानं म्हणतांच

वर्गांतल्या मुलांना
भूकंपाचा हादरा बसला,
मास्तरांनी तर हातांतला खड्डू
गप्पकन तोंडांत टाकून
सुपारीसारखा कचाकचा
चावला,
तेव्हां वर्गांतल्या मुलांचा
हसता हसतां
मुडदा पडला;
माझ्या बापानं
जिलेबीचा एक पुडा मास्तरांना,
दुसरा मला देऊन
वर्गांतून पाय काढला
तेव्हा माझ्यासकट मुलाचा,
मुलांसकट मास्तरांचा
जीव जिलेबींत पडला...
असा जिलेबी खात खात
दरवर्षी अभ्यास केला
मी मॅट्रिक पास होतांच
माझ्या बापानं
नागमलाला एक बोकड कापला
घराण्यांतला पहिलाच पोरगा
डोस्क्यानं दिसतूय बरा
म्हणून कुस्तीत मिळविलेला
चांदीचा कडा
मारवाड्याला विकून
माझ्या बापानं मला
कॉलेजांत ढकलला
त्याच वेळीं खर्चांत खर्च म्हणून
शेत गहाण ठेवून
माझ्या लग्नाचा बारही
उडवून टाकला.

चार वर्षांत कसाबसा
पास क्लासांत बी. कॉम्. झालों
तीन अधिक जुळं मिळून
पांच पोरांचा बाप झालों
तेव्हां पुन्हा एकदा माझ्या बापानं
नागमलाला बोकड कापल;
शिक्षणाने पैसा मिळतो
पैशाने प्रश्न सुटतात
स्वप्नांच्या वेलींवर
वास्तवतेचीं फुलं फुलतात
म्हणून माझा बाप निवृत्त होतांच
माझ्या ताब्यांत मुंबई देऊन
गांबाकडे निघून गेला.

घरदार आलिशान
लखलखीत उंच माडी
नवी विहीर तुडुंब भरून
वहात जाईल नागमोडी
गुरें ढोरें, शेळ्या मेंढ्या
खुळखुळणारी बैलगाडी
ऊस हळद पाहून शेतांत
दिपून जाईल नागेवाडी...
डोळ्यांमध्ये मोहर फुलवीत
बाप माझा जगत होता
" माझा पोरगा लई शिकलाय ",
बांधाबांधाला सांगत होता
शेतींसुद्धां माना डोलवीत
सहज साथ देत होतीं
माझ्या बापाच्या इच्छेखातर
हिरवींगार होत होतीं...
गांवावरून एकसारखीं
पत्रं मला येत होतीं

पत्रामधली भाबडी भाषा
रक्तबंबाळ करीते होती.
मुंबईचा महिना आतां
जिलेबीचा राहिला नव्हता
बोकड कापण्याएवढासुद्धा
कारकुनाचा पगार नव्हता

गांवावरून माझा बाप
मुंबईला परत आला
महागाईने वेढलेलें
शहर पाहून गोंधळून गेला
रुंद मनगट पुन्हा पुन्हा
भिंतीवरती आदळूं लागला
जोर त्यांतला संपला आहे
हें कळतांच खालीं पडला...
इस्पितळांत खाटेवरती
सारखा चळवळ करीत होता,
" पुन्हा जातों नव्या गोदींत—"
झोपेमध्येच बरळत होता...

ऑक्सिजनच्या नळीवाटे
दुःखें सगळीं पचवीत होता,
पार्णदार स्वप्नें घळघळ
डोळ्यांवाटे सांडत होता...

अखेरशेवटी शेंवटची
एक सूचना अशी आली
डोळे भरून पहात मला
आभाळ चिरीत निघून गेली...

मळकट धोतर
गळेबंद मांजरपाट सदरा
पैलवानी थाटाचा झिळमिळीत

गुलाची पटका
गांवाबरून आतां मला पत्र
कधी पाठवीत नाही,
माझ्या बापाच्या इच्छेखातर
रान हंसत डोलत नाही,
रान हंसत डोलत नाही....

'अहा तिजला...' (पृष्ठ चौसष्ट वरून)

खुलू लागते. दरम्यान 'अहह! नेली सुन्दरा प्रिया! तेणें' या चरणाच्या ठिकाणी 'अहह, मुकलों त्या रूपसुंदरीते! / आणि वडिलांसहि' असा विरोधी समीपविन्यास ही रंगत वाढवतो. केशवसुतांची 'अहह' हे उद्गारवाचक योजण्याची व उद्गारचिन्हांची पेरणी करण्याचीं लकबही यात विडंबित झालेली आहे. शेवटची कडवी समांतरविन्यास साधतात, त्यातही मूळ कवितेतील 'असे' या क्रियापदाऐवजी विडंबनात 'असें' हे योजलेले विशेषण खोचदार आहे. या 'असे'चा ठसक्यात सानुस्वार उच्चार करून पाहिल्यास विडंबनचातुर्याची खुमारी अधिकच ठसते.

# दोन कविता : प्रफुल्ल चौधरी

१

माझ्या काळोखी देहावरचीं फुलें
वेचून घे हवीं तर;
सावलीसाठी मात्र थोडीशीं जागा ठेवून जा,
जगाच्या घोथट स्वप्नजाणिवांसाठी
तुझ्या नजरेचे तार पुरेसे आहेत
—मी तर काय, कधीचाच घायाळ!
कधी अस्वस्थ कहाणीचा लय सूर पकडीत,
माझ्या लिपींतला शब्द न् शब्द...
तुझ्या सहजसुंदर उद्‌गारांत !!
सौंदर्याविषयी, म्हणून म्हणतों,
चूकभूल देणें-घेणे !!!

२

असूं दे तुझ्यापाशी ही समजूत.
कधि वादळ उठलेंच दोघांत तर
शांततेचीं कबुतरें
हिच्याच खांद्यावरून सोडूं...!

# दोन कविता : पॉल सेलाँ; अनुवाद : तुलसी परब

१

तू आलीस माझ्याजवळ. गजबजलेली, कामांत गढलेली.
मी म्हणालों तुला, तुझे केस नाहियेत बघ भुरे.
तूं उचललेस तें दुःखाच्या दांडीपर्यंत हलक्याने
नि भरले ते माझ्याहूनही वजनी.

गलबतांवर लोकं येतात तुझ्याकडे, करतात तुझ्या केसांची चिजवस्तू
नि मांडतात ती बाजारांमधनं.
अगदी खोलवरून तूं हंसतेस तशी माझ्याकडे पाहून,
अगदी हलक्या दांडीवरून मी रडतों तुझ्याकडे पाहून.

मी र तों : तुझे केस कुठेहेत भुरे, ते महासागर समुद्रावरचा. तूं
तुझ्या लाटा.
तूं कुजबुजतेस, त्यांनी व्यापलीय साऱ्या जगाची सत्ता नि मलासुद्धा
तुझ्या हृदयांत मात्र मी तुझ्या हृदयाएवढीच उथळ आता.
तूं म्हणतेस, ठेव ही सगळी वर्षांची गुंतवळ बाजूला
किती कठीण ही वेळा. ये जवळ नि चुंबून घे मला.

वर्षांचे जावळ सगळें भुरें आहे, तुझे केस नाहियेत बघ तेवढे भुरे.

**पॉल सेलाँ :** सेलाँ १९२० मध्ये रुमानियन बुकोव्हिनात जन्मला. ४० आणि ४२ मध्ये अनुक्रमे रशियन आणि जर्मनांच्या ऑक्युपेशन लेबर कॅम्पांत वर्षभर. नंतर तिथून अखेरपर्यंत पॅरिसमध्ये. ७० मध्ये आत्महत्या.

त्याच्या कवितेत विषण्ण करणारी दुर्बोधता आढळते. दुर्बोधता नि पॅराडॉक्स. वैयक्तिक सफरिंग सुलभ, श्रुतिसुंदर प्रतिमांमधून तो विलक्षण दुर्बोधतेकडे वळवतो. कळणे आणि अनेकार्थता असणे हे त्याचे प्रमुख लक्षण.

भाषा सुसंघटित करताना तो विशेषतः सिंटॅक्स तोडतो, शब्द त्यांच्या उच्चार किंवा ध्वनींप्रमाणे घडवतो, कविता कमीत कमी शब्दांतून व्यक्त-विण्याचा प्रयत्न करतो—त्यातूनच विविध रचना शोधतो.

---

२

तुझे केस वाऱ्यावर विहरत पुन्हा पुन्हा
मी अश्रू गाळतांना.
डोळ्यांतली निळावंती तुझ्या
नि सोबत तू मांडतेस ते प्रेमाचं टेबल:
जणू बिछाना उन्हाळा ते हिवाळा आरपार.

माहीत नाही कुणी मी–तू का त्याने–तिनेची
आपण पितों भलत्यांनीच गाळलेली ड्रिंक्स
नि टेवतो नंतर भांडीवर एक रिक्त नि अंतिम यातना.

आपण निरखतों खोल सामुद्रिक आरशांत स्वत:ला
नि सरकवतों प्लेटी जल्दीने एकमेकांना.

रात्र म्हणजे खरं रात्रंय. तिची सुरुवातच मुळी पहांटेला
नि तिला हवा असतो मी रात्रभर तुझ्या बाजूला.

श्रीराम खांडेकर

## 'जाहीरनामा' : एक प्रतिक्रिया

आजतागायतच्या पॉलिटिकल थॉट्च्या करट्ंसची
पुरेपूर कल्पना असल्यास आमच्या गच्चींत अनवाणी जा
ती भरदुपारीं तापलेली असताना.
गच्चींत तीन पाण्याच्या टांक्या असतील.
त्या तशा दिसल्या तरी त्या टांक्या नाहीत,
तीन कॉम्प्युटर्स आहेत :
क्वार्टर्सवर लिहिलेलीं असतात अगदी तशाच
मोठ्या अक्षरांत मुद्दाम लिहिलेलीं तीन नांवें असतील :
' नारायण ', ' नामदेव ' आणि ' विजया '.
तुम्हांला प्रिय पॉलिटिकल थॉट
पहिल्या दोहींपैकी एकांत टाइप करून टाका,
कविता बाहेर येईल.
कविता विसंगत, अस्पष्ट किंवा न-कविता वाटली
तर ती तिसऱ्यांत टाका.
कवितेचे स्पष्टीकरण बाहेर येईल.
हें स्पष्टीकरण तुम्हांला न पटल्यास
आमचा नाइलाज आहे--
चौथा कॉम्प्युटर आमच्या गच्चींत नाही !

# 'अहा तिजला चुंबिल असे यानें!'

'अहा, तिजला चुंबिले असे यानें!' या मथळ्याची एक कविता 'झेन्ड्रूच्या फुलां'च्या तिसऱ्या, म्हणजे 'मे. दामोदर शिवराम आणि कंपनी'ने काढलेल्या आवृत्तीत प्रथम अंतर्भूत झालेली आहे. म्हणजे ती बहुधा दुसऱ्या आवृत्तीनंतर (१९३० नंतर) रचली गेलेली दिसते. शीर्षकाखाली कंसात 'Twenty Pounds for a kiss या विलायतेतील खटल्याच्या आधारे' अशी प्रास्ताविक टीप दिलेली आहे. सकृद्दर्शनी असे वाटते की हा एक स्वतंत्रच विनोदी चुटका असावा व त्याला वृत्तपत्रीय बातमीचा आधार असावा. परंतु केशवकुमारांची ही कवितासुद्धा केशवसुतांच्या एका कवितेचे बाह्यानुकरण आहे. केशवसुतांची ती कविता 'तिने जातां जातां चुंबिलें असे यातें' ही होय. केशवसुतांच्या हस्तलिखितावरून तयार झालेल्या यथामूल आवृत्तीनुसार ही कविता त्यांनी २५–१२–९६ रोजी रचलेली आहे या या कवितेच्या शीर्षकाखाली कंसात 'ली हंटच्या 'Genny Kiss'd me' या चुटक्याच्या आधारे' अशी प्रास्ताविक टीप आहे.

दोन्ही कवितांचे स्वरूप घटनावर्णनात्मक आहे. केशवसुतांच्या (अर्थात ली हंटच्या) कवितेतील घटना अशी: कोणा एकाला त्याची कान्ता अत्यवस्थ असल्याची तार आल्यामुळे तो चिंताकुल होऊन घरी जातो. दुखणे विसरून त्याची कान्ता त्याला आलिंगन व चुंबन देते व एकाएकी गतप्राण होते. त्यावर तो काळाला बोल लावीत म्हणतो, "मला हीन–दीन काही म्हण, परंतु तुला हेही म्हटले पाहिजे, 'तिने जातां जातां चुंबिलें असे यातें!"

केशवकुमारांनी वरील आशयाशी विरोधवृत्तीने समांतर ठरणारी घटना चित्रित केलेली आहे. वडील अत्यवस्थ म्हणून कोणा एकाला तार येते. तो निघून गाडीत बसतो, पण तिथे उत्कटपणे एका तरुणीचे चुंबन घेतो. खटला होऊन दंड व कैद होते. वडील मरण पावतात. अशी नापत झाल्यावर जगाला उद्देशून तो म्हणतो, "मला 'पशू' वगैरे काहीही म्हणा, पण जगाला हेही म्हटले पाहिजे, 'अहा, तिजला चुंबिलें असे यानें!"

केशवकुमारांचा आविष्काराचा थाट केशवसुतांच आहे. वृत्त दिंडी हे आहे. एका अतिकरुण प्रसंगी विचित्र रीतीने आत्मसमाधान करून घेण्याची वृत्ती मूळ

कवितेत दिसते. तीच केशवकुमारांच्या बिंडंबनबुद्धीला प्रेरक झालेली असावी. शिवाय मूळ ली हंटच्या मानाने केशवसुती रूपांतर फिके व कमी परिणामकारक असल्याचा अभिप्राय प्रा भ. श्री. पंडित यांनी व्यक्त केलेला आहे (पहा : 'समग्र केशवसुत', २ री आ., पुणे, १९७०). तेव्हा एकदा असे गिऱ्हाईक मिळाल्यावर केशवकुमारांनी त्याचा चांगलाच फायदा उठवला आहे. त्यांच्या विडंबनात मितव्ययाचा गुण बराच आहे. एखाददुसऱ्या शब्दाची फिरवाफिरवी करून ते झटक्यात आशय हास्यास्पद पातळीवर नेतात. मूळ कवितेतील प्रारंभीचे व शेवटचे कडवे यांची या दृष्टीने तुलना करण्यासारखी आहे.

केशवसुत : 'असे कान्ता रोगार्त – या घराला'
असा विद्युत्सन्देश मला आला;
चित्त चिंताकुल होउनी, त्वरेनें
घरीं गेलों मी ग्रस्त संशयाने.

केशवकुमार : 'असति बाबा रोगार्त – या घराला'
असा विद्युत्सन्देश मला आला;
मधे उपटे ही ब्याद कुठुनि आतां ?
जीव चरफडला असा घरीं जातां !

केशवसुत : हीन म्हण तूं मज दीन तसा, काळा,
आणि म्हण कीं त्रासला हा जिवाला;
तरी म्हटले पाहिजे हेही तूते–
तिने जातां चुंबिले असे याते !'

केशवकुमार : लाज नाही याजला म्हणो कोणी !
'पशु साक्षात् हा !' असे वदो आणि !
तरी म्हटले पाहिजे हे जगाने,
'अहा, तिजला चुंबिले असे याने !'

पहिल्या दोन चरणांतील बरचसे सहीसही अनुकरण व तिसऱ्याचवथ्यांत होणारे भिन्न पातळीवरील संक्रमण यातून विरोधाची रंगत (पान अठ्ठावन्न पहा)

अंधारी

लघु अ-नियतकालिक मुद्रक-प्रकाशक : सुशिला पानसे, ज्ञानविज्ञान प्रकाशन, सोनेरी, ३६ चरई, ठाणे४००६०१. मुद्रणस्थळ : संगम प्रिंटिंग प्रेस, जुना मुंबई रस्ता, ठाणे-१. संपादक रमेश पानसे, सुनिल कार्णिक. या अंकाचे संपादन: म. पां. भावे. अंक ४।१० दि. ११ ऑगस्ट १९७६.

सुधीर बेडेकर

# आज-उद्याच्या मराठी कवितेविषयी थोडेसे

१. आजच्या मराठी कवितेविषयी समीक्षकांची मते काहीही असोत, ती वाचनीय नाही हे लोकमत आहे. अर्थात ज्यांचा संवेदनास्वभाग व साहित्यिक जाणिवा प्रगल्भ झालेल्या नाहीत अशा गांवढळ व अडाणी समूहाचे ते मत आहे; पण बहुसंख्येचे आहे आणि म्हणून लोकमत आहे. कलेच्या व काव्याच्या दृष्टीने अर्थातच ते अप्रस्तुत आहे, एवढेच नव्हे तर ते घातकही आहे; कारण सर्जनशीलतेचे स्रोत ठायी वागवणाऱ्या निवडक व्यक्तींना समूहांच्या गांवढळ संस्कृतीत नष्ट व्हावे लागण्याची दाट शक्यता आहे आणि लोकशाहीची आपण जी कदर करतो ती खरे पहाता अशा 'देवाच्या लाडक्या' व्यक्तींच्या विचार व सर्जन करण्याच्या स्वातंत्र्याचीच कदर असते, लोकमताची नव्हे. या प्रतिभावंतांच्या सृजनकमळांना उठाव मिळावा म्हणून लोकांच्या मताला पार्श्वभूमीवरच्या चिखलाइतकी किंमत आहे. नाही असे नाही . पण तितकीच. हां, लोकांना खायला-प्यायला पुरेसे मिळावे, त्यांनी सगळा समाजाचा गाडा चालवावा यासाठी त्यांना जगण्यात पुरेसा इंटरेस्ट वाटण्याइतकी परिस्थिती निर्माण करावी. पण कवितेबाबत लोकमताला काही किंमत नाही.— चांगली कविता म्हणजे काय हा काही या देशाचा कारभार कोणी करावा यासारखा फालतू प्रश्न नाही की जो बहुमताने सोडवता येईल...साधारणतः अशा तऱ्हेने साहित्यिक व विचारवंत मंडळी लोकांमधल्या कवितेसंबंधीच्या प्रचंड नावडीबद्दल विचार करतात. 'जे जनतेचे आहे ते जनतेला द्या व जे कवितेचे आहे ते कवितेला द्या' असे हे नवे ख्रिस्तवचन.

पण तरीही लोकमत उरतेच. आणि माणूसजातीपैकी मूठभरांनाच कवितेचे इंद्रिय असते व इतरांना ते नसते अशातलाही भाग नाही. बारकाईने पाहू गेल्यास आमच्या सुशिक्षितांमध्ये कविता या वाङ्मयप्रकाराविषयीच नावड आहे हे म्हणणे चुकीचे आहे. त्यांना विशिष्ट प्रकारच्या कवितेविषयी अनास्था व नावड आहे. आपण ज्यांना लोक म्हणतो त्यांत ढोबळमानाने दोन भाग करता येतील. एक भाग मुंबई-पुण्याच्या पिढीजाद बुद्धिजीवी वाचणाऱ्यांचा; याना सत्यकथा अन चित्रेखानोलकर कळत नाहीत, भिडत नाहीत, आवडत नाहीत—हातातही घ्यावेसे वाटत नाहीत.

त्यांना श्रमिकांचे व दलितांचे नवे काव्यही हातात घ्यावेसे वाटत नाही—त्यांना ते गांवढळ, बालिश, गुळगुळीत अन आक्रोशी व प्रचारी वाटते. हा बुद्धिजीवी वर्ग कवितेपासून दूर आहे तो या कारणांकरता दूर आहे. त्याच्या जगण्याशी व मरण्याशी या दोन्ही प्रकारच्या कवितेचा काडीइतकाही संबंध उरलेला नाही. दुसरा विभाग महाराष्ट्रभर तालुका-पातळीपर्यंत पसरलेल्या नवशिक्षित, कामगार-शेतकरी-कारागीर कुटुंबांमधून आलेल्या, अब्राह्मण मध्यमवर्गातील लोकांचा. यातल्या बहुतांश लोकांना कवितेचे दोन्ही प्रकार आवडत नाहीत, कारण त्यांना सिनेमानाटकांतली गीते, भजने व लावण्या आवडतात. जो थोडा विभाग कवितेत रस घेतो-कविता वाचतो, लिहितो अन त्या प्रकाशित होण्याकरता धडपडतो !-तो बहुतेककरून दुसऱ्या तऱ्हेची कविता आवडणारा आहे. पण हा विभागसुद्धा कालांतराने प्रगल्भ झाला की त्याचेही मुंबईपुण्याच्या मध्यमवर्गासारखेच होईल अशी दाट शक्यता आहे. म्हणजे कविता व जनता यांत पुन्हा प्रचंड दरीच. जर कविता आजच्यासारखीच राहिली तर हेच होईल. प्रचार व आक्रोश यांना सर्व लोक कंटाळतील ( लोक वाटतात त्यापेक्षा जास्त प्रगल्भ रसिक असतात ! ), अन सूक्ष्मतर, चमत्कृतिपूर्ण, अनाकलनीय प्रतिमा व आशय यांनी साचलेली उच्चभ्रू कविताही ते हातात घेणार नाहीत.

'साहित्यगुण, प्रगल्भता, सूक्ष्मता' आणि 'लोकांना भिडण्याची ताकद' अशा दोन्ही गोष्टी बाळगणारी कविता असू शकते का ? ती कशी असेल ? या प्रश्नाचा विचार आता झाला पाहिजे. नाहीतर कवितेचे काही खरे नाही. कोणी या प्रश्नाचा विचार करील, कारण त्याचे कविता व लोक या दोहोंवर प्रेम आहे. कोणी यासाठी, की त्याचे लोकांवर प्रेम आहे आणि त्यांना चांगली कविता मिळावी असे त्याला वाटते आहे. फक्त कविता एकें कविता करणारे म्हणतील, आम्हाला काय लोकांचे देणेघेणे आहे ! याला दोन उत्तरे आहेत. एक व्यावहारिक आहे : जर कवितेचे ' सामाजिकीकरण ' झाले नाही तर लोक राजेश खन्नाला महालात बसवितील आणि आरती प्रभूला दारिद्र्यात ठेवतील; कवींना खर्डेघाशी करायला, बोटचेपेपणा करायला आणि पैसेवाल्यांच्या कलाने जगायला व लिहायला लागेल. दुसरे कारण ' कलात्मक ' आहे : कविता पुढे जाऊ शकते, नवी-अधिक प्रगल्भ-चांगली रूपे घेऊ शकते ती सतत जीवनाशी भिडून, झगडून—जास्त जास्त व्यापक व गुंतागुंतीच्या जीवनाशी, लोकांच्या संपूर्ण जीवनाशी. जर कविता व जनता यांतला विरोध सांधणारी ( खऱ्याखुऱ्या समाधानकारक तऱ्हेने सांधणारी ) कविता निर्माण झाली तर तुमची कविता विहिरीतल्या बेडकाचे अंग फुगवणे राहील.

असो. प्रश्न असा आहे की अशी लोक-कविता कशी असेल ? आणि लोक-कविता या शब्दाने छातीत धस्स झालेल्यांना सांगितलेले बरे की लोक-कविता म्हणजे झुंड-कविता नव्हे किंवा बाजारू सामूहिक छापाची कविता नव्हे— जशी लोक-शाही म्हणजे रानटी आंधळी समूहसत्ता नव्हे किंवा निवडणुकांमधली संधिसाधू सौदेबाजी नव्हे. लोकशाही म्हणजे जशी विविध, स्वतंत्र व्यक्तित्वांची एकात्मता, तशीच लोककविता म्हणजेदेखील कोणत्याही साच्यात न बसणारी परंतु लोकप्रिय कविता. 'लोककविता कशी असेल ?' या प्रश्नाला एक उत्तर नाही, असू शकत नाही. आणि मुळातच हा प्रश्न तात्त्विक उत्तर देण्याचा नाही, तर मूर्त स्वरूपात अनेक कवींनी व लोकांनी आपल्या कृतींमधून उत्तर देत रहाण्याचा प्रश्न आहे. काही सर्वसाधारण गोष्टी तुम्ही सांगू शकता, पण त्याही स्थलकालसापेक्ष असतात. जसे, ही कविता सुबोध असावी : पण सुबोध म्हणजे काय हे सतत बदलत जाणार. म्हणून ही उच्च प्रकारची कविता कशी असावी या प्रश्नाचे सर्वसाधारण, अमूर्त, तात्त्विक उत्तर देता येणार नाही. पण ती समोर असली तर रसिकतेनें वाचता येईल. कवितेला कंटाळलेले लोक ती वाचू लागतील. सत्यकथेपेक्षा सुवें-दया पवार-ढसाळ जास्त लोकप्रिय आहेत; हा प्रकार वाढत जाईल आणि चांगली कविता व लोकप्रिय कविता यांत अंतर रहाणार नाही.

२. बर्टोल्ड ब्रेख्टची एक लहानशी कविता आहे : 'दुष्टपणचा मुखवटा' :

' माझ्या भिंतीवर लटकतंय एक जपानी कोरीवकाम
एका दुष्ट राक्षसाचा मुखवटा, सुशोभित केलेला सोनेरी
लाखेनं.
सहानुभूतीनं मी न्याहाळतों
त्याच्या कपाळावरच्या तटतटलेल्या शिरा, दर्शवणाऱ्या
केवढा प्रयास पडतो दुष्ट असायला. '

कविता तशी अगदी साधी आहे. पहिल्या तीन ओळींत ब्रेख्ट अतिशय सरळपणे, ठामपणे व थंडपणे एक परिस्थिती समोर मांडतो. लाल, हिरव्या व सोनेरी रंगाचे लाखेचे किंवा कागद्याच्या लगद्याचे असे मुखवटे आपल्याकडे फारसे दिसत नाहीत, पण मधूनमधून पहायला मिळतात. साधारणपणे कथाकली नृत्यात घालतात तसे हे मुखवटे असतात. भीषण, राक्षसी. पण अर्थात शोभेच्या वस्तू म्हणून भिंतीवर टांगायचे— सुशोभित. एक तर प्रेक्षक त्यातले कौशल्य ( ' कलात्मकता ' ) पाहील किंवा राक्षसी दुष्टपणा त्याच्या मनात भरेल, भय निर्माण करेल.

पण तिसऱ्या ओळीत एकदम वेगळेच घडते. हा जो माणूस मुखवट्याकडे पहातो आहे तो काहीतरी वेगळ्याच प्रकारे पहातो आहे असे आपल्याला जाणवते. सहानुभूती ? कसली, कशाबद्दल सहानुभूती ? आणि पुढच्या दोन ओळींतून हे कोडे सुटते. मग जाणवते की हा प्रेक्षक वरवरच्या देखाव्यात गुंतून पडणारा नाही. तो या दृश्यमान परिस्थितीमागे जाऊन सूक्ष्मपणे, क्रिटिकल वा समीक्षात्मक दृष्टीने, खोलवरच्या वास्तवाचा वेध घेऊ बघतो आहे. तसेच तो जीवनात—फक्त शोभेत नव्हे--रस घेणारा अन माणसाविषयी, माणसाच्या गुंतागुंतीच्या अंतःस्थ 'रहस्या'विषयी आस्था बाळगणारा आहे. इतका की तो या दैत्याकडेही सहानुभूतीने पहातो आहे.

आणि शेवटच्या ओळीत ही साधीच्च पण विलक्षण तऱ्हेने बांधणी केलेली रचना पूर्ण होते. दुष्टपणा व सहानुभूतीने पाहिल्यास दिसणारी दुष्टपणाच्या मागची गुंतागुंत आपल्या लक्षात येते. दुष्ट माणसे स्वभावतःच विनासायास दुष्ट नसतात; ती एक प्रक्रिया असते. अन या प्रक्रियेत इतरांइतकाच त्रास व यातना या दुष्ट माणसालाही सोसाव्या लागत लागतात. दुष्ट माणूसदेखील समाधानी व शांत नसतो. तोही ताणाखाली वाकलेला असतो, माणूसपणापासून दूर गेलेला असतो, अंतर्विरोधपूर्ण असतो. आणि जर आपण माणसाला महत्त्वाचे व मूल्यवान मानत असलो तर आपण दुष्ट माणसांचा द्वेष करून भागणार नाही. उलट आपण दुष्टपणा समजून घेतला पाहिजे व सहानूभूतिपूर्वक त्याची कारणे दूर केली पाहिजेत. आपले धोरण 'रोग नष्ट करून रोग्याला वाचवण्याचे' असायला हवे, रोग्यालाच नष्ट करण्याचे नव्हे.

अन मग एकदम 'सोनेरी लाखे'च्या उल्लेखाचा वेगळाच अर्थ मनात येतो. भांडवलदार वर्गातली माणसे दुष्ट असतात. ती नफ्यासाठी पिळवणूक व युद्धे करतात. पण खरोखर ह्या माणसांचा द्वेष करण्यात काहीच अर्थ नाही. या समाजव्यवस्थेने त्यांना सोन्याचांदीने मढवलेले राक्षसी मुखवटे घातलेले आहेत. मार्क्स म्हणतो त्याप्रमाणे भांडवलदार व्यक्ती ही सर्वशक्तिमान भांडवलाची नोकर असते, गुलाम असते. कितीही त्रास घेऊन तिला भांडवलची सत्ता व या व्यवस्थेचे नियम मानावे लागत असतात. कामगारांच्या द्वेषाचे व शत्रुत्वाचे लक्ष्य खरे तर ह्या व्यक्ती नाहीत, भांडवलशाही व्यवस्था आहे. आणि त्यांना जो समाज आणायचा आहे त्यामध्ये कोणावरही दुष्ट असण्याची त्रासदायक सक्ती असणार नाही.

३. आता तसे पाहू गेल्यास या कवितेत वेधक, निवडक, आशयसंपृक्त प्रतिमांची व शब्दांची रेलचेल नाही. तारकांचे थवे, भ्रमररात्री, दिवसभरची

अनुत्तरित सुन्नता, रेशीमकोष, श्वासांचा ताल, वगैरे काही नाही. तसे पाहिल्यास भावनांची व आशयाची सूक्ष्म चिरफाड आणि पुनर्रचना नाही. 'ट्रू ह्यूमन कंडिशन' अथवा 'एकाकी व्यक्तीचे वैफल्य' असले तत्त्वज्ञानात्मक उत्कट उद्‌गार नाहीत. कवीने स्वतःच्या कलात्मक गाभ्यातून बुडी मारून काढलेली अबोध, गूढ थरथरती सत्ये नाहीत. अत्यंत साधी, थंड अशी ही कविता आहे. पण फार ताकदीने सुचवणारी आहे. माणसाच्या गाभ्याचे सखोल दर्शन घडवणारी आहे, वरवरच्या व परिचित जीवनापलिकडे जाऊन जगण्याचे मूळ संदर्भ स्पर्शणारी आहे. एक मानवतेचे प्रेम त्यात आहे, चक्क बोधामृत व प्रचारसुद्धा आहे.

आणि मला वाटते ती लोकांना आवडेल व कळेल अशी एक चांगली कविता आहे. कदाचित आज ती थोड्यांनाच आवडेल. पण अशा प्रकारच्या साहित्याची गोडी लोकांना लावणे **शक्य** आहे. लोक ज्ञानेश्वर-तुकाराम वाचतात व आवडीने वाचतात हे विसरून जाणे बरोबर नाही.

ह्याच प्रकारची कविता उच्च प्रकारची मानावी असे नाही. अनेक प्रकारे कविता उच्च दर्जा व लोकप्रियता दोन्ही एकत्रितपणे साधू शकेल. कदाचित ब्रेख्टच्या कवितेएवढी वैचारिक व भावनारहित अशीच नेहमी ती नसेल. तिच्यात प्रतिमा व भावना असतील. तिची रचना जास्त गुंतागुंतीचीही असेल. पण तिच्यात जीवनाला भिडण्याची, जगणाऱ्याला उपयोगी पडण्याची व प्रगल्भ वृत्ती व्यक्त करण्याची ताकद असेल. विचार व भावना, आत्माविष्कार व निवेदनक्षमता, कलात्मकता व प्रचारात्मकता अशा अनेक द्वंद्वांची सोडवणूक अशा कवितेत असेल. ती सोडवणूक कशी असू शकते याचे एका प्रकारचे लहानसे उदाहरण म्हणून ही कविता येथे घेतली होती. 'आम्ही नव्हतो आमुचे बाप, उगाच का मग पश्चात्ताप' किंवा 'विश्वाचा विस्तार केवढा, ज्याच्या त्याच्या डोक्याएवढा' अशा केशवसुतांच्या ओळींमध्ये हीच शक्ती दिसते. मर्ढेकरांच्या-मध्ये दिसते. सुर्वे-ढसाळ यांच्यातही बऱ्यापैकी दिसते. पण आजची बरीचशी मराठी कविता या सामर्थ्याला पारखी झालेली आहे. तिच्यातला जिवंतपणा व डोळसपणा नष्ट झालेला आहे. तिचा उपयोग संपलेला आहे.

आजची कविता वाचनीय नाही हे लोकमत आहे. ते तसे असण्याचे कारण लोकांच्या अडाणीपणात आहे अशी ठाम व सोयीची समजूत करून घेण्यापेक्षा, याचे कारण आजच्या मराठी कवितेतच आहे अशा वृत्तीनें बघायला जर सुरुवात झाली तर मराठी कवितेच्या पुढच्या वाटचालीला थोडेसे सोपे जाणार आहे.

# दोन कविता : गिरीश शिरसाळकर

## हॉलंड– १ : लॅन्डस्केप आणि मी

इथल्या स्वप्नमय वातावरणांत
मी पण स्वप्नमय
लॅन्डस्केपच्या चित्रांत शिरल्यासारखा

गोठून गेलेल्या रस्त्यावर
एकटाच बर्फाळलेला
हिमनगांचे तळ शोधीत येथवर आलों
तेव्हां हिमनग पोकळच आढळले
मग वाट चुकलेल्या मुंगीसारखा
फिरफिरलो माझा जथा शोधीत. तेव्हां
रस्त्यालगतच्या कॅनॉलमध्ये एकटेंच बदक
स्वतःभोवतीच आनंदाने गिरक्या घेतांना दिसलें

आणि मी ओव्हरकोट स्वतःभोवती घट्ट आवळत
शीळ घालीत चालूं लागलो. उडत उडत.

## मीही उठलों नकळत

आतां सारंच संपलं
असं समजून मी
निस्तेज क्षितिजाकडे
पहात असतांनाच
क्षितिजाला पान्हा फुटला रक्तधार. तेव्हांच
काल-मेलेलीं कलेवरं पुन्हा
हालूं लागलीं
मृत्यूसाठी.

मीही उठलों नकळत
आणि रीतसर
शौचकूपांत जाऊन बसलों.

सुरेश मथुरे

# स्टफ करून ठेवलेला पक्षी

स्टफ करून ठेवलेला पक्षी
किती जिवंत दिसतो नाही ?
वाटतं आतां हा उडेल
फडफड करून अथवा डसेल
कर्कश ओरडून हाताला.
म्हणून मी दूरच उभा राहतों.
नाकांत कोंबून तपकीर
तरतरी आणतों
नि मग बेफिकीरपणे सिगारेटी धुराची
देतों लोटून आकाशगंगा त्याच्यावर.
तरी तो स्तब्धच उभा राहतो
मी भेदरतों त्या स्तब्धतेने.
खिशांत लपवून मनाची मरगळ
छपवतों मी डोळे चष्म्याआड
केसही करतों डायने काळे.
पण हें सारें तो पहात नसेल ना
आपल्या उघड्या बेबंद डोळ्यांनी ?
नाहीतर जायचा उडून
कपाटांतलें आकाश सोडून
आकाशाच्या कपाटांत ... तो गेला
तर कपाटांत कोण बसणार, श्वास
रोखून ? ... काय ? मी ! !

परेन शिवराम जांभळे

## धुवाँधार पाऊस

१.

धुवाँधार पाऊसधारा नि प्रकाशाचा फिक्कट तवंग
थरकणारीं चिंब अंगें डोळ्यांच्या आरपार
पिल्लांना पंखांची ऊब देणारी अथक चिमणी
गात्रांतून हिरवे धुमारे पेटविणारें आलिंगन
–या चित्रांतून मी आतां उठून जात आहे.

२.

रक्त गोठवणारे निर्णायक प्रताप
माझ्या बेजान देहावर लागोपाठ कोसळताहेत
अशा वेळीं
बेभान वातचक्रांला न जुमानतां
पलिकडील पहाडाच्या दिशेने मला वारंवार कोण हाकारतें आहे ?

३.

माझ्या स्वप्नांवरही माझा हक्क नाहीए
माझ्यासाठी कुणी डोळ्यांत अगस्ती रिचवूं नये
दुखऱ्या क्षणांनी भोगलेले कापरे क्षण
अंधाराला पहारेकरी करून झोपले आहेत.

दिलीप घोलप

## जेथे रवी तो थांबला

पांखरांची एक शाळा जी इथे होती कधी
आज त्या उध्वस्त गांवीं शोधतों मी सावली
सूर्यछाया जी कुणाला ना कधीही गावली
आज ती गीतांत माझ्या आसवांनी ओवली
सूर्य-पश्या सावलीने जे दिले डोळे मला
त्याच डोळां पाहतों अंधाररात्रीं कारवा
चाललों मी त्या तिथे जेथें रवी तो थांबला
सांगतों कानांत त्याच्या थांबला तो संपला...

## भुतांच्या जंगलांतील कवीचं मरण

दोन कविता :

गुरुनाथ धुरी

मला स्मशान पहायचंय. चिता.
जिथं माणसं पंचमहाभूतांत विलीन होतात
एवढं हे घनदाट जंगल पार केलं कीं स्मशान आलंच...
झाडांच्या मांडवाखाली
भुतांच्या जोडप्याने चूल पेटवली तीन दगड मांडून
अन्न रांधलं, खाल्लं
लांब लांब टांगा टाकीत दोघं निघून गेलीं
निखारे तेवढे जळत मागे राहिले...
मी जळणारा भवतापाने
त्या चुलीसमोर अनपेक्षित उभा
मनांत खोलवरून येणारा मांसाचा जळका दुर्गंध
माझ्या भोंवती कडं करून
भुतं कधीं उभीं राहिलीं कळलंच नाही...
हाडाचा तिरडी, चंद्रप्रकाशाची चादर,
डोळ्यांचे गुलाब नि भावनांचा गुलाल
भुतं झांजा वाजवताहेत...
स्मशानच भेटीला आलंय माझ्या
हा अपूर्व सोहळा !
भुतांच्या डेरेदार जंगलांत
सावकाश...अगदी सावकाश जळत चाललेला माझा आत्मा

अगदी एकटा...

### शोकगीत

जिथल्या गर्द झाडांखालून जायचों मी तंद्रींत
ऐकत दूरस्थ घंटानाद कवितेचे
ती ही शांत गल्ली
: आज दोन्ही बाजूंचीं घरं ढासळून गेलींत...
गल्ली पाचोळ्यानं भरून गेलीय...
किती वर्षांचा हा पाचोळा !
हा पाचोळा असाच वाढत जाईल
शून्यतेचें शोकगीत म्हणत
झाडांच्या गळाभर...त्याहीवर...सावकाश

राजा पाटील

## क्षणांत एका

क्षणांत एका ढळायचें तर
दंवबिंदू चल होऊं आपण
दिपवून टाकूं अखील दुनिया
किरणशलाका उरिं जागवुन

क्षणांत एका झरायचें तर
मृगसरीपरी झरूं या आपण
या मातीच्या कणाकणाला
सृजनाचा वर टाकूं देऊन

क्षणांत एका विरायचें तर
इंद्रधनु बघ होऊं आपण
जगास साऱ्या कुतुहल होऊन
दोन ध्रुवही सोडूं व्यापुन

क्षणांत एका रिघायचें तर
जलतरंग रे बनुं या आपण
द्वैतामधुनी अद्वैताचें
सांगूं नातें एकच होऊन

क्षणांत एका विझायचें तर
जळुं या आपण हासत हासत
जमेल तितुका तम भवतीचा
राहूं उजळत...राहू उजळत...

क्रं. श्री. पेडणेकर

## वेश्या

वेदना जखडते मना
निधर्मी आशा
ही सदेह निर्मन वेश्या
कृतार्थ, अर्थपरायण
तुलसीकृत रामायण
वाचते. नाचते पुरुष पाहुनी
अतिरंजित नट्टापट्टा
लोळते मस्त गाउनी
बेडौल नग्न बेहोशी
पुरुषांचें यौवन पोशी

पुरुषोत्तम बोरकर

## अखेर

आयुष्याचें बेरहम ओझें खांदे खचलेल्या पाठीवरून वाहतांना
अखेर काफिला गाठतांच आला नाही.
शब्दांचे पांचू आणि डोळ्यांचे मणि
बेफिकीरपणे चौकाचौकांवर उधळून लावण्याआधी
एखादीच गझल पुरे होती...
ऐवज लुबाडलेल्या आवाजांतली.
भरदुपारची जांवघेणी चढण चढतांना
देहाचे पाय धुळीच्या गदारोळांत धूळ झाले
अन् त्याच वेळी उतरणीच्या चांदण्याला घाई झाली
चाद फुलाविण्याची.
छातीखालचें पोट जेव्हां छाती फोडायला लागलें
तेव्हां पुजावेच लागले देव्हारे खोट्याचखेट्या दैवतांचे
आणि करावाच लागला जयजयकार
प्रतिष्ठेची चांदी सर्वांगाला माखून
दुनियेच्या बाजारांत वावरणाऱ्या संभावितांचा !
कधीकाळी हातात मशाल येईल या आशेवर
आयुष्यांतून एकेक प्रहर वजा करतांना
अखेर काफिला गाठतांच आला नाही...

प्रकाश हरी कालेंकर

## अंधारगर्भावर नजर लावून

झाडं काळपट्ट पडत चाललीं आहेत
आभाळ भ्रमिष्ट
आणि पक्षी सराईत बनेल
गाई विसरून गेल्या आहेत हंबरणं पोटतिडिकेनं
बछडीं विसरलींत झेपावणं उधळून कणाकणानं...
सूर्यास्ताबरोबर नर-मादी गळ्यांत गळा घालून
समुद्राचे तळ धुंडाळतात तेव्हा
आतुर निशा ओठ टेकवून टिपून घेते त्या युगुलांना
मी खिळून उभा आहे कधीचा त्या अंधारगर्भावर नजर लावून !

# युध्दाच्या कविता : राफेल आलबेर्ती; अनुवाद : सतीश काळसेकर

---

**राफेल आलबेर्ती** : हा स्पॅनिश कवी १९०२ साली सांता मरिआ, स्पेन येथे जन्मला. 'देवदूतासंबंधी' हा याचा कवितासंग्रह स्पॅनिश भाषेतील एक महत्त्वाची साहित्यकृती म्हणून ओळखला जातो. १९३१ मध्ये याचा संबंध स्पेनमधल्या डाव्या चळवळींशी आला. नंतरच्या काळात स्पेनमधल्या यादवी युद्धांत हा कवी स्पेनच्या प्रजासत्ताकाच्या बाजूने उभा राहिला. १९३९ च्या सुमारास प्रजासत्ताकाच्या पराभवानंतर फ्रँकोच्या राजवटीमुळे या कवीला निर्वासित व्हावे लागले. त्यानंतर बूएना-एअर्स ( अर्जेन्टिना ) मध्ये वास्तव्य.

---

## ते कोसळलेयत आणि कोसळले नाहीयत

इतस्ततः उन्हांत अन् थंडींत, पावसांत अन् धुक्यांत,
अडकलेले गोळ्यांनी उकरलेल्या खळग्यांतून,
विधवांच्या झिरझिरीत वस्त्रांत गुरफटलेयत मृत;
त्यांचं रक्त करतंय गवतावर सळसळ
आणि अमानुष स्वरमेळ

तरुण— तें होतं आवश्यक—
रोवलेयत दुःखी मातींत
तिने त्यांना जन्म दिलाय,
पुन्हा एकदां बी
युद्ध नांगरल्या जमिनींत.

ऐक त्यांना पुन्हा वाढतांना, ताजी वाढ
आणि हळूवार शिरकाव मातीच्या कठीण कवचांतून
आकारत नव्या धान्याच्या निशाण्या,
आकारत भविष्यकाळ गव्हाचा.

तुम्ही म्हणालात का की ते मरण पावलेयत ? तर ऐका
त्यांची कुजबूज वाढत जाणारी गाण्यांत
गोळीबाराच्या खणखणीसमोर,
पार निराळी कुदळी आणि फावड्यांहून अंत्यविधीच्या.

ते नाहीयत आयुष्याच्या आठवणीपल्याड,
ते गातायत आमच्या योद्ध्यांबरोबर
त्यांचे चेहरे सामोरे मोकळ्या वाऱ्याला,
त्यांचे आवाज सामोरे खुल्या समुद्राला.

## देखावा रात्रीचा

जेव्हा एखादा दुःख भोगतो स्वप्नाशिवाय खुषशा रक्तामुळे
जेव्हा तिरस्कार थरथरतो निरखत अस्थींतून
आणि सूड पेटतो अखंडित,
तेव्हा शब्दांना नसतो अर्थ :
ते असतात केवळ शब्द.

गोळ्या. गोळ्या.

धुकं दाबलेलं आणि ढग विस्मरित धुराचे
जाहिरनामे आणि भाषणे;

कागदी वेदना घासण्यासाठी वाऱ्यांसमोर
दुःख शाईचं पसरण्यासाठी पाण्यावर.

गोळ्या. गोळ्या.

आतां मी भोगतोंय दुःख आणि निराशा
आणि मरण खोल विवराच्या मुखासारखं
भरून भाषेनं जिला रडायचंय मोठ्यानं
आणि तरीही शांत नेहमीच.

गोळ्या. गोळ्या.

आज रात्रीं असं वाटतंय की
शब्द आहेत जखमा
मरणाच्या.

## —आणि युद्धानंतर

होय, या शिस्तबद्ध तोडमोडीनंतर, ही अत्यावश्यक घाई,
हा तांतडीचा पदबंध त्यांत मी जगतोंय,

निःसंदिग्ध शब्द येईल पुन्हा परतून माझ्यापर्यंत पूर्ण विशुद्ध–
नेमकं विशुद्ध क्रियापद नेमक्या विशुद्ध विशेषणांसोबत.

आणि माझं हृदय असेल नवजात
आणि माझी वाणी पुन्हा धरील सावल्या अप्रकाशित सर्जनाच्या,
डोंगरांची हिरवट व्यक्त होईल पुन्हा
आकाश कुजबुजेल निळं पुन्हा
समुद्रासारखं.

✠

अव्यक्त

## हाताच्या अंतरावरून दूर जातांना

हाताच्या अंतरावरून दूर जातांना
विचारायचे नसतात प्रश्न.
न मागतां मिळालेल्या उत्तरांचा साभार स्वीकार
आणि निरोपादाखल एखादा नमस्कार
एवढीच अपेक्षा असते तुमच्याकडून.

स्वतःला सावरत निघून जातांना
म्हणावं
की आयुष्य काय
कसंही संपतंच

अंबरीष मिश्र

## तरीही

समजा, की मी एक झाड झालोंय !
वडाचं, पिंपळाचं—किंवा अशोकाचं...कुठचंही घ्या !
पण मला फांद्या नाहीत
की पानं नाहीत की फुलं नाहीत की सावली नाही.
काही नाही. तर मग मी कोण ? ओळखा पाहूं !

किंवा असंही समजा—की मी एक समुद्र आहे.
कुठचाही समुद्र. ॲटलांटिक, पॅसिफिक, काळा, तांबडा.
पण तरीही मी खोल खोल नाही
की गहिरा गहिरा नाही !
निळ्या खारट लाटांचा जीवघेणा गंध नाही
की शिंपले—मोती नाहीत
की माझ्या पोटांत सोनेरी खवल्यांच्या मासोळ्या नाहीत.
तर सांगा की मी कोण ?

मित्रहो, तरी मी एक झाडच आहे !
तरी मी एक समुद्रच आहे !!

अनिल दिगंबर कुळकर्णी

## उभ्या झाडांना पांगळं करून

उभ्या झाडांना पांगळं करून
तो निघाला विस्तवाच्या पायवाटेने
उरलेल्यांनी त्याला थरथरून सलाम केले
दूरचें निळें आकाश आणि लगतचा डोंगरघाट
ह्यांत तो गुदमरून गेला
तेव्हां उन्हाचे जळते पट्टे
एकाकी झोपड्यांना भाजून काढताना त्याला दिसले.
वेश्येचें पावित्र्य आणि पतिव्रतेचें अनैतिकपण
याचा विचार करीत असतांना
आपोआप संध्याकाळ झाली
दुरून येणाऱ्या प्रार्थनांचे आवाज
त्याला प्रथमच निरर्थक आणि बेसूर वाटले.
सावल्यांचें अनायास नसतेंपण पांघरून
तो परत आला
तेव्हां तुटलेल्या झाडांचे आक्रोश तेवढे ऐकूं येत होते.

लघु-अ-नियतकालिक. अंक ५/१० : १० सप्टेंबर ७६.
मुद्रक-प्रकाशक : सुशीला पानसे, ज्ञानविज्ञान प्रकाशन, सोनोरी, ३६ चरई, ठाणे ४०० ६०१. मुद्रणस्थळ : संगम प्रिंटिंग प्रेस, जुना मुंबई रस्ता, ठाणे ४०० ६०१.
संपादक : रमेश पानसे, सुनील कर्णिक.

रमेश पानस

# कवितेची कात टाकून

कविता उलगडण्याचा हा एक प्रयत्न. वाचताक्षणीच चांगली वाटलली कविता ही नेमकी कशामुळे चांगली वाटली हे शोधण्याचा, या 'चांगलेपणा'च्या मागच्या कारणांचा वेध घेण्याचा हा प्रयत्न.

कविता ही शब्दांच्या काही विशिष्ट मांडणीतून उभी रहते. हे शब्द, नेहमीच्या व्यवहारातील अर्थ किंवा रूढार्थ, सूचितार्थ, प्रतिमांकित अर्थ असे वेगवेगळ्या स्तरांवर विभिन्न 'अर्थ' दर्शवीत असतात. कविता समजावून घेताना किंवा तिचे सौंदर्य उलगडताना हे विविध 'अर्थ' तपासून पहावे लागतात. त्यातून कवितेचा आकृतिबंध आणि आशयबंध स्पष्ट होतो.

इथे एक आठ ओळींची कविता घेतलेली आहे. विश्लेषणाच्या सोयीसाठी ओळींना अ, ब, क, ड आणि ह, ळ, क्ष, ज्ञ अशी अक्षरे आणि विश्लषणात ज्यांचा उपयोग करावयाचा आहे अशा काही शब्दांना किंवा शब्दबंधांना १ ते १० पर्यंत आकडे दिलेले आहेत.

अ चित्रांतून (१) पक्षी (२) उडतात (३)

ब तेव्हां चित्र आकाश होतें (४)

क आकाशांत पक्षी (५) दिसतात

ड तेव्हां आकाश चित्र असतें. (६)

ह मी–तू जवळ (७) असतों

ळ तेव्हां आपण चित्र होतों (८)

क्ष आकाश मात्र एकटें (९) असतें

ज्ञ फक्त चित्र पहात बसतें. (१०)

कविता वाचताक्षणीच ठळकपणे जाणवणाऱ्या गोष्टी अशा

१) पहिल्या चार ओळींत वस्तु-निष्ठ चित्रण आहे तर दुसऱ्या चार ओळींत व्यक्तिनिष्ठ चित्रण आलले आहे.

२) पहिल्या चार ओळींत चित्र, आकाश आणि पक्षी यांची पुनरुक्ती होते; आणि तीही विशिष्ट पद्धतीने, म्हणजे (अ) चित्र–पक्षी (ब) चित्र–आकाश (क) आकाश-पक्षी (ड) आकाश-चित्र अशा तालबद्धतेने.

३) पहिल्याच ओळीतील निर्जीव चित्रातून पक्षी (सजीव होऊन) उडतात ही चमत्कृतिजन्य कल्पना बंधक वाटते.

४) पहिल्या दोन ओळींत 'चित्रा'चे रूपांतर 'आकाशा'त होते तर पुढील दोन ओळींत 'आकाशा'चे रूपांतर 'चित्रा'त होते आणि येथे एक कल्पनाकृती पूर्ण होते. हे 'रूपांतरा'चे कार्य 'पक्षी' एकीकडून (चित्रातून) दुसरीकडे (आकाशात) गेल्यमुळे होते.

५) दुसऱ्या चार ओळींत 'पक्षी' नाहीत; तर त्यांची जागा 'मी–तू'ने घेतलेली आहे,

६) ह, ळ या दोन ओळींत 'मी–तू' या मानवी घटकांचे वस्तूकरण (चित्र) होते, तर क्ष, ज्ञ या दोन ओळींत 'आकाश' या वस्तुघटकाचे मानवीकरण होते.

७) अबकड या चार ओळींत मानवी भावनांना कुठेच स्थान नाही-त्या केवळ वस्तुनिष्ठ घटकांच्या वर्णनात्मक स्वरूपाच्या आहेत. याउलट ह ळ क्ष ज्ञ या चार ओळींतील आकाशाचे 'एकटेपण' आणि फक्त 'चित्र पहात बसण्या'ची क्रिया या गोष्टी दुःखाची–विमनस्कतेची आणि विफलतेची भावना व्यक्त करतात.

८) ब, ड, ळ, ज्ञ या ( एका आड येणाऱ्या ) ओळचे सुरवातीचे शब्दही तालदृष्ट्या विचारात घेण्यासारखे आहेत. यापैकी ब ड आणि ळ यांची सुरुवात एकाच 'तेव्हा' या कालसूचक शब्दाने होते तर ज्ञ ची सुरुवात वेगळ्याच 'फक्त' या शब्दाने होते.

या 'ओळीं'च्या विश्लेषणानंतर आपण अधिक खोलवरच्या अशा 'शब्दां'च्या विश्लेषणाकडे वळू या या विश्लेषणातून दोन गोष्टी दिसून येणार आहेत एक म्हणजे वेगवेगळे शब्द आपल्या अस्तित्वाने सुचवीत असलेली 'स्थिरता' किंवा 'गतिमानता' आणि त्यांची संपूर्ण कवितेभर जाणवणारी आंदोलने आणि दुसरे म्हणजे शब्द किंवा शब्दबंधांतून निर्माण होणारे भाव. पहिली गोष्ट आकृतबंध स्पष्ट करणारी असून दुसरी गोष्ट आशयबंध स्पष्ट करणारी आहे.

अ १ हा शब्द 'स्थिरता' आणि ३ हा शब्द 'गतिमानता' सुचवतो. २ (पक्षी) हा शब्द १ आणि ३ या शब्दांतील संबंधदर्शक शब्द असून शिवाय तो स्थिरता आणि गतिमानता दोन्हींचा सूचक आहे.

ब चित्रातील नजर धरून ठेवणारा बिंदू (पक्षी) नाहीसा झाल्यामुळे चित्र पोकळ वाटू लागते. इथे 'आकाश' प्रतिमा म्हणून येते शिवाय 'आकाश' हा शब्द उच्चारल्याबरोबर एक विशालता डोळ्यासमोर उभी राहते.

क आकाशात असलेला (उडणारा) पक्षी म्हणजे ५ हा शब्दबंध 'गतिमानता' सुचवतो.

ड आकाशातील दूरस्थ पक्षी आकाशाचे रूपांतर चित्रात करतो म्हणजे ६ हा शब्दबंध 'स्थिरता' सुचवितो. शिवाय आकाशाचे रूपातर चित्रात होण्याने, म्हणजेच 'चित्र' हा शब्द आकाशाच्या संदर्भात वापरल्यामुळे आकाशाच्या कक्षा मर्यादित होतात. वर उल्लेख केल्याप्रमाणे पहिल्या चार ओळींमध्ये चित्राचे रूपांतर आकाशात आणि आकाशाचे रूपांतर चित्रात होऊन एक कल्पनाकृती पूर्ण होते; तसेच हा एक पूर्ण झालेला आशयबंधही मानता येईल.

ह ७ हा शब्दबंध स्थिरता सुचवितो. शिवाय आतापर्यंतच्या केवळ वस्तुनिष्ठ चित्रात 'मी-तू जवळ'ने मानवी भावभावना येतात.

ळ ८.हा शब्दबंध पुन्हा स्थिरता सुचवतो. परंतु त्याच वेळी आशयदृष्ट्या ७ आणि ८ हे शब्दबंध भावनांची उत्कटता आणि आणि जवळपणाच्या उत्कटतेतून प्रकट होणारी गतिमानता सुचवतात.

क्ष ९ हा शब्दबंध स्थिरता सुचवतो. शिवाय यातील 'एकटे'पणाच्या ७ मधील 'मी-तू'शी विरोधी संबंध ('मात्र' या शब्दाने) सांगितलेला आहे.

ज्ञ १० हा संपूर्ण शब्दबंध एक (पाहण्याची) क्रिया व्यक्त करतो आहे— म्हणजे एक 'गतिमानता' सूचित करतो आहे. तसेच शेवटचा 'बसतें' हा शब्द 'स्थिरता' सुचवतो. तसेच तो वरील ९ या शब्दबंधाने केलेले, आकाशाचे मानवीकरण पूर्ण करतो. शिवाय ९ आणि १० हे दोन्ही शब्दबंध एकत्रितरित्या पूर्वी आलेल्या दुःखाच्या भावनेची 'विशालता' सुचवितात. म्हणजेच या ठिकाणी दुःखाच्या भावनेची कक्षा रुंदावली. या घटनेचा वरील ६ या शब्दबंधातील (आकाशाची कक्षा मर्यादित करण्याच्या) घटनेशी विरोधी संबंधही लक्षात घेण्यासारखा आहे.

आशयदृष्ट्या सौंदर्यनिर्मिती करणारा आणखीही एक संबंध स्पष्ट करता येण्यासारखा आहे. तो म्हणजे, शब्दबंध ५ मध्ये आकाशात 'पक्षी' आहेत

(पान सत्त्याऐंशी पहा)

किशोर दीक्षित

## बेइमानी पावलांनी

अर्थ ना उरला कशाला, शून्यता पदरांत कां ?
बेइमानी पावलांनी दाविली ही वाट कां ?

मी कसा होतों, कसा झालों—मला समजेच ना;
आज कां डोकावती या आत्मघाती प्रेरणा ?
कंठ का वेंचून घेतो काळजाचा हुंदका...

दूर कोठें भग्न आहे सागराची आर्तता;
मी इथे झुरतों तमाच्या वेदनेची सांगता.
आज अंधारून आल्या अंबरींच्या तारका...

तोडिले मीं रेशमाचे बंध सारे चालतां
आंस मीं जोपासली जी दूर त्याची पूर्तता...
मीं सुखाचा शोध घेतां जाहलों हा पोरका !

सुरेश कदम

## प्रार्थनामंदिरांत

प्रार्थनामंदिरांत
घंटेच्या निनादाखेरीज नसतंच कांही सत्य
कातरवेळीं शहारे उमटतात-अंगावर
प्रार्थनामंदिरांत आळवले जाणारे सूर
देहासभोवार तेच
कुणाच्या भीतीनं वाजतात घंटा घणाणा घणाणा
घंटा वाजविणारे हात तरी कुणाचे असतात ?
कसायाला हात कुणी दिलेत ?
रस्त्यावर सर्वत्र मांडलेली प्रार्थनामंदिरें घोर अरण्यासारखीं.
अजून किती चालायचीय वाट...

कृ. श्री. पेडणेकर

# बंगला काचांचा

तसें तिचें माझें
नाही कांही नातें
फक्त गीत येतें
आहे तिचा माझा
( जरा लेचापेचा )
बंगला काचाचा

तिच्यामध्ये आहे
( जरा जीवघेणी )
हृद्य हिरकणी

लावण्याला तिच्या
( जरा फलंदर )
येतात लंगर

लावण्यभाराने
वाकतां ती खालीं
होती उलाढाली

पुरुषोत्तम बोरकर

## साजण

तूं मला हात देतांना
मन गोंदून गेला पक्षी
नि तशी काळजाखाली
ही कुणी कोरली नक्षी...

या अशा गर्द झाडींतून
थरथरला हिरवा शेला;
हा कोण कुणाचा साजण
स्वप्नांना लखडून गेला !

हा पाऊसओला देह
नि कंचहिरवें पाणी;
हा कोण मुसाफिर गेला
ओठावर पेरून गाणीं !

तिथे मेघापल्याड दूर
ओंजळींत घेऊन रान
हें कोण कुणाला रोज
नेमाने देतें दान ?

ही साजणगहिरी सांज
डोळ्यांतून निथळत येते;
पात्रांत दिवे सोडून
हें कोण कुणाला स्मरतें !

गाजा मरनोव्रत

## जळ्यांतल्या चांदण्याची

जळ्यांतल्या चांदण्याची
कशी फुलेंना पाकळी ?
रान वेडावलें तरी
हाक जुईची ना मोकळी...

बंध सुटलेत तरी
कसें थरारेना पाणी ?
निळ्या लाटांच्या ओठांत
बंद कमळाचीं गाणीं !

कसे कस्तुरीचे स्वर
वारा गोंदतो रानांत,
परी एकही पैंजण

कसा वाजेना पानांत ?
कशी झोर लागलेली
साऱ्या फुलांच्या रानाला ?
गंध केवड्याचा कसा
येतो माझिया भानाला ?

ऋ वा इयाऐंशी

## हें कुंकू

दर्पणाशी ही उभी
लावण्याच्या ऐवजाला चिंचातून न्याहाळीत—
पण हिच्या तऱ्हाच अनेक !
मला माहीत नाहीय कधींची आहे तिच्याकडे,
पण चांदीची नेमकी तीच डबी हिने काढली—
चमचमीत लाल गर्द कुंकुवाची !
हलकेंच टिळा रेखिला भाळीं.
काय झालं कळलंच नाही मला—
माझं अस्तित्वच एकाएकीं हादरलं जणू,
तिच्या भाळींचं त्याचं स्थानही मला असह्य झालं.
मी गेलोंय हलकेंच तिच्या पाठीशी,
हळुवार पुसलाय हिच्या भाळींचा चमचमी गर्द टिळा.
"छेः ग, तुला नाही साजत हें असलं कांही—हें कुंकु, हा शिणगार."
तिच्या पांढऱ्याशुभ्र भाळाकडे पहातां पहातांच
तिच्या डोळ्यांतल्या पावसांत चिंब होत गेलों मी...
कुणासाठी असावा हा बिल्लोरी पाऊस ?

---

(पान त्र्याऐंशीवरून)

तर शब्दबंध ९ मध्ये आकाशावर व्यक्तिभावनांचा जो आरोप 'एकटे' या शब्दाने घडविलेला आहे, त्यातून असेही सूचित होते की येथे असलेल्या मानवभावनांकित आकाशाच्या मनात एक (प्रिय) व्यक्ती आहे. म्हणजे खऱ्या आकाशात कुठेतरी दूरवर असणाऱ्या पक्ष्याचे आकाशरूप व्यक्तीच्या मनाच्या पोकळीतील कुठेतरी खोलवर असणाऱ्या व्यक्तीशी साम्य आहे. आणि या साम्याची प्रचिती येते ती संपूर्ण १० हा शब्दबंध वाचल्यानंतर आणि येथे सबध कवितेचा आशयबंध पूर्ण होतो.

या कवितेमध्ये दर दोन ओळी हे एक पूर्ण विधान आहे आणि अशी दोन-दोन ओळींची चार विधाने परस्परांशी आशयाने जोडली गेलेली आहेत. शिवाय कविता १ ह्या 'स्थिरता' दर्शविणाऱ्या शब्दापासून सुरू होऊन, 'स्थिरता-गतिमानता' अशी अनेक आंदोलने घेऊन पुनश्च १० या स्थिरता दर्शविणाऱ्या शब्दबंधाशी विसर्जन पावते. आणि अशा रीतीने कवितेचा आकृतिबंधही पूर्ण होतो.

ऋचा/सत्त्याऐंशी

अशोक बागवे

## नातं

तुझ्या-माझ्या प्रेमाचं मला वर्गीकरण
करतां येत नाही
दैववशात् गोष्टींवर माझा भरवंसा नाही
तुझ्या डोळ्यांच्या बहराला
मीं माझे गाणारे ओठ दिले
बस् एवढं एकच समजतं मला
तुझ्यामाझ्यातून पाझरणाऱ्या सुगंधाचं नातं.

वासंती इनामदार

## बाग

दंवातलीं फुलं हंसलीं
तुझ्या डोळ्यांतल्या चांदण्या पाहून...
किती टिपायचे थेंब मातीने
तुझ्या आभाळसंवादासाठी ?
...अशीच राहूं देत प्रश्नमालिका
तळहातावरच.
उत्तररात्रीं फुलं निथळतील
तुझ्या आठवणींच्या उंबरठ्यावर
ओंजळ धरून...

गोविंद केळकर

## कौरवांच्या चाहत्यांनी

दंभाचींच निरंजन
दंभाचा नैवेद्य
स्वार्थापायी ढोंग सारें
लोभाचा प्रसाद

लटकेंच माया दावी
लटकीच दया
देवल्यासी दंडवत
स्तुतिपाठ गाया

हृदयाला नाही आंच
डोळां मात्र पाणी
उपदेश आस्तिकाचा
कसाब-करणी

खोट्यापायी जीवनाचा
मांडिला बाजार
कौरवांच्या चाहत्यांनी
जिंकिला जुगार

असत्याच्या वेशीवरी
फाशी जाय सत्य
झिजायाचें कुढायाचें
आम्ही येथे नित्य

आणि दुर्दैवानें
प्रत्येक क्षणाला या जगांतील दुःख वाढतंच आहे
त्याच्या वाढण्याचा वेग आहे पायरी-पायरीनं प्रत्येक सेकंदाला तीस मिनिटं
दुःखाचा स्वभावच आहे दुप्पट-दुःख
शारीरिक बलिदान, हौतात्म्य, अतृप्त आंतरिक इच्छा
म्हणजे दुःख, दुप्पट-दुःख
पवित्र दुर्वांचं कार्य आहे दुःख दुप्पट देणं
आणि मग जीवनाचा आनंद भो गा य ला लागतो दामदुप्पटीनं

असं कधींच नव्हत, बा मानवा !
असं दुःख भरून जाणारं छातींत, कोटांत, कोटाच्या खिशांत,
प्यायच्या ग्लासांत, खाटिक-दुकानीं, नव्हतं अंकगणितांत
नव्हती कधी अशी दुःखमय कोमलत।
दूरता अशी की घाव जवळून अशक्य जसे
कधीच नव्हती अग्नीनं अशी सुंदर भूमिका वठवली
थंडगार मरणाची
कधीच नव्हतं रे आरोग्यमंत्र्या
आरोग्य इतकं प्राणघातक
अर्धशीशीही अशी कधीच सणकली नव्हती भ्रूमध्यावर
शरीराच्या फर्निचरला मिळावं दुःख त्याच्या छातीच्या खणांत
हृदयभेद होणारं दुःख छातींत
खुरी पाल, दुःख छातींत भरून आलेली
दुर्दशा वाढतेच आहे, माणसा माझ्या भावांनो
अति वेगानं, जशी एका मशीनचीं दहा मशान कारखान्यांत
जशी रुसोच्या वंशावळीसारखी, आपल्या दाढीसकट
अगद्र वाढतंच आहे ज्याचीं कारणं आपल्याला अज्ञात आहेत
त्याचच स्वतःचा झाडू आणि त्याचा स्वतःचाच एक घनांध ढग
या दुःखाचाच क्रम उलटा करूं या, असं होऊं द्या

की डोळ्यांतून पाणी काढणारा ह्यूमर
रस्त्यावर खडा राहूं द्या
मगच ते डोळे लक्ष वेधतील आणि कान अवधानं
आणि हा कान तत्काल घंटांचे नऊ टोले देईल
प्रकाशाच्या किरणांतून, आणि तत्काल हास्याचे नऊ स्फोट
गव्हाच्या कणसांतून, आणि लगेच नवतारकांची 'किलबिल'
रडण्यांतून, आणि लगेच नऊ सुरीली गाणी
भुकेंतून, आणि नऊ घनगर्जना
आणि नऊ आसूड ओढलेले, न फक्त रडणं
दुःख पंजांत पकडतं आपल्याला
भाऊलोक
मागून, आजूबाजूनं
अणि बसवतं सिनेमा पहायला
रेकॉर्डच्या पिनमध्ये खो-ऊन टाकतं
आणि काढतं उपसून त्याच्या नख्या आपल्या छाताडांतून
उभंटांक कोसळतं आपल्या तिकिटांवरती आपल्या अक्षरांवर
आणि दुःख अतिशय असल्यामुळें आपण प्रार्थना करूं या
मग या दुःखाचा परिणाम म्हणूनच की काय
असे मूठभर असतात जे कूस उजवतात
चार्कीचे वाढतात, बाकीचे मरतात
आणि उरलेले, जे जनमतात पण मरत नाहीत
आणि शेवटी जे जन्मले ना मेले ( हेच असतात बहुसंख्य )
आणि त्याचप्रमाणे या दुःखाचा परिपाक म्हणूनच की काय
माझं डोकं निरास होऊन जातं निराश मी घोट्यांपर्यंत
जेव्हा मी बघतों भाकरीला सुळी देताना
छोटा सलगम रक्तबंबाळ झालेला
घळघळा रडणारे कांदे
धान्य खाद्यं बहुधा पीठ
मीठ, सगळं माती माती होणारं, परागंदा होणारं पाणी
वाइन आणि कांटेरी मुकुट डोक्यावर वागवलेला खिस्त
फिकट पडलेला हिमसेक, आणि कोरडाठाण सूर्य

कसं हो भाऊलोक
मी कसं सांगूं कीं मी हें आतां सहन करूं शकत नाही
याच्या आधीपासूनच इतके फुप्फुसांचे भाते मला नकोत
नको जगायचा इतका अवकाश
दुःखाच्या चुक्चुकूणाऱ्या इतक्या पाली
हा उलटापालटा व्युत्क्रम, इतकीं अंतपार अंतरं
आणि इतकी तहानलेली तहान !
रेड आरोग्यमंत्र्या : आपण काय करूं शकतों !
अहा, दुर्दैवाने, मानवी जीवांनो
इथे आहेत रे भाऊ कित्ती कित्ती गोष्टी अजून
करायच्या बाकी

---

**सीझर व्हॅलेजो :** जन्म १८९५ पेरू देशात; मृत्यू १९३८ पॅरिस शहरी. रशियात फिरून आला. कसंबसं ओढगस्तीत दिवस काढत वर्तमानपत्रांतून लिहीत भुकेल्यावस्थेत मरण पावला. त्याच्याबद्दल नाना स्कूल्सचे नाना प्रवाद आहेत. पण दुसऱ्या महायुद्धानंतरच्या पेरूविअन कवींचा तो स्फूर्तिदाता ठरला त्याच्या कल्पनाशक्तीची अतीव्र संमिश्रता, उदाहरणांची अनेकविधता आणि संलग्न प्रतिमांमुळे त्याच्या कवितांचं बनलेलं एक किर्र् पोत खूप वेळा त्याच्यावर दुर्बोधतेचा आरोप करत असे. मार्क्सवादाकडून घेतलेल्या स्फूर्ती नि ऊर्मी त्याच्या कवितेत कधी ढोबळपणे येत नसत. दुःख भोगणाऱ्या सामान्य माणसाबद्दल अपार सहानुभूती आणि करुणा त्याच्या शब्दा-प्रतिमांच्या नसानसांतून अंतः-प्रवाहासारख्या वहात असत.

शरद साटम

## एकाकीपण

जरूर नसेल तिथंही—
तिथंच तें उगवतं
उगवतं तेव्हां त्याला व्यापायचं असतं
तें माझंच मन.
मग तिथले समुद्र, सूर्य, दिशा,
तू, ऑफिसवर्क
सगळ्यांना तें व्यापतं
नाहीशा करीत होण्याच्या शून्यता
असण्याचं निमित्त
तूतांस
मोकळं ठेवतं
पुढील भलंबुरं मैदान
आणि मी खेळूंच शकत नाही
अशा खेळाचं सामान
हातपाय जोखडून.

विजयकुमार पवार

## उभाच

वाहणारं पाणी
धावणारा वारा
चालणारं आकाश

उजाडलेला दिवस
कंटाळलेली दुपार
विसावलेली रात्र

सरलेला काळ
विरलेली वाट
हरवलेलं घर

उभाच असलेला मी !

परेन शिवराम जांभळे

## क्षितिज

दूर दूर जाणारें हें लोभसवाणें क्षितिज
क्षितिजाचेंदेखील एक गाणें आहे
क्षितिज स्थिर असतें-निदान दिसतें
क्षितिज पुढे पुढे सरकत आहेसें वाटतें
क्षितिज सर्वांना सामावून घेते
क्षितिज सर्वांना पुरून उरतें
क्षितिज सर्वांचें असतें

क्षितिजाचें कोण असतें ?

शांताराम बर्डे

## शांत रस्त्यावर अचानक

शात रस्त्यावर अचानक येतो माणसांचा थवा
एकमेकांना लाथाडत, एकमेकांत अडखडत, बडबडत...
यांच्यासमोर खेळवले जातात चमत्कृती अक्षरांचे भास,
दाखवला जातो आरसा—माकडाला दाखवावा तसा
आणि हजारों इंद्रियांचे खवखवणारे चित्रपट खोदले जातात
एखाद्या पुरातन शहराचा इतिहास खोदावा तसे
किंवा रस्त्यावर पेटवले जातात खवखवणाऱ्या इंद्रियाचे भुईनळे
स-र्र-र्र करीत आकाशाला भिडणारे...

शांत रस्त्यावर अचानक नष्ट होतो माणसांचा थवा
तेव्हा रस्त्याला पडतात स्वप्नें थवा झाल्याचीं...
माणसांचे थवेच्या थवे होतात रस्ते...अनंत...
बिनभरंवशाचे...निरसडे...

निरंजन उजगरे

## आग

आग विझवायला पाणी नाही
अशा विराट शहरांतून
पेटल्या वस्त्रांनी तो पळत होता...
आंधळ्या-बहिऱ्यांनी ओसंडलेल्या
निर्विकार घरांच्या अनेक वस्त्या
ओलांडीत आला शहराबाहेर;
तिथेच कोसळला.
शरीरावर अग्नी विझला...

शहरातून वाहूं लागल्या
आपुलकीच्या कोरड्या नद्या.

अशोक नायगावकर

## मी बैल मुकेस्तव

मी बैल मुकेस्तव
हिंडून आलों चघळत कडचा
घुंगुर हलवित
संथ पुन्हा गोठ्यांत आपुल्या

मी शेळी असतों
देवनारच्या आधुनिक पात्याखाली
बेंऽ बेंऽऽ हरवित
निमुट कळपामधुनी

मी ऐन
उमेदींत मल्लूल्
आतां
टापा रखडत घोडा
थकलेला—

लघु-अनियतकालिक. अंक ६/१० : १४ ऑक्टों. ७६.
मुद्रक-प्रकाशक : सुशीला पानसे, ज्ञानविज्ञान प्रकाशन, सोनोरी, ३६ चरई, ठाणे ४०० ६०१. मुद्रणस्थळ : संगम प्रिंटिंग प्रेस, जुना मुंबई रस्ता, ठाणे ४०० ६०१.
संपादक : रमेश पानसे, सुनील कार्णिक.

# कवितेची कात टाकून

. १ .

मंगेश पाडगावकरांची एक कविता आहे. अगदी छोटी. चारपाच ओळींची. ती अशी आहे :

ही पानांची हिरवी जाळी
पलीकडलें आकाश निळें
जरा पलीकडे धोबीघाट
सुस्तींत विसावे...
...खांद्यावर झुलती बगळे

कधीकाळी नेहमीच्या खिडकीतून रस्त्यावरची नेहमीची गर्दी-वर्दळ टाळून डोळे अचानक समोर आलेली पानांची जाळी पहात राहतात. आणि त्या जाळीतून पार पलीकडे पसरलेल्या धोबीघाटाकडे नजर वळवली जाते.

अत्यंत सोप्या भाषेत, अक्षरअल्पत्वाने पकडलेला असा हा एक जिवंत क्षण ! एक सुरेख रंगचित्रणच. या रंगचित्रणाची उकल मनात मात्र फार नाजूक तऱ्हेने होत जाते. प्रथम समोर येतो तो जाळीदार निरंग क्षण; नंतर त्या-पलीकडे दिसणारे आकाशाचे गडद निळेपण. निळे आकाश निश्चितच गडद आहे. 'पलीकडलें आकाश निळें' या ओळीनंतर ब्रेक लागल्यागत आपण थांबून जातो. खरे तर डोळ्यांना दिसणारे निळे आकाश धोबीघाटापलीकडचे आहे. परंतु या ठिकाणी त्या निळ्या रंगाचा एक झिरझिरीत परंतु ठळक पडदाच तयार होतो आणि या पडद्यातून 'जरा पलीकडे धोबीघाट' या पुढच्या ओळीने आपण खेचले जातो ते थेट धोबीघाटाच्या खडकाळ काळ्या सुस्तींवरती. आता आपल्या आसपास फक्त धोबीघाटाचा काळा खडक आणि वाळत घातलेल्या पांढऱ्या कपड्यांच्या रांगा असतात. काळ्या-पांढऱ्या छटांवरती रंगचित्रण तोलले जाते.

शब्दांत बंदित केलेले एखादे क्षणचित्र, प्रायः निसर्गचित्र, हे गडद-रेखीव होतेच. मोठ्या कवितेचा आवाका–larger Spectrum–या चित्रणाला नसतो. चौकट छोटी आणि क्षण सणीव झालेला. परंतु या चित्रणात थोडे मनाला

भारणारे जे निराळेपण दिसते ते या दोन ओळींनंतर सहजगत्या पडलेल्या तुकड्यामुळे, एक तऱ्हेच्या आलेल्या पळंतामुळे, असे वाटते. त्यामुळेच ही छोटी कविता केवळ पांढऱ्या-काळ्या छटांचे ससैल नृत्य करीत राहाते. धोबीघाटाची काळी सुस्ती आणि पांढऱ्या वाळणाऱ्या कपड्यांचे बगळ्यासारखे उडणे... पानांची हिरवी जाळी, ती जाळी पाहणारा–खिडकीत उभा असलेला कवी, या सर्व गोष्टींचा विसर पडून फक्त काळ्या-पांढऱ्या छटांचे एक बेभान नृत्य आपल्यासमोर सरकत राहते. नेहमीच्या सरावातल्या काळ्या-पांढऱ्या छटांचा उपयोग करून रंगचित्रण सजीव करणे हे कसबी काम आहे असे त्यामुळेच वाटू लागते.

—सुरेश मथुरे

. २ .

## ते जिंकले

जीवनाचा स्वाद त्यांनी घेतला अन् जिंकले;
लायकी नाही जिण्याची... आमुचें झालें हसें.
पाप त्यांनी दडविलें अन् पुण्य माथां मिरविलें;
आमुच्या नशिबांत नव्हतें... पुण्य झालें पापसें.

जाणिलें कैसें जगावें मत्त वृषभाच्या बळें;
शेत सारें फस्त...भय अन् तीक्ष्ण शिंगाचें वरी.
आमुच्या डोळ्यांत थोडा धुमसला अग्नी तरी
कुणि करावी फिकिर आम्ही उलटतों ना जोवरी !

वीष आम्ही पचविलें अन् अमृताने तृप्त ते;
बीज आम्ही पेरिलें... कोठार त्यांचें सांडतें.
किन्तु जेव्हा चार टिकल्या दाविती चांदीचिया,
भाबड्या चित्तांत अमुच्या प्रेम त्यांचें वाहतें.

मेळवीलें धन तयांनी, बांधिले वाडे नवे,
बाग त्यांनी फुलविले... सालांत उठले किति मळे.
लावियेलीं मार्गशीर्षीं आमुचीं लग्नें...पुसीं;
बायकांना काम दिधलें, आणि त्यांही जिंकलें !

—शरद सातम ('गाज'मधून)

ऋचा/अठ्ठ्याण्णव

ही जिंकणाऱ्यांची गोष्ट आहे—पण जिंकणारे म्हणजे समोरासमोर द्वंद्वयुद्ध खेळून जिंकणारे नव्हेत, किंवा 'तो आला, त्याने पाहिले, त्याने जिंकले' या प्रकारचे, आपल्या उमद्या व्यक्तिमत्त्वाने मने जिंकून जाणारेही नव्हेत. हे तृतीयपंथी विजेते--आपल्याला सरळ मार्गाने चालायला शिकवून स्वतः वाकडी पावले टाकणारे, पालक म्हणून वावरता वावरता चटकन मालक बनणारे, आपले मायबाप...

यांचे नमुने जागोजागी असतातच. या कवितेत ते जमीनदारांच्या भूमिकेत दिसतात. मजुरांनी उन्हापावसांत राबून बी पेरावे आणि यांची कोठारे भरून वाहावी; हालअपेष्टांचे, संकटांचे, दारिद्र्याचे विष मजुरांनी पचवावे, पण सुस्थितीचे अमृतफळ मात्र यांच्या पदरात पडावे; यांनी पैसे जोडावे, मजले उठवावे, स्वतःचे बाग-मळे वाढवावे... एखाद्या माजलेल्या बैलाने हिरवेगार शेत फस्त करून वर आपल्या शिंगांची जरब शेतकऱ्यास दाखवावी त्याप्रमाणे वागणारे हे मायबाप. आपली स्वार्थी वृत्ती इतरांना दिसणार नाही अशी काळजी ते घेतात, स्वतःच्या त्यागाच्या-दानधर्माच्या जाहिराती फडकवतात आणि श्रमिकांना मात्र आपल्या दुःस्थितीमुळे उगाचच चोरट्यासारखे वाटते... आपल्या उपासमारीच्या वेळी मालक चार नाणी पुढे करतात, आपले लग्न लावून देतात, दुष्काळात आपल्या बायकापोरांना काम देतात याचेच त्यांच्या भाबड्या मनाला फार वाटते... क्वचित कधीतरी हा खोटा खेळ त्यांनाही कळतो, पण तेव्हाही ते डाव उलटवू शकत नाहीत; फक्त 'ते जिंकले' एवढेच आपल्या मनाशी म्हणतात...

शरद साटम यांची ही छंदोबद्ध रचना. आपल्याला पुसटसे जाणवणारे सत्य अशा रचनांतून नेमकेपणाने मांडलेले असते. पण हे केवळ सुसूत्र विचार नसतात; कवीचे मनोभावही त्यांत मिसळलेले असतात--किंबहुना त्यांचेच प्रमाण अधिक असते. या कवितेत 'ते' आणि 'आम्ही' यांची कहाणी सांगितली आहे आणि ही कहाणी सांगणारी व्यक्ती 'आमच्या' गटातील आहे; तेव्हा दोन्ही गटांविषयी वापरलेल्या शब्दांतून त्या त्या गटाविषयीच्या तिच्या भावना कशा व्यक्त होतात हे पाहण्यासारखे आहे. ( खरे पाहता ही व्यक्ती या क्षणी या दोन्ही गटांबाहेर उभी राहून त्यांचे निरीक्षण करते आहे. मात्र 'आमच्या'विषयी आपुलकी वाटल्याने तिने आपला समावेश 'आमच्या'त केला आहे. एरवी 'त्यां'चा स्वार्थी व्यवहार ज्याला इतक्या स्वच्छपणे दिसतो तो 'आमच्या'इतका भाबडा राहीलच कसा ? )

साटम यांच्या 'गाज'मध्ये अशा अनेक उत्कृष्ट रचना आहेत.—खरे तर त्यांना 'रचना' म्हणणे योग्य नाही, कारण एखाद्या उत्स्फूर्त कवितेसारख्या त्यांच्या ओळी सहज सुचल्यासारख्या येत राहतात, एखाद्या चांगल्या सुभाषितासारख्या मनावर ठसा उमटवून जातात... —**सु. म. ठाणेकर**

अनंत येवलेकर

## स्मरणाशी

तू असें स्फुरूं नकोस
सांजवेल
स्मरणाशी

स्वस्थ तुझ्या वक्षाशी
रात्र तुला
सामोरी

निजतांना स्मरण ठेव
रडण्याचें...
बहर तुझ्या पायाशी
रडवेला...

सुनीता पुजार

## ...तसे तुझे डोळे

वादळ येऊन गेल्यानंतर
पडझडीखाली गाडले गेलेले हुंदके
आंतल्याआंत विरून जातांना
वरवर मात्र सामसूम दिसावी
तसे तुझे डोळे...

त्या डोळ्यांचेच अवशेष वाटावेत
तसे तुझे डोळे आज इतक्या वर्षांनंतर.
नसती जपलीस त्यांतील उदासी
तर आज तरी मोकळा श्वास घेतां आला असता मला.

ऋचा/शंभर




पुरुषोत्तम शिवराम रेगे

# शब्दांकन

होता एक शब्द.

कीं स्पर्शाच !
—नाहीं तर अंगाग
थाटलें असतें
कसें ?

कदाचित्
—सुभोग
एक रूपहि अ-रूपाचें;
विदान
एक रसवित्.

हां, आणि गंधहि
—तो तसा
अविलंब मिलाफाचा,
तनमोर.

होता एक शब्द
—जो दिलास
तूं,
तूं, तूं.

अशोक वागवे

# दोन पक्षी

दोन व्याकुळते पक्षी
ज्यांच्या चोची अपरंपार दिशांतून विलग
आणि ज्यांचे डोळे ठिबकतात
गंभीर शापित मौन
कसे उठावेत पुन्हा गाणारे स्तंभ
काळजाच्या डोहांतून कुणी रेखावेत आलेख
कोसळत्या आभाळाच्या मायेचे
अशी साखळी अश्रूंचीही अपुरी
दोन दुव्यांना जखडणारी

दोन पक्षी दुखवतात एकमेकांना आणि
पंखांची एकाकी फडफड लहरत जाते
एकाकी बेटावर मनामनांतल्या
गाणारे डोळे भिरभिरत राहतात आता
भुकेल्या स्वरांसाठी
जाळतां यत नाही कागदासारखे
आणि पुसून टाकतां येते नाहीत ओळी
रक्ताने लिहिलेल्या
हृदयांतला अनाम कल्लोळ उधळून टाकतां येत नाही
विस्कटूनही टाकतां येत नाही स्वतःला
असतें धगधगतें मन म्हणून
आठवता येतें परस्परांना
आणि आठवणींची तानही नासत जाते
गळ्याच्या रित्या पडसादांतून

दोन पक्षी कायमचे जखडलेले मातीशी
भोगतात शिक्षा
जो कधी घडला नाही असा एक गुन्हा
असे जिवाचे असंख्य तुकडे विखुरलेले
आणि जुळवतांना विखरून सांडणारे पुन्हा पुन्हा

जयंत नेरूरकर

# लार्क गातो कविता

एऽ
तू तुझा वेळ कसा घालवतोस रे
विचार करत की गाणीं गात.

विचार करतांना मात्र
ती रेडिमेड टोपी जरा काढून ठेव :
तिच्यामुळे तुझा इतक्या ओळखीचा
चेहरा कसा स्मगल्ड-स्मगल्ड वाटतो.

गाणीं तर काय
फक्त एकान्तातच म्हणतां येतात.

*

एकान्त म्हणजे एक नीरव गाणं.
स्वतःचा स्वतःला प्रतिध्वनी.

*

तुझा आवाज कसा भाजून
होरपळून निघालेला स्वादिष्ट कुरकुरीत
कानांत पडतांच विरघळतो :
तू गाच गा
गाणीं समुद्राचीं, वाऱ्याचीं, झाडांचीं
गाणीं पक्ष्यांचीं, घरांचीं, माणसांचीं
गाणीं स्मशानांतलीं, हुतात्मा चौकांतलीं
गाणीं आंधळ्या भिकाऱ्यांचीं
गाणीं खानदानी कोठीवरचीं

*

चांदण्यावर भाळून त्याने गाणं म्हटलं
गहिरं आकाश गहिंवरून आलं

*

इथे कोरसमध्ये तुला
तुझा आवाज शोधतां येईल काय.
आता समूहगीतांमध्येच फक्त
असलास तू तृप्तान्ध
तर गोष्टच वेगळी.

*

वेळूच्या बनांतून येतो प्रवासी वारा
आणि त्यांचीं अल्वार बोटं
भरतात त्याच्या वल्कलांवर
नक्षीदार कशिदा.
आणि उंचावरून एकांडा
लार्क गातो कविता.

# तीन कविता : लुई कॅरलॉस लोपेझ

अनुवाद : मनोहर ओक

**लुई कॅरलॉस लोपेझ :** सन १८८३ त कार्टाजेना, कोलंबियामध्ये जन्म. नादमाधुर्य आणि सौंदर्यवाद यांपासून तो फटकून राही. त्याच्या उपरोधिक शैलीला कुठल्याही विषयाचं वावडं नसतं की कोणताही विषय ग्राम्य. स्पॅनिश अमेरिकेमधल्या नंतरच्या अनेक कवींना त्याच्या शैलीनं आणि दृष्टिकोनानं आकर्षित केलं, ज्या निर्दयपणे कडवट जहरी टीका राजकारणी पुजारी लोकांवर त्यानं केली त्यामुळे त्याचं एक अनन्यसाधारण स्थान निर्माण झालं आहे. उपरोध–उपहास–व्याजोक्तीबाबत त्याचा हात धरणारा कोणी झाला नाही. तरीही त्याच्यात एक प्रकारची भावनाविवशता जागृत होत असे; आपल्या देशाचा उज्ज्वल, भव्य इतिहास आणि आताचे त्याचे भग्नावशेष पाहून त्याचं मन खिन्न, विषण्ण होत असे.

## कुत्र्यास

अजूनही उकिरड्यावर पोट भरणारं भिकारडं कुत्रं
राजकीय पुढाऱ्यासारखं— टरकणारं
एका झाडूच्या अचानक झटक्याला
घाणकचऱ्याच्या टोपलींतून चोरलेल्यावर
सतत बतवतून खदखदणारं
राजकीय पुढाऱ्यासारखं–ज्याचं पारोसी पोट.
निषेध करतं हावऱ्या माशांचा
नतर रात्रभर भुंकत बसणं—पोटाचं पुडिंग भरून बाशा मांसानं
राजकीय पुढाऱ्यासारखं––चंद्राकडे पाहत
जणू चंद्र म्हणजे एक लोण्याचा गोळा आहे भरंवसून

ए भिकारड्या कुत्र्या
गोगलगाईप्रमाणे तू तुझी शेपटी गांडूसारखी पायांत लपवतोस
एखाद्या च्यालू राजकीय पुढाऱ्यासारखी
पण सांभाळून राहा—
तुला एखादवेळेस जलसंचास रोग होईल

## सूर्य अंधुक उदासपणे

माझ्या राहायच्या खोलीमधून
मी शाळेंतून बाहेर येऊन
चौकाकडे पळत जाणाऱ्या मुलांकडे पाहतों
पोपटांसारखं उडत–बागडत
मुलांचा घोळका
झाडांच्या अडं–तडं पंख्यांखालून
पसार होतो
दीर्घ शांततेला ढम्मसुद्धां होत नाही
सभोवतालची सडी हवा रिक्कामपणे
कारंजाची तीच तीच मध्यानुवर्ती कल्पना
परत परत दोहरवते
जोपर्यंत एखाद्या प्रचंड एगच्या बळकासारखा
सूर्य अंधुक उदासपणे
क्रॉसच्यां वर चर्चच्या घंटालयांवरून पाहत असतो

## निजायचीं खोलीं

माझ्या निजायच्या खोलीची जी सावली पडते
ती छपरावर एक स्केच काढते
आणि भिंतीवर एक गाढवाचा कान
आणि एक फ्राइंग पॅन
बैंगणी संधिप्रकाशांत कान
होत जातो लंबायमान
जसा पाय लांबवत जातो जुना जोडा
आणि अगांतुकपणे घुसडिंग करतं फ्राइंग पॅन
बाल्कनीवर
ही विवाहविषयक पूर्वसूचना नाही का ?
किंबहुना प्रात्यक्षिक
कानीं येणारा हा गोंगाट
माझ्या झोपायच्या खोलीच्या निवांतपणाचा भंग करतो
एखाद्या घरकोंबड्यानं कोंबडीला दमवावं तसं हें आहे

वसंत दत्तात्रेय गुर्जर

## स्वच्छ आकाश

स्वच्छ आकाश
दिशाही मोकळ्य।
मोकळ अंगणेंही

डोळ्यांतली वाट
उत्सुक
तरी कांहीच कसं घडत नाही

दिशा लागली
आणि
वाटच बरोबर आली

कठीण केवढी
केवढी कोमल
किती दूर आकाश

मनसोक्त थकव्यांतील
विसावलेंपण

निरथक
अंतर

स्वच्छ आकाश
अन्

दिशाही मोकळ्या

ह. शि. खरात

## शब्दांची कावड

अनुभवाची
तुम्हां नाही चाड
शब्दांची कावड
वाहू नका

आंधळ्या कळतें
मुंगीचें मैथुन
तुम्हांला अजून
उमगेना

शब्दांची कावड
'एका'ने वाहिली
गाढवा पाजिली
कविता गा

मुंगीने आकाशीं
सूर्याला गिळिलें
त्याच्च कुळांतले
आम्ही पण.

तुलसी परब

## बाकी सर्व थंडगार

बशींत वेफर्स तुझा चेहरा
माझा हात
एक घडीव आखीव संबद्धता

बाकी सर्व थंडगार.
दिवाळी संपली जानेवारीही संपेल
हळूहळू.

विजय कुमार पवार

## ही दुनिया

च्यायला, काय दुनिया आहे ही साली !
ही दुनिया आणि हे दुनियावाले
महागाईची भडवेगिरी करणारे
हे तमाम लोक
नाण्यांच्या पदराआड
स्वतःचीच अब्रू झाकताहेत...
हजारों रुपयांची बरबादी
घराघरांतून कोंडणारा खमंग वास
आकाशाला लागलेली आग
अर्धी दिवाळी साजरी केलीय ह्यांनी
तिच्याच जीवावर...
उद्यां हेच म्हणतील,
तिला जाळायला हवीय लक्करांसकट !
पण कुणास ठाऊक
अजून किती दिवाळ्या
तीं अशीच ठाम राहाणार आहे
जिथल्या तिथेच !

विजया जहागीरदार

## माणसा कळलेंच नाही

मी इथे सुकलें फुलोनी, पार्थिं कुणी वळलेंच नाही
मातीला कळलें तशी मी माणसा कळलेंच नाही !

गंधही वेडा असा की मैत्रि ना केली दिशांशी
ना स्तुती केली कुणाची– खेळला तृणअंकुरांशी
धूर्त वाऱ्याने तयाला कधि सवें नेलेंच नाही !

माणसांच्या चाहुलीची लागलेली आस ऐशी
मी दंवाचा बिंदुबिंदू रोज जपलेला उराशी
शेवटीं पाण्यांत जळलें तशी कधीं जळलेंच नाही !

समजलें, आयुष्य मजला फसवुनी गेलें दुपारीं
वंचनेनें फाटलेली सांजवेळीं मी भिकारी
जन्म-मृत्यू वेगळें कां कोरले, कळलेंच नाही !

मातीला कळलें तशी मी माणसा कळलेंच नाही !

सुरेश कदम

## अंधारांत

ख्रिस्ताच्या प्रार्थनामंदिराचे दरवाजे असतात सदोदीत बंद
आदळून आदळून परततात घंटानादासारखे इतका वेळ मूकपणे
प्रतीक्षा करणारे क्षण. भित्रा आत्मा.
ज्याच्यासाठी अश्रू ढाळावे असे घर नाही, दार नाही अखंड
मार्तिकांचा वास रस्त्यारस्त्यांत गल्ली-बोळांत आणि निवांतपणे
उत्तररात्रीं आक्रंदन करणारी कुत्रीं भयभीत खिडकीजवळच्या काळोखांत.
डोळे शोधताहेत भडाभडा आसवं..... आता थांबव तुझं गाणं
अंधारांत बरं नाही वाटत.

# शोभना क्षीरसागर

## मिलनाच्या रात्रीं

मिलनाच्या रात्रीला
सदाचाच रडवा सूर
दूर कुठे कुत्रें भुंके
तुझा येईना रे स्वर

अशीं दुबळीं हाडें
असें शरीर गाठोडें
कुठवर सजवू हा
भग्न देहाचा शृंगार

लूत लागलेले कुत्रें
मन माझें कण्हे कुंथें
बाभळीचीं झाडें भंवती
काळोखाचे घालून बुंथे

जन्ममरणाचें चक्र
केव्हां मुक्ति मिळे तेव्हां
अंतीं फोडीन टाहो
देवा माझा लाहो घ्यावा

देह उभारलेला आणि
शय्यीं एक त्यागी द्यावा.

सतीश काळसेकर

# शांतपणे

शांतपणे
झाडांच्या माथ्यावरून ऊन
घेत अंगावर
आणि भटकत
भणंग भिकाऱ्यासारखा
या परक्या वस्तींत

मी या शहराच्या मध्यावरून
दोन्ही दिशांनी वाहत गेलों
वावटळींत सापडल्या पानासारखा
गरगरत

पाहिले
या शहरांत कोसळत गेलेलें
वादळ अंगावरून
आणि नंतर तितकेंच हळुवार
शहरांतून निघून जातांना
वादळ विरघळत
दयाळू डोळ्यांनी
हांकारत तिच्या आठवणींना

मीं म्हटलें होतें की

मी पुन्हा वासंतिक बहर आणेन
माझ्या कवितेंत
आणि म्हटलें होतें की
लिहीन पुन्हा प्रेमगाणीं

शुभदा,
कुणीतरी यावे आणि म्हणावें.
की आपण विसरलों नाहीं स्वतःला
आणि परस्परांना
कित्येक शहरांत आपण पारखे होत गेलों
आठवणींच्या समुद्रकिनाऱ्यांना

तसा या शहरांत मी नवा नाही
नाहीत या शहरांतलीं कारंजीं नवी
किंवा इथल्या चौकांतून
माझीं भुकाळ पावलें
वळणारीं दिशादिशांतून
झाडाझाडांतून

शुभदा,
कुणीं आणि कधी
गावींत प्रेमगाणीं

कुठल्यातरी किनाऱ्यावर
हें ठरवून ठरवितां आलें नाही
जसा आपणालाही ठरवून
घडवतां आला नाही
आपला
पूर्ण बहरोत्सवी समुद्र
जरी आपण परस्परांना आठवत
आणि विसरवत
उभारल्या संध्याकाळीं
सुरेख गाण्यासारख्या
आणि न्हाऊं घातलें
सकाळींना
डोळ्यांवरल्या उजाड मोहोराने

मलाही सांगतां येत नाहीय
हें मुकाट गाणें या शहरांत
पुन्हा कां जाग होत गेलें
जेव्हां वादळांत
आपलें प्रत्येक स्वप्न
उद्ध्वस्त होत असावें
असें वाटतानांच जागत गेलें

शुभदा,
मी सोडतोंय या शहराचा
सीमान्त
आपल्या इच्छांचें राख होणेंही
जरी राहिलेलें नाही आपल्याही हातीं

शुभदा,
हें शहर न होवो परके
आणि मला लिहितांही येवो
सर्व कल्लोळ रिचवून
माझ्या गळ्याखालीं
समुद्रगाजेसारखें
गाणें
वाहत
अव्याहत
विरघळत
वादळ
धिमें
आणि
शांत.

प्रकाश जाधव

## आड्या वख्ताला

ऐटकऱ्याचा निरोप मिलताच पेटकऱ्यानी
घडशा नदरेन बगितलीन पागं खायला आवूर
पान्या खायलं श्यात
पान्या खायलं मरान
हाग पानी; मूत पानी
लेकरांच्या गाऱ्रीत बी पानी, पिटलवनी
गाय वास्सार गाढव बकार कुत्तार
सारा पान्या खायला भोग
आलं वरीस घाल भरीस
इका वख्ताची ढेकार दिया मिलंना
आड्या वख्तात कोन इख दिया मागंना
कालजांतल्या रक्ताचं बी पानीच
कंच्या देवान घडवलान जीव; कलंना कंदी यल मरान !
तें बी सालं पलताय थॅट इनूस खोताच्या परसांवनात
ताबूत सलदायला.
पानी पडो,
नाय पडो शाटमारी—
आमच्या म्होरं वाढून ठेवलेला इद्वोस मातूर थाम्हलाय
असं कंदी घडलं ना !


# अक्षरं

लघु-अ-नियतकालिक. अंक ७/१० : १२ नोव्हें. ७६.
मुद्रक-प्रकाशक : सुशीला पानसे, ज्ञानविज्ञान प्रकाशन, सोनोरी, ३६ चरई, ठाणे ४०० ६०१. मुद्रणस्थळ : संगम प्रिंटिंग प्रेस, जुना मुंबई रस्ता, ठाणे ४०० ६०१.
संपादक : रमेश पानसे, सुनील कार्णिक.

# काव्यानुवाद आणि अनुवादक

सुरेश दलाल

[ 'काव्यविश्व' या गुजराथी संग्रहात जगभरच्या ३०० निवडक कवितांचे अनुवाद प्रसिद्ध करण्यात आले आहेत. गुजराथीतील नामवंत कवी व समीक्षक प्रा. सुरेश दलाल यांनी संपादक या नात्याने या संग्रहास लिहिलेली प्रस्तावना येथे अनुवादित केली आहे. ]

काही दिवसांपूर्वी 'युसिस 'तर्फे अमेरिकन कवी रॉबर्ट फ्रॉस्टच्या शताब्दीच्या निमित्ताने त्याच्या काव्याच्या गुजराथी अनुवादाच्या वाचनाचा एक कार्यक्रम आयोजिला होता. अध्यक्षस्थानी होते परदेशी साहित्य आकंठ पिऊन पचविलेले आपले कवी निरंजन भगत. त्या कार्यक्रमामध्ये निरंजन भगत यांनी सांगितलेली दोन वाक्ये पक्की लक्षात राहिली आहेत : "कवितेचे अनुवादक विद्रोही आहेत", "अनुवादकांचा वंश अमर असो !" या दोन्हीमधील सत्य हे आहे की कवितेचा अनुवाद करणे हे जवळ जवळ अशक्य म्हणावे असे कठीण काम आहे, आणि तरीही ते टाळण्याजोगे नव्हे तर अधिक चांगले करून दाखविण्याजोगे काम आहे. कवितेचा अनुवाद होऊच शकणार नाही असे म्हणूम हात झटकणारे नसतात असे नाही, तसेच कोणत्याही कवितेचा अनुवाद होऊ शकतो असे म्हणणारेही आहेत. अशा या टोकाच्या विधानांमध्ये सत्यांश आहे.

इतर अनेक कलांप्रमाणे अनुवाद हीसुद्धा एक कला आहे. आणि प्रत्येक कला एक प्रकारची पूर्वतयारी आणि तपस्या मागत असते. कुणीसे म्हटले होते की, "अनुवादक Bi-lingual च केवळ असून भागणार नाही, तो Bi-cultural सुद्धा असला पाहिजे." प्रत्येक भाषेस स्वतःचा असा आगळा स्वाद असतो. शब्दाला स्वतःचे असे एक वेगळे व्यक्तित्व असते. या व्यक्तित्वाच्या पाठीशी समाज आणि भाषा यांची प्रगट व अप्रगट अशी परंपरा उभी असते. ज्याप्रमाणे प्रत्येक रंगाच्या अनेक छटा असतात त्याचप्रमाणे शब्दाच्या भोवतीही अर्थ, ध्वनी, समाज आणि परंपरा यांच्या छटा असतात, दृश्य आणि अदृश्य असे तेजोवलय असते. उमाशंकर यांच्या गीतातील 'मानवीना हैयाने नंदवामां वार शी' या ओळीचा इंग्रजी अनुवाद कोणी करील तर 'नंदवामां' या शब्दाच्या भोवती आपल्या परंपरेचे जे एक वलय आहे त्याचे तो कसे दर्शन घडवू शकणार ? 'मारी आंखे कंकुना सूरज आथम्या' अशासारख्या, रावजी पटेलांच्या ओळीचा अनुवाद कोणी परकीय भाषेमध्ये करील तर त्यातील 'कंकुना सूरज' या शब्दांशी निगडित असणारे आपल्या परंपरेतील जे सौभाग्यसूचक,

जीवनदायी अर्थवलय आहे ते कसे काय व्यक्त होऊ शकेल ? सानत्याने अनुवादाचे कार्य करीत आलेले नगिनदास परेख यांचा अनुवादासंबंधीचा अभिप्राय डावलण्यासारखा नाही : "अनुवादकाचे काम एखादे रोप एका जमिनीतून उपटून दुसऱ्या जमिनीत रुजवण्यासारखे आहे ..शब्दाचा नाद, व्यंजना, ध्वनी यांच्यासी निगडित अर्थ आणि भावच्छटा, वाक्याची लय, आरोह, अवरोह, शब्दांची विशिष्ट मांडणी या सर्वांचा मिळून जो एक अर्थ आणि भावपिंड बनतो, तो एका भाषेतून दुसऱ्या भाषेत जसाच्या तसा उतरविणे हे काम गर्भास एका उदरातून दुसऱ्या उदरात ठेवण्याइतके विकट आहे." अनुवादक कितीही सावध राहिला तरी या वलयाचा नाशच होतो. तेव्हा कमीत कमी हानिकारक आणि अधिकाधिक उपकारक मार्ग हा होऊ शकेल की अनुवादकाने या तेजोलयाच्या भोवती भोवती राहून नव्हे तर कलाकृतीच्या गाभ्यामध्ये प्रवेश करून, संपूर्ण कलाकृतीचा साक्षात्कार घेऊन, संपूर्ण ताटस्थ्याने नव्यानेच निर्मिती करणे. याचाच अर्थ, Translation is Trans–creation. Transposition असा शब्दही यासाठी वापरला गेला आहे. जपानी कवितांच्या इंग्रजी अनुवादाच्या एका पुस्तकावर असेही वाचले होते : 'Japanese poetry remade into English.' आपल्या भाषेतही अनुवाद, भावानुवाद, रूपांतर, भाषांतर इत्यादी विविध शब्द नाहीत काय ? वेणीभाई पुरोहित खूप वेळा मजेने म्हणतात की मी भाषांतर करतो तेव्हा भाषांमधील अंतर कमी करत असतो. ही गोष्ट हसण्यावारी नेण्यासारखी नाही. हे सर्व म्हणत असता असे प्रश्न निर्माण होतात की अनुवादक मूळ कृतीपासून किती प्रमाणात स्वातंत्र्य घेऊ शकतो? मूळ कलाकृतीस अधिकाधिक सजविण्याच्या मोहामध्ये तो तिच्या खऱ्या स्वरूपास धक्का तर पोचवत नाही ना ? मूळ कलाकृती ही शेजाऱ्याच्या मुलासारखी असते. ते मूल आपल्यासी कितीही समरस झाले असेल, चोवीस तास आपल्या घरात राहत असेल; समजा की ते आपलेच मूल झाले असेल; पण त्याला शाळेत घालायची वेळ येते तेव्हा त्याच्या नावापुढे त्याच्या वडिलांचेच नाव लिहिले पाहिजे, आपले नव्हे. कोणत्याही कलाकाराच्या कवितेचा अनुवाद करीत असता जर त्याच्या कवितेचे व्यक्तित्व पुसून टाकून केवळ आपलेच व्यक्तित्व आपण तिच्यावर लादायला लागलो तर मुळास धक्का पोचल्याशिवाय राहणार नाही.

अनुवादकाने मूळ कलाकृतीचे मर्म ओळखले पाहिजे. तिच्यातील शब्दांच्या अर्थाच्या सूक्ष्म छटा लक्षात न घेता जर त्याने त्या शब्दांपुढे केवळ कोशातील प्रतिशब्दच ठेवले तर मग अनुवादाचे मर्जन ते कोणते राहिले ? आपल्याला

( पृष्ठ एकशे सोळा पाहा )

अरुण कोलटकर

## रद्दी

तिवईवर रद्दीचा ढीगाय
त्याच्यापास्नं
जरा सांभाळूनच र्‍हा

रद्दीला डिस्टर्ब करूं नको
मला माहीत आहे
पानोपानीं साप व्यालेत

तिकडं बघूं नको
पेपरांचे कोपरे
वाऱ्यानं कांपरे झालेले नाहीत
चळथीत चुळबूळ चाललेली आहे
सापाचीं पिलं
माना वळवून वळवून तुझ्याकडे बघतायत

तो कोपरा फणा काढतोय
जिभल्या चाटतोय
तिकडं लक्ष देऊं नको

डोळे मिटून घे
उद्यां सकाळीं
वाटलं तर रद्दी विकून टाक

[ प्रास प्रकाशनातर्फे प्रसिद्ध होणाऱ्या
'अरुण कोलटकरच्या कविता' या
आगामी संग्रहातून ]

( पृष्ठ एकशे चौदा वरून )
माहीत आहे की अनुवादकाचे काम मूळ कलाकृतीवर 'ट्रेसिंग पेपर' ठेवून रेखाकृती काढण्याइतके सरळ नाही. या कामासाठी कुशल माणूसच हवा. अनुवादकाचा धर्म मूळ कृतीच्या जीविताचा नाश करणे हा नसून तिच्या चैतन्याचा सर्वांगाने आविष्कार करणे हा आहे. अनुवादक मूळ कलाकृतीने 'झपाटलेला' असेल, तिच्याशी एकरूप झाला असेल तर अनुवाद यांत्रिक वाटणार नाही.

मराठी कवी बोरकर यांनी अनुवादासंबंधी सांगितलेला एक प्रश्न आठवतो आहे. त्यांनी 'मेघदूता'चा अनुवाद करण्याचे काम हातात घेतले होते. त्यातील 'मन्दं मन्दं नुदति पवनं' हा नादमाधुर्याने भरलेला श्लोक त्यांना सारखा त्रास देत होता. काही केल्या त्यातील नादमधुरता अनुवादात उतरत नव्हती. आणि जर ही नादमधुरता वजा करून अनुवाद करायचा तर हातात केवळ शब्दांचा सांगाडाच उरणार. कवी शब्दाशब्दासाठी घुसळण करीत राहिला. एका रात्री त्यांना स्वप्न पडले. त्यामध्ये एक मोठी खोली होती. खोलीमध्ये कोणी म्हणजे कोणीही नव्हते. समोर एक फळा होता. त्यांच्यावर मेघदूतातील श्लोकाचा अनुवाद लिहिला होता. स्वप्नातसुद्धा कवीला एवढे भान होते की आपण हे स्वप्न बघत आहोत. फळ्यावर लिहिलेल्या शब्दांचा अर्थ कवी लावतो. उभा राहतो. अंधारातच तो आपल्या रायटिंग टेबलाजवळ जातो. तेथे पडलेल्या कागदावर संपूर्ण श्लोक उतरवून घेतो आणि मग दिवा लावतो. या श्लोकाच्या अनुवादाकडे एक चमत्कार म्हणून पाहिले नाही, तरी एवढे नक्की की मूळ संस्कृत श्लोक कवीच्या रक्तात भिनून गेलेला होता आणि नंतर ती रक्तातील छंदोलयच मूळच्या नादलालित्यासहित त्याच्या भाषेत उतरली.

'काव्यायन'च्या प्रस्तावनेत उमाशंकर यांनी लिहिले आहे : "अनुवाद हा शेवटी अनुवादच. तो मूळ होऊ शकत नाही. त्यातही काव्याचा अनुवाद म्हणजे, टॉल्स्टॉय म्हणतो त्याप्रमाणे, गालिच्याची उलटी बाजूच केवळ नव्हे, तर त्यापेक्षाही अधिक वाईट गोष्ट." असे म्हणतानासुद्धा अनुवादाचे काम किती अवघड आहे इकडेच लक्ष वेधले आहे. तसेच काही कलाकृती स्वभावतःच अशा असतात की त्यांचा अनुवाद हा जवळ जवळ अशक्यच ठरतो. कांतांच्या 'सागर अने शशी' या काव्याचा अनुवाद दुसऱ्या एखाद्या भाषेत झालाच तरी तो कसा काय होईल बरे ? 'स्नेहघन, कुसुमवन विमल परिमल गहन' मधील उसळत्या लाटांसारखे असलेले संगीत अनुवादात कितपत उतरते ? ज्या कलाकृतींमध्ये शब्दांचा ध्वनी आणि अर्थ काठोकाठ भरला आहे, ते दोन्हीही एकजीव झाले आहेत, अशा कलाकृतींचा अनुवाद करणाऱ्याने अपयश पदरी बांधून घेण्याची तयारी ठेवलीच पाहिजे.

स्टॅन्ली कुनीत्झे याने रशियन कवयित्री आख्मातोवा हिच्या काव्याचा अनुवाद करत असता आपल्याला ज्या अडचणींना तोंड द्यावे लागले त्यांची एक नोंद, एक रेखाटन 'अमेरिकन पोएट्री रिव्ह्यू'मध्ये दिले आहे. त्यामध्ये त्याने एक सुरेख गोष्ट सांगितली आहे : "अनुवादकाची अवस्था ही काफ्काच्या तथाकथित नागरिकाप्रमाणे असते. हा नागरिक दोन शृंखलांनी बद्ध आहे. एका शृंखलेचा संबंध पृथ्वीशी आहे आणि दुसरीचा पृथ्वीपलीकडील प्रदेशाशी. तो एका दिशेने जेव्हां अधिक पावले टाकू लागतो तेव्हा दुसरी शृंखला खळखळ करीत त्याची गती रोखण्याचा प्रयत्न करते. अनुवादकसुद्धा दोन साखळदंडांनी बांधलेल। अ,स.तो. एक साखळदंड सांगत असतो, मुळाचा आदर कर. त्याची आदब राख. दुसरा साखळदंड म्हणतो, काही तरी नवीन कर, पुनर्निर्मिती कर." प्रत्यक्षात कोणत्या साखळदंडाचे कधी आणि किती ऐकायचे, काव्याचा अनुवाद पद्यात करायचा की गद्यात, हे सर्व अनुवादाच्या प्रतिभाशक्तीवर अवलंबून आहे. **(अनुवाद : नंदा आपटे)**

**साभार पोच** : 'काव्यविश्व' : संपा. सुरेश दलाल; १९७५; चिमणलाल लिटररी ट्रस्ट, २७६ दादाभाई नौरोजी रोड, मुंबई ४०० ०३१.

वंदना देशमुख

## अस्तित्वांतही एक शून्यता

अबोल्यांतच गोठून गेलं तें जग...
अनेक युगांचा एक क्षण
असं अनेक क्षणांचं संमिश्रण
चांगल्या-वाईट.
त्यांतच ती विरक्तीची अबोली छटा,
आसक्तीचा हिरवा रंग
अन् रागानुरागाची गुलाबी फेक.
एका क्षणासाठी जगणं
अन् त्याच क्षणासाठी मरणं.
अस्तित्वांतही एक शून्यता, एक न्यूनता.

पुंडलिक पाटील

## झाडांना फशी पाडून

झाडांना फशी पाडून
वाऱ्याने बोभाटा केला म्हणजे
तटस्थ-परक्या
पानांच्या रेषांमध्ये
अडकलेला
जन्माचा खळ
निष्पर्ण होत जातो...
मग
धुकें पांघरलेल्या
सन्नाट शिवारावरून
वणवणतांना भेटतात
माझेच
निखळलेले
डोळे...!

अव्यक्त

## पाठीमागे

भीतीचे प्रचंड डोंगर ओलांडून आपण उतरावें
बिनबुबुळाच्या डोळ्याइतक्या पांढऱ्याफटक प्रदेशांत...
—जणूं आतां आपण जात असतों
आभाळ तुडवीत पृथ्वीपलिकडे !

पाठीमागे
आपल्या हातून फुटलेल्या कांचेच्या तुकड्यांनी
रक्ताळलेले असतात आपल्या नातलगांचे पाय.

प्रफुल्ल चौधरी

## अजूनही ऐक

अजूनही ऐक !
या पाऊलवाटेवर पाय ठेवूं नकोस
इथला कुणीही वाटसरू तुला राजमार्गावर आणून सोडील.
जायचेंच असेल या वाटेने तर सावधपणे जाणिवा खेळवत जा.
ते तुझ्यावर आदळतांच सांग त्यांना
तू आंधळा आहेस म्हणून !
तर ते वाचतील तुझ्यापुढचा अंधार !!
सांगतील तुलाच सूर्यकथा !!!
अशा वेळीं सांग त्यांना
तू बहिरा आहेस म्हणून !
तर ते तुझ्याकडून वदवून घेतील
बदलत्या नीतिमूल्यांच्या मूलगामी प्रेरणा !!
तर अशाही प्रसंगीं ऐकव त्यांना
तू तुझ्या जातक-कथा !!!
यावर ते सारेच बनतील
आंधळे, बहिरे आणि कांहीही....!
या वेळीं तू काय करशील ?
शहाणा असशील तर अजूनही ऐक !
जायचेंच असेल या पाऊलवाटेनें तर
सावधपणे जाणिवा खेळवत जा !!

तुकाराम जाधव

## क्रांतीचीं गाणीं ऐकतांना

घोषणा.
त्यानंतर
काळोखाचीं गळाकाढू गाणीं
आणि त्यांच्या साथीला इज्जतवान द्युभडांचे धुत्कार.

एक अनोखी गंमत वाटत आलीय मला
हीं गुलदस्तांत पैदा होणारीं
क्रांतीचीं गाणीं ऐकतांना
पण
प्रत्येक माणसाची आत्मनिष्ठ सकाळ
नासत जातांना पाहून
मी अतिशय तिरस्कार करतो त्यांचा

मी मानतों
की युद्धाचा नियम म्हणून
प्रत्येक माणसानं सिद्ध राहायला हवं
पण त्याच्या स्वप्नातल्या बागा जाळून
पिसारा फुलवीत नाचणाऱ्या मोरांनाही
सक्तीनं युद्धभूमीवर पाठवणं
मी समजून घेणार नाही.
कधीच समजून घेणार नाही.

पुरुषोत्तम घोरकर

## दान

पाऊस दाटून आला तरी ओठावरती ओझें
या उजाड माळावरती मी म्हणूं कुणाला माझें ?

काळीजकापरे पक्षी हलकेच उशाशी निजले
नि गर्दनितळ पाण्याच्या श्वासांनी अलगद भिजले

नको जाऊं नदीकिनारीं ही रातांधळी पहाट
देहाचें फुल अर्पून तिने आज सजविला घाट

गोंदून निरागस सांज उतराई कैसें व्हावें,
रात्र रात्र जपलेलें हें दान कुणाला द्यावें ?

किशोर दीक्षित

## उलटाच एक फासा

तिन्हीसांज सुन्न, कक्ष वितळे तमांत आता
चढवून दुःख कफनी जवळीं करी निराशा

सुस्कार-हुंदक्यांनी अतिथी बनून येतां
पाऱ्यापरी निखळतो हातांतुनी दिलासा

निमिषांत एक अश्रु गालावरी निथळतां
निष्पर्ण जीवनाचा देतो मला खुलासा

दुर्दैव भोगुनि मी गतैंत जात असतां
निष्ठूर काळ घेतो हिसकावुनी कवडसा

मी वैर कां धरावें नियती कठोर बनतां
आयुष्य हा जुगार, उलटाच एक फासा

सुनंदा भोसेकर

## दवांत भिजलीं पिवळीं पानें

दवांत भिजलीं पिवळीं पानें, जळांत भिजल्या पोरी,
भिजलें ओलें क्षितिज सारें आणिक भिजले तारे,
भिजल्या वाऱ्यामधून झिरपे कुठलें ओलें गीत ?
भिजल्या रातीं जळून गेली कुठली ओली प्रीत ?
भिजलें अंगण ओठीं आली रक्तओढीची तान
चुकून पडलें कुणास कैसें हें अविनाशी दान ?
भिजून इतकें कंठामधली तान कशी रे कोरी ?
दवांत भिजलीं पिवळीं पानें, जळांत भिजल्या पोरी...

आभाळाचें ओलें नातें, ओठही ओले धरतीचे,
सुकल्या फुलास माहीत असती ओले व्रण ते शपथाचे.
कुठल्या ओल्या क्षणीं उडाले सुगंधशापित पक्षी,
आणि युगांवर सजून बसली रत्नरेशमी नक्षी ?
त्या पक्ष्यांना ओळखण्याची आज इथे हो चोरी...
दवांत भिजलीं पिवळीं पानें, जळांत भिजल्या पोरी...

तुलसी परब

## स्वप्नाच्या द्विरुक्तीसारख

अनबोलींतून मुबलक चाव्या सांडल्यासारख्या
आणि घर सगळं बर्फानं भरून गेल्यासारखं
तो पडून राहतो स्वतःच्या थडग्यांत पडल्यासारखा
आणि उजळतो तेवढ्याशा चांदणीप्रकाशांत उजळल्यासारखा
तिथेही एक जागृत सूचकता : ओलांडतां येणारीं अंतरं
त्याच्या मनाच्या तळव्याला नि घाम फुटलेला
तो हेलावतो, अवलंबतो स्वतःच्या रक्ताच्या रंगावर
आणि स्वतःला देतां येणाऱ्या सगळ्या सर्वस्वहाराकिरींच्या निश्चितींवर
शेवटची पाळी त्याची, शेवटचा भरदोर सुंदर धागा असल्यासारखा
तो ओळखतो स्वतःच्या मृत्यूची दुभाषा : रंगांची बांधीव आशा
आणि अनभिज्ञ असल्यासारखा हिंडतो सामायिक वारा हेलकावतो तसा
सुंदर वाहत्या बर्फांत स्वतःला पडलेल्या स्वप्नाच्या द्विरुक्तीसारखा.

पोपट सातपुते

## आज निश्चल असें कांही नाही

आज निश्चल असें कांही नाही
ही गर्द निळी ढगांची लाट आली फार दूरवरून
फार दूरवरून
थंड थंड झुळकांनी आश्विनसकाळ उठली शहारून
उठली शहारून
भरलेल्या शेतांतून आले पक्ष्यांचे सुमधुर आवाज
सुमधुर आवाज
आणि झाडांच्या तृप्तींत आत्मा गेला मिळून हे राजराज
हे राजराज
आज निश्चल असें कांही नाही.

## दोन कविता : ॲन्टोनिन बार्टुसेक; अनुवाद : मनोहर ओक

---

**ॲन्टोनिन बार्टुसेक :** जन्म १९२१. ह्याच्या बरोबरीच्या होलूब वगैरे झेक कवींप्रमाणे तो उघडपणे समकालीन परिस्थितीवर टीका करत नसला तरी मधेच एखादी प्रतिमा इतक्या प्रभावीपणे येते की आपण एकदम हादरून जातो. 'विसावं शतक' या त्याच्या कवितेत शेवटी तो म्हणतो, "आम्ही फटाफट कॅमेऱ्याने फोटो घेत चाल्लोवतो. कॅमेऱ्याची क्लिक, बरोबरची मुलं, म्हाताऱ्या बायका, आकाश नसल्यामुळे दिव्याच्या खांबांना रस्ता विचारणं...भरवशाच्या जंगलांनीही आपले चेहरे आमच्या कॅमेऱ्यांना उघड करून दिले. आणि निगेटिव्ह रूपांनी सत्य फिल्मवर प्रकट झालं." आपल्या लिखाणात दोन विरुद्ध प्रवृत्तींच्या भावनिक उद्रेकात तो एक प्रकारचा समतोल साधतो. सूचन, भाषेचा ढोबळपणा, लय, आणि मधले विराम इत्यादी बाबतींत त्याच्यात आणि एलिअटमधे असलेलं साम्य कुतूहलजनक आहे.

---

### हिवाळ्यांतील बाग

झाडाच्या फांद्यांसारखी
विचारांची भरभराट व्हावी
पण बर्फानेच त्यांना झांकून वेढलं तं काय !

अतिउत्कंठेनं ताठरून गेलेलीं मूळं.
म्हाताऱ्याकोताऱ्यांच्या थिजलेल्या दरीजवळ
दाटीवाटीनं घोळका.

सोडून दिलेलं घर
भरून गेलेलं विस्मृतीच्या बोलांनी.
जा ! त्या वेळेस जे विद्यमान होते
त्यांना विचारा
जेव्हां सावल्यासाळुंक्यांना आणि चिमण्यारमण्यांना
अंतरंग उघडून गुलाब वश झाले...

## थडग्यावर कोरलेला मरणलेख

हेंच तें घर
जिथं माणसं जिवंत गाडलीं जातात.
पहिल्यांदी आम्ही ढोंग करायचा प्रयत्न केला
की आम्ही केव्हांचे मेले आहोंत

आम्हांला जाहीरपणे वेडे ठरवून
जबरदस्तीनं
उरलेल्या सर्वांबरोबर उरलेल्या सर्वांचं
त्यांनी आम्हांला रक्त पिण्यास लावलं.
तें भयानक आणि मधुर होतं.

सतत माणसं जिवंत गाडलेलीं बघून
एक दिवस
आमचीच आम्हांला शिसारी आली
त्या गरम रक्तावर ताव मारून
ढेकर द्यायचं आम्ही अव्हेरलं

तेव्हां त्यांनी आम्हांला आमचीं थडगीं
उकरायला लावून
आमच्या डोक्यामागून गोळी घालून
आम्हांला ठार केलं

आतां आम्ही खरंच ठार झालोंत
आतां आमची अपेक्षा होती की सगळ्याचा अंत झाला
पण त्यांनी आम्हांला परत जिवंत केलं
कां की ते आम्हांला जिवंत गाडूं शकतील

वसंत पाटणकर

## प्रत्येक माणसाचं कांही ना कांही

प्रत्येक माणसाचं कांही ना कांही चाललेलं असतं
अंधार-उजेडाच्या साक्षीनं.
आसपास उमलतात, मलूल होतात फुलं हिरव्यागच्च लॉनवर
फाटक्या चेहऱ्याचीं माणसं शिरा ताणून हिंडतात
जुन्या अवाढव्य दगडी इमारतींच्या चिंचोळ्या गल्ल्यांमधून
शहरांतल्या झाडांच्या बदलत्या रंगांबरोबर
बदलतो त्याखालचा रहदारीचा रस्ता.
अशा साध्या साध्या गोष्टी
मिणमिणत्या प्रकाशांतही घडतात खूपच नियमितपणे.

प्रत्येकजण समजूत काढत असतो स्वतःचीच दुसऱ्याशी
बोलतां बोलतां अंगि कांही सापडत नाही म्हणून
चरफडत असतो आपल्या स्वतंत्र अंधारावर.
कितीतरी दूरवर असतात अत्यंत जिव्हाळ्याचे प्रश्न नि
पावसाळ्यांतल्या एखाद्या दिवसागत
आपण गृहीत धरलेलीं असतात त्यांचीं उत्तरें.

उजळणी करतो एकेकजण मागच्या किरकोळ गोष्टींची
आताची भीती वाटते म्हणून

तसं घडणारं कांही दडून राहत नाही
कायमचं. येण्याची चाहूल लागते कधीमधी
एरव्ही अंधारांत अचानक अंगावर आलेली हिंस्र उडी
थरकांप उडवणारी.
वाटत राहतं सारंच उशिरा होतंय
कां, कुठे, केव्हां... एवढंच सारं आपल्यापाशी

विचारलेल्या प्रश्नांची उत्तरं मिळत नाहींत
हें ठाऊक असतांनाही आपलं बुडणारं आयुष्य
सोसत असतो प्रत्येकजण उघड्या डोळ्यांनी. मुकाट.

प्रत्येकाचं कांहीतरी चाललेलं असतं निमूटपणे.
स्टेशनजवळ बिल्डिंगच्या कोपऱ्यांत
दिव्याच्या खांबाखाली काळोखाच्या भीतीनं
एक मूल निपचित पडून राह्यलेलं असतं
डोळे मिटून झोपेची वाट पाहत.


---

**ऋचा** नव्या वाचकांसाठी खास सोय

खालीलपैकी कोणत्याही ठिकाणी किमान दहा रुपये देणगी देऊन
'ऋचा' चे सर्व (दहा) अंक आपण मिळवू शकाल.

---

**अकोला :** श्री. पुरुषोत्तम बोरकर, अघोर वाडा, जयहिंद चौक, जुने शहर.

**डोंबिवली :** श्री. परेन जांभळे, ४ सीताबाई निवास, दीनदयाळ क्रॉस रोड.

**नागपूर :** अनिल दिगंबर कुलकर्णी, सेंट्रल बझार, नवी रामदास पेठ.

**नासिक :** श्री. प्रफुल्ल चौधरी, चौधरी बिल्डिंग, बोहरी लेन.

**पुणे :** सौ. सुप्रिया अत्रे, यशोधन, इंदिरा सोसायटी, एरंडवणे.

**बडोदे :** श्री. दिलीप घोलप, खंडेराव मार्केटसमोर.

**मुंबई :** श्री. सतीश काळसेकर, २८ शिशिर, बँक ऑफ बरोडा कॉलनी,
बामनवाडा, विलेपार्ले (पूर्व).
किंवा
**ठाणे :** ज्ञानविज्ञान प्रकाशन, सोनोरी, ३६ चरई.

---

आपल्या नव्या कविता
किंवा काव्यविषयक लेखनही
'ऋचा'साठी हवे आहे.

---

रवींद्र दामोदर लाखे

## ऐकूं येतात जेव्हा मला

ऐकूं येतात जेव्हा मला आकाशाचे दीर्घ श्वास
माझे वाटत नाहींत मला माझ्याच हातांतले घास.
आसक्तीचीं सर्व रंगांचीं वस्त्रें एक एक गळून पडतात,
सारें सारें होतें स्वच्छ...नजर आणि मीही नग्न.
मी विसरतो मग माझ्याच श्वासांची लय सांभाळण्यासाठी तडफडण्याचें
गळून पडतात सूर माझ्यावरील टिचभर चांदण्यांचे
आणि ध्रुवाचेंही गाणें मला ऐकूं येतें
आणखी असंख्यांचे कोरसही ध्रुवाचेंच गाणें गाणारे.
मग माझेंपण उरत नाही माझ्या घरादाराला घोरपडीसारखें चिकटलेलें
डोळे विसरतात घरांतल्याच प्रकाशावर तृप्तीचे ढेकर देत रेंगाळण्याचे.
माझें झाड कुठलें ? माझें घर कुठलें ? माझें अंगण कुठलें ?
माझ्या फुलांचा गंध कुठला ? माझे श्वास कुठले ?
विरून जातात हे सारेच धूर्त, कोते आणि कावेबाज प्रश्न
उरतें फक्त आकाश नांवाचें भिंतींशिवायचें घर.

लघु-अ-नियतकालिक. अंक ८/१० : १९ डिसें. ७६.
मुद्रक-प्रकाशक : सुशीला पानसे, ज्ञानविज्ञान प्रकाशन, सोनोरी, ३६ चरई, ठाणे ४०० ६०१. मुद्रणस्थळ : संगम प्रिंटिंग प्रेस, जुना मुंबई रस्ता, ठाणे ४०० ६०१.
संपादक : रमेश पानसे, सुनील कर्णिक.

# 'दशपदी' ज्योती पागनीस

'दशपदी' हा कवी अनिल यांचा नवा कवितासंग्रह नुक्ताच वाचला पुस्तकाचे देखणे रूप आणि जयदेवाच्या अष्टपदीशी साधर्म्य दाखवणारे 'दशपदी' हे कवितासंग्रहाचे नाव, शिवाय अनिलांसारख्या ज्येष्ठ व श्रेष्ठ कवीचा ताजा कवितासंग्रह; ही ते पुस्तक वाचण्यापूर्वीची प्राथमिक उत्सुकतेची कारणे.

'दशपदी'ला तेच नाव का दिले आणि त्याचे वेगळेपण कोणते हे सांगणारी दीर्घ व अभ्यासपूर्ण प्रस्तावना—'दशपदी--दर्शन'—स्वतः अनिलांनी लिहिली आहे. तसेच 'पदचर्या' या शीर्षकाखाली विजया राजाध्यक्ष यांचे व अनिलांचे एक उद्‌बोधक संभाषणही कवितांआधी वाचायला मिळते. त्यासह कविता वाचून संपवल्यानंतर मनात सहजच काही प्रश्न उभे राहतात आणि काही विचारदेखील.

सुरुवातीलाच अनिल सांगतात की 'दशपदी' हा "प्रयोग" नव्हे. जाणीवपूर्वक काही केलेले नाही—घडले ते आपाततः. दशपदी म्हणजे दहा ओळींची कविता. गण, मात्रा यांचे यांचे तिला बंधन नाही. फक्त कवितेतील आशय दहा ओळींतच संपलेला असणे हेच त्यांच्या मते या दशपदीपणाचे वैशिष्ट्य आहे. दहा ओळींतच अनुभूतीचा विस्तार संपावा (आणि सर्वच कविता दहा ओळींत संपतात) हा रेखीवपणा कवितेचा मूल्यनिकष ठरतो का? त्या दहा ओळींमुळे आशयदृष्ट्या कविता समर्थ होताना दिसते का? हे खरे प्रश्न आहेत.

"....तशा काही यमकपद्धती दशपदीत नाहीत. अमुक एक वृत्त, जाती वा अक्षरछंद दशपदीत अधिक योग्य असेही नाही. चरणांत नियमित अक्षरसंख्या असली पाहिजे असेही नाही.... त्यांच्या चरणांतील अक्षरसंख्या ठराविक नाही. कुठे दोन चरण सारख्या अक्षरसंख्येचे असले तर तसे आपाततः झालेले आहे. हेतुपूर्वक नाही. मुक्तछंद नियमक असला पाहिजे असेही नाही. तो सयमकही असू शकतो. मुक्तछंदातील एका चरणाची मात्रासंख्या अमुकच असली पाहिजे ही अपेक्षाच असू शकत नाही. क्वचित दोन चरणांची मात्रासंख्या सारखीच भरेल, पण तसा नियम मात्र नाही." (पृ. १३) मग दशपदीचे वेगळेपण केवळ 'दहा-ओळी-पणा'तच आहे का! तसे असेल तर ते वेगळेपण

'दशपदी' : अनिल; मौज प्रकाशन गृह, खटावबाडी, गिरगाव, मुंबई ४;
११ सप्टेंबर १९७६; रु. १४/-

केवळ कविता वाचूनही लक्षात आले असते. प्रस्तावनेचा दीर्घ ऊहापोह पाहून वेगळेपणाबद्दल, नव्या प्रयोगशीलतेबद्दल अपेक्षा निर्माण होतात व अखेरीस त्या पुऱ्या होत नाहीत. शिवाय, दशपदी हा प्रयोग नव्हे तर ती भावजीवनाची उत्स्फूर्त अभिव्यक्ती आहे असे अनिल सांगतात, आणि " आपल्या छंद.शास्त्रात छंदांच्या घटकांचा आणि गण, मात्रा, अक्षरसंख्या इत्यादींचा विचार झाला पण चरणांच्या संख्येनुसार होणाऱ्या पद्यबंधांचा विचार झालेला मला आढळून आला नाही " म्हणून ' दशपदी 'चा खटाटोप, असेही तेच सांगतात. हा जाणीवपूर्वक खटाटोप असेल तर तो प्रयोग आहे हे म्हटल्यावर का खटकावे ? प्रयोगशीलता काव्यगुणांना बाध आणत नसली म्हणजे पुरे.

' दशपदी 'त आशयाच्या संदर्भात वेगळेपण शोधायला जावे तर, " सॉनेटमधील आशयाची अभिव्यक्ती एखादी लाट जोराने किनाऱ्यावर यावी आणि फुटून परत फिरावी तशी असते. आशयाचा चढउतार असावयास पाहिजे असेही म्हटले जाते. तसे दशपदीच्या अभिव्यक्तीत असावयास पाहिजे असे नाही. " ( पृ. १३–१४ ) हे अनिलांचेच शब्द हाती लागतात.

येथे कवितेतील आशय व त्याची अभिव्यक्ती यांच्या संदर्भात असा प्रश्न मनात येतो की, मग कविता दहाच चरणांची का असावी ? त्यातून आशय समर्थपणे, संपूर्णपणे व्यक्त होतो का ? या प्रश्नाला अनिल उत्तर देत नाहीत.

मग कवितेचे ' दशपदीपण ' बाजूला ठेवून तिचा स्वतंत्रपणे विचार करणे हेच केवळ हाती उरते.

' विराणी ', ' आणीबाणी ', ' तळयाकाठी ', ' चाललो ', ' तुझ्याविना ' ह्या कविता संपूर्ण काव्यसंग्रहातील सुंदर कविता आहेत. एकटेपणा, नि:स्तब्धतेत शांत बसून राहण्याची ओढ ह्या सगळ्या भावना विलक्षण तरल स्वरूपात येथे व्यक्त होतात.

" कशानेही उजळत नाही अशी काळीकुट्ट रात " आणि त्यामुळे देहाचेही परिमाण जावे अशी परिस्थिती. त्यात—

" हारल्याची हरवल्याची जाणीव सलत रहाते
अशा वेळी काळोखात विरून जावे वाटते ! " [ विराणी ]

ही तीव्र आकांक्षा, किंवा

" हृदयावरची विचारांची धूळ हळूहळू जिथे निवळत जाते
अशा एखाद्या तळयाच्या काठी बसून राहावे मला वाटते ! "
[तळयाकाठी]

हीच निःस्तब्धतेत विरून जाण्याची इच्छा पुन्हा व्यक्त होत राहते 'तुझ्याविना' या शीर्षकापासूनच एकाकी स्थिती जाणवते.

" कितीक काळ हालला असा तुझ्याविना
कळे न श्वास चालला कसा तुझ्याविना " [तुझ्याविना]

हा प्रश्न कवीला छळतो आहे. तुझ्याविना सर्वच संथ सावकाश. आकाश उजळते तेही सावकाश. तुझ्या आठवणीने जीव जळतो. " स्मरणावर प्राण जळे कसा तुझ्याविना ! " स्मरण आणि सरण यांतील नादसाधर्म्य जाणवून खिन्न सूचना समजते व कविता विलक्षण प्रत्ययकारी होते. तुझ्याविना हा काळ असा कसातरी गेला...

' चुकली तालात चाल लागला जिवास बोल
ढळलेला तोल सावरीत चाललो. " [चाललो]

आणि आता मात्र –

" खांद्यावर बाळगिले ओझे सुखदुःखांचे
फेकुन देऊन आता परत चाललो!" [चाललो]

ही निःसंगता कवीला येते.

या सर्व कवितांतून जी एकटेपणाची, उदासीची जाणीव आपल्या प्रत्ययाला येते तितक्या तीव्रतेने आणखी कोठेही येत नाही. "कशानेही उजळत नाही अशी काळोकुट्ट रात "; त्यात होणारी गुदमर, घुसमट, आणि दुःखाने येणारी निःसंगता ही जाणीव या सर्वांत गडदपणे पसरून राहते— वाचकालाही अस्वस्थ करते.

'पावसाळी सांज ', 'श्रावणझड ', 'उशिराचा पाऊस' या तीन पावसाच्या कविता उशिरा आलेल्या पावसाला अव्हेरू नये. दुखावू नये. तो " टिपून ल्यावा पापण्यांवरती कपाळीच्या घामामध्ये मिळवावा " ही कवीची इच्छा. हा पाऊस आणि एखादी संध्याकाळ कवीला पुन्हा एकटा करून टाकते.

" एकीकडे उरी भरून येते एकीकडे रिते होत राहते ! " [पावसाळी सांज]

पावसाळी संध्याकाळीचे धूसर, उदास चित्रण येथे जाणिवेच्या पातळीवर येते.

या तीनही कवितांतील ' श्रावणझड ' ही सर्वांत सुंदर कविता. " श्रावणझड बाहेरी मी अंतरी भिजलेला...." सर्वत्र एक चिंब, थिजलेले, साकळलेले आर्द्रपण. या संमोहनातून शब्दांनाही जाग येत नाही. पुन्हा एकदा निःस्तब्धता आणि सुखालाही मूकपणे सोसत राहणे, एवढेच.

' माघ ' आणि ' फाल्गुन ' या दोन ऋतुवर्णनात्मक कविता. कुसुमावतींच्या ' मध्यान्ह ' किंवा दुर्गाबाईंच्या ' ऋतुचक्र 'ची आठवण देणाऱ्या. परंतु त्या ललित निबंधांतली तरलता येथे नाही. दोन्ही कवितांत शब्दांचा सोस जाणवतो. विशेषतः ' फाल्गुन ' या कवितेत. फाल्गुनात पळसाची काहिली कशी होते—

"भडकती अंगारज्वाळा मखमली काळया कुसुंबी पुष्पमाळा."

'फाल्गुन' मधील शब्दबाजपणा हा असा—

"भरवशाच्या पिंपळावर आळ येते व ल्क लां च्या व ल्ग नां ची
ही वने प स्ता व ले ली भाळलेल्या वं च नां ची फा ल्गु ना ची."

याशिवाय ज्या कवितांमध्ये केवळ शब्दबाजपणाच आहे त्या कविता अशा 'तदात्मता', 'गतार्थ', 'हलन्त्', 'सगर्भ', 'स्वान्त'. पैकी 'हलन्त्' ही कविता केवळ शब्दाळ! या कविता अजिबात भिडत नाहीत उलट मन नाराज करीत राहतात.

जाता जाता एका गोष्टीचा न राहवून उल्लेख करावासा वाटतो तो 'एक दिवस' या दशपदीचा. ह्या कवितेचा आत्मा उघड उघड बहादुरशहा जफरच्या गझलचा आहे. (व त्याच्या नावाचा निर्देश नाही!)

"लगता नही है दिल मेरा उजडे दयार में" [बहादुरशहा]
"जीव लागत नाही माझा असा एक दिवस येतो....
....घर उदास बाग उदास लता उदास फुले उदास" [अनिल]

"उम्रे दराज माँगकर लाए थे चार दिन
दो आरजू मे कट गये दो इंतिजारमें" [बहादुरशाह]
"वाटते आयुष्य अवघे चार दिवसांचेच झाले
....दोन दिवस आराधनेत दोन प्रतीक्षेत गेले" [अनिल]

या साधर्म्याला योगायोग म्हणावे की अनिलांच्या उर्दू वाचनाची आठवण काढावी? "अनिलांच्या गझलांना एक उर्दू ढंग आहे. अनिलांनी उर्दू कविता प्रेमाने वाचलेली आहे. तिचे संस्कारही त्यांच्यावर झाले आहेत. 'चिरयौवन' या कवितेचे 'अभि तो मैं जवान हूँ।' या हफीज जालंदरींच्या रचनेशी असलेले साम्य सर्वांना ठाऊक आहेच." ('पदचर्या' : विजया राजाध्यक्ष) हा निर्वाळा मिळतोच. बहादुरशहाशी असलेले साम्यही सर्वांना ठाऊक व्हावे, इतकेच.

हे सगळे लक्षात घेऊनही, 'दशपदी'तून मनाच्या तळाशी काय उरते हे महत्त्वाचे. दशपदीच्या रूपाविषयीच्या प्रास्ताविक ऊहापोहातून हाती काही लागत नसले तरी या कवितांचे 'कवितापण' जाणवतेच. एकाकीपण आणि त्याची सोशिक अभिव्यक्ती, दाटून आलेली काळोखी निराशा, या सगळ्यातूनही निसर्गाच्या वेल्हाळ बदलांची नोंद घेणारे अनिलांचे रसिक मन जाणवतेच. काट्याकुट्यांतून जातानाही फुलातून जातो आहोत ही स्वतःची समजावणी आणि नंतरचे हळूहळू निःसंग होत जाणे हे त्यातले खिन्नपण "पल्लवांतून सलगून" बसते.

'दशपदी'ची हीच बेरीज-वजाबाकी.

शंकर वि. वैद्य

## ओळख

"आपली ओळख जन्माजन्मांची आहे का!"
—कसा बेचैन करणारा प्रश्न विचारलास!
जेव्हां रागदारीची मैफल सुरू होते
आणि विस्तारत जातें मन
पसरत चांदण्यासारखें, होत विश्वाकार
एका क्षणाला दाद देतांना आपोआप
आपण पाहतों एकमकांकडे
तेव्हां कुठले तरी गूढ धागे
उमजलेले असतात खोलवर...

एवढें खरें!

आतां गाणें संपलेलें आहे
आणि साऱ्या दिशा मिटलेल्या आहेत
या क्षणाशी तू-मी जवळ आहोंत
—यापलीकडचें मला माहीत नाही...
नेऊन टाकतात शेवटी
हीं माणसें
माणसांचीं कलेवरें समुद्र-किनाऱ्यावर...
पुढचें मला ठाऊक नाही

तुझ्या प्रश्नाने मला व्याकुळ करूं नकोस
व्याकुळ होऊं नकोस
—राणी, गा ना जरा!

सतीश तांबे

## खालसा संस्थानासारखं

एखाद्या खालसा संस्थानासारखं वाटतं रहातं.
सुखी नागरिकांच्या कत्तलीसारखे आवाज
ऐकूं येत असतात सतत. तरीही सुस्तच.
स्वतःच्या स्तनांत गुरफटून गेलेली एक नर्तकी/
चंद्रप्रकाशांतही जिची सावली चेतवते मला
ती अश्वशाळेंतल्या सगळ्या प्रिय घोड्यांना
माझ्या नजरेसमोर मारून टाकत जाते
चाबकाच्या एकेका फटकाऱ्यासरशी.
तरीही डोळ्यांतून तिचे स्तन हालत नाहीत.
खालसा संस्थानासारखं वाटत राहतं.
नागरिक गेले जहन्नममध्ये !
घोडे स्वर्गात गेले ! सुखांत न्हाले !
नर्तकीला मालकीने कवटाळावंसं वाटतं
आणि अचानक आठवतं हातांचं नास्तित्व,
खालसा संस्थानासारखं चिपाड अस्तित्व.

शशिकला ज. कालेंकर

## पांढरंशुभ्र बदक

तू अन् मी
दोघं तळ्यांत पाय सोडून बसलेलों.
हिरव्यागार फांद्या तळ्यावर झुकलेल्या.
एकच पांढरंशुभ्र बदक.
चर्चमधल्या प्रार्थनेचे सूर
तळ्यामधला प्रकाश सजीव करत होते...

झांकळलेल्या संधिप्रकाशांत
मला त्याचा चेहरा दिसला
तळ्यांत विरत असलेला.

वसंत दत्तात्रेय गुर्जर

## चुकभूल

आपलं घरटं विसरतां येईल का
वास्तवाच्या वाळवंटाला हंसताना

वास्तविक मन ढळलं
आठवणी खुडल्या
स्वप्नं ढाळलीं

मनमानी माती बदलली
आह फुलाचं रोपटं लावलं

नवा अर्थ उलगडून
आनंद गिरवला,

भलतं सलतं मनातून काढून
प्रश्नांना होकारांची आरास केली

आपलं घरटं विसरतां येईल का
पक्ष्यांनी घर बदलून

तेवढी एक
चुकभूल
आपण द्यावी घ्यावी

विजया जहागीरदार

## जगतों तसे जगूं द्या

आम्हां नकोच कांहीं, जगतों तसे जगूं द्या
छाया नको न पाणी, सुकतों तसे सुकूं द्या

तुमची नको दया अन् ती जीवघेणी कींव
नजरेंत तुच्छतेच्या रेखाकृती सजीव
आभाळ पांघरोनी धरणीवरी निजूं द्या

छळतात शब्दबाण, अपमान, क्रुद्ध वाणी
या सौम्य विषप्रयोगें मरतात स्वाभिमानी
मानापमान दुबळे अमुच्यासवें असूं द्या

खांद्यावरी पताका, इतुकी ज्वलंत खूण
झुंझार जीवनाची हृदयास रक्तआण
दो हात मृत्युसंगे रंगांत रंगवूं द्या

किरणासही उमाळे फुटतील युगायुगांचे
कैसें गहाण टाकूं स्वामित्व त्या क्षणाचें
ती सुप्रभात भरल्या डोळ्यांतुनी फुलूं द्या

आम्हां नकोच कांही, जगतों तसे जगूं द्या

कृ. श्री. पेडणेकर

## युगंधराचा संहार हवा !

विश्वच आहे झुलता झोका
त्यावर अपुलें शरीर फेका !

कितीक हलचल
कितीक किलकिल
करणारी ही मदिरा झोका !

स्त्रिया कलंदर
पुरुष बिलंदर
या विश्वाचें विकती मंदिर

आम्ही दुर्बल
तुम्हीहि निर्बल

होउन बसला तोच अमंगल
क्षण नियतीचा
प्रखर भीतीचा

प्रचडं अपुले संसार शिवा !
युगंधराचा संहार हवा !

## आपली सावली ओलांडून जायला

एका उदास मुलीच्या हातांत असावी घळती डहाळी
तसं मीं ओटांवर तोललंय हें दीर्घ रक्तफूल
आरक्त अनोळखी मुखासारखं
माझ्या देशाच्या.
दोन आहेत ते. रात्र नि दुःखासारखे, दोन पुरे.
भुकेलेले नि सावकार : सूर्याचं ऊन पांगावं
नि पोहोचूं नये तें कधीच खोल खळग्यापर्यंत
तसे दोन आहोंत आम्हीसुद्धां. मला
नि त्या उदास मुलीला
घळती डहाळी नि हें दीर्घ रक्तफूल
हीं केवळ प्रतीकं आहेत
आपआपल्या आयुष्यांत शिरण्यासाठी सन्मुख
हें मला पक्कं माहीत आहे. रात्र केवढी थंड.
म्हणतां येईल तिला "भेटूं पुन्हां कधीतरी"
नि जग लागेल स्वीकारायला
नंतर भुकेचे डोहाळे, आक्रंदनाचे व्याकुळ
नि प्रचंड पान्हा फुटलेला म्हणून लढाईचा. .

आमचें दीर्घ रक्तफूल छाटलेलें झेंड्यासारखें
आणि ओटें वाहतीं भळाळ
रक्ताच्या छातीसारखी,
मी उघडून टाकतों म्हणून एकूणएक सर्वांच्या खिडक्या.
भुकेल्या जमावासारखा मी घुसतों या सर्वस्वी
घरंगळत घरंगळत पांगणाऱ्या घटनेच्या अंतस्थात

मी घुसतों आंत आंत नि खिंकाळतो
गलिच्छ सत्तावीस दिवसांच्या उषासारखा.

माझ्या देशाच्या आरक्त मुखात
मी घुसतों आंत आंत

मोजतों सगळे दांत
दाखवायचे नि खरे
दिमाखाचे नि मळ चढलेले.

बत्तीस आहेत हे देश
या दिमाखी नि मळखाऊ दातांसारखे.
म्हणून बत्तीस हवींत आपल्याला रक्तफुरं
नि बत्तीस घळघळत्या डहाळ्या
आपले बत्तीस बत्तीस जन्म ओसंडून
या देशाच्या आरक्त मुखावर पडणारी
आपली सावली ओलांडून जायला.

---


**ऋचा** नव्या वाचकांसाठी खास सोय

खालीलपैकी कोणत्याही ठिकाणी किमान दहा रुपये देणगी देऊन 'ऋचा' चे सर्व (दहा) अंक आपण मिळवू शकाल.

---

**अकोला :** श्री. पुरुषोत्तम बोरकर, अघोर वाडा, जयहिंद चौक, जुने शहर.

**डोंबिवली :** श्री. परेन जांभळे, ४ सीताबाई निवास, दीनदयाळ क्रॉस रोड.

**नागपूर :** श्री. अनिल दिगंबर कुलकर्णी, सेंट्रल बझार, नवी रामदास पेठ.

**नासिक :** श्री. प्रफुल्ल चौधरी, चौधरी बिल्डिंग, बोहरी लेन.

**पुणे :** सौ. सुप्रिया अत्रे, यशोधन, इंदिरा सोसायटी, एरंडवणे.

**बडोदे :** श्री. दिलीप घोलप, खंडेराव मार्केटसमोर.

**मुंबई :** १. श्री. सतीश काळसेकर, २८ शिशिर, बँक ऑफ बरोडा कॉलनी, बामनवाडा, विलेपार्ले (पूर्व).
२. सौ. वासंती मुझुमदार, प्रसाद, ६९ रानडे रोड, दादर.

किंवा

**ठाणे :** १. ज्ञानविज्ञान प्रकाशन, सोनोरी, ३६ चरई.
२. श्री. म. पां. भावे, ४६ आनंदाश्रम कॉलनी, नौपाडा.

---

**आपल्या नव्या कविता किंवा काव्यविषयक लेखनही 'ऋचा' साठी हवे आहे.**


---

अशोक सोनवणे

## रस्ते वळतांना

हें बघ, पाणी बरसल्यावर
जपून पावलं टाकतांना
अस्मान पेलण्याच्या भरीस पडूं नकोस;
जरी ठाऊक असतील जमीनगण्यांना
आभाळपाण्याचीं नातीं.
धारेंतल्या तुटक येंबांचे अनुस्वार, पोकळ
मोठे करीत जा विचारतरंगाच्या परिघाहून वा
हवा सुगंधजड झाल्यावर हिंडत फिर, फुलांच्या
गावागावांतनं कुठली कळी फूल झालीय तें बघत.
पण जमलंच्च तर थरकूं दे दिठी रिपरिपचालींत.
कदाचित् ताल, चाल सारं कांही जुळेलही.

न जुळणाऱ्या स्वरांच्या नादीं लागूं नकोस
गज्जली नादिष्ट असतात.
पण रस्ते वळतांना तिठ्यावर
कांही सूर पेरायला हरकत नाही.
न जाणो—
वळणाचं पाणी आभाळ तोलेलही...!

किशोर दीक्षित

## भयाण रात्र

होतसे अंधार जेव्हां
एक पाकोळी मनाची
बावरी होऊन तेव्हां
वाट शोधे आसऱ्याची

घट्ट गोवूनी उभीं हीं
पाय अंधारांत झाडें
वैसले देण्या सहारा
भूतखेता भग्न वाडे

गार वारा वोचरा अन्
धून वाहे ती भयाची
हूल देते हालणारी
सावली माझी स्वतःची

पाउलीं प्रत्येक माझ्या
पानपाचोळा चुरावा
अन् कुणाच्या चाहुलीने
जीव माझा थर्थरावा

या अशा एकांत रातीं
श्वापदें देती पहारे
कल्पनांचे दैत्य सारे
आणती लाखो शहारे

दोन कविता : **मनोहर ओक**

# संक्रमणं

मी दारूत भांग पाह्यले
भांगेत चरस
चरसात चंडोल
कोकेन लालपरीत

मीं नशेत संक्रमणं केलीं
जाणीव-नेणिवेच्या छटा छटा छानल्या
पांढरा-ते-काळा प्रवास

प्रत्येक रंगाच्या क्षितिजावर फडफडलों
प्रत्येक रंगाचे गभीर-देव्हार-थडगीं थ.थडलों
माझ्या मिट्ट-प्रवासात तीरासारख्या पांढऱ्याचीच मला सोबत

माझे दूर मीं जवळ केले
झाले जवळ दूर
बघतां बघतां दिवसांच्या रात्री
रात्रीरात्रींत प्रकाश पहाटले

हां हां म्हणतांच मैत्र्या अंधारल्या
पळपुट्या अंधारात
घर घर म्हणतांच पाय घसरले
आरशातल्या केळीचीं सालं

मी एक उघड-गौप्य, स्वप्नं, तुरुंग
माझी परवल हरवलेली
उजाड माळाचाच घरोबा

## करणी

गव्हाचे दोन दाणे इकडेतिकडे होतात
माणसं अंधारतात

गव्हाच दोन दाणे तिकडेतिकडे होतात
माणसं लाभतात; उजळतात

परत
गव्हाचे दोन दाणे वाकडेतिकडे चालतात
माणसं दिसतात, भेटतात, बोलतां येत नाई
बोलून काई अस्तं असं नाई
बोलतां येत नस्तं असंही नाई
नुस्ती कालवाकालव, भिंगातील अंतराळ–तरळ

आतां
गव्हाचे दोन दाणे डोळ्यांतल्या बाहुल्या खातात
बाहुल्या खातांच मरून जातात

तरी
गव्हाचे दोन दाणे

**साभार पोच** : ' नितान्त ' : वा. रा. सोनार; चेतश्री प्रकाशन, देशमुख चाळ, अमळनेर, जळगांव; ८ फेब्रुवारी १९७६; रु. ७/–

सुनीता पुजार

## तुझ्याकडे निघतांनाही

खरें तर
तुलाच ठाऊक
त्याच्यापेक्षांही
माझे भरण्या-मिटण्याचे क्षण...
त्याने कधी
कोरडें बोटही लावलें नाही
रक्तांतले मोहोळ
रोखून धरलेल्या मला...
तू तर
भेटलास तेव्हां तेव्हां
बरसून रिकामें केलेंस स्वतःला,
मलाही...
मग कां आठवतो
त्याचाच चेहरा
तुझ्याकडे निघतांनाही ?

अंधार

लघु-अ-नियतकालिक. अंक ९/१० : ४ जाने. ७७.
मुद्रक-प्रकाशक : सुशीला पानसे, ज्ञानविज्ञान प्रकाशन, सोनोरी, ३६ चरई, ठाणे ४०० ६०१. मुद्रणस्थळ : संगम प्रिंटिंग प्रेस, जुना मुंबई रस्ता, ठाणे ४०० ६०१.
संपादक : रमेश पानसे, सुनील कार्णिक.

# 'तोच चंद्रमा'

सुधा जोशी

'तोच चंद्रमा' हा शांताबाई शेळके ह्यांचा पहिला गीतसंग्रह. या संग्रहाचे शीर्षक ही एक ओळखीची खूण आहे. 'तोच चंद्रमा नभात' हेच बाईंचे पहिले गाजलेले गीत. तिथून पुढे बाईंचा गीतप्रपंच अनेक अर्थांनी भरभराटीचा होत गेला. 'रामराम पाव्हनं' या चित्रपटासाठी त्यांनी केलेली गीतरचना हे वस्तुतः बाईंचे या क्षेत्रातील पहिले पाऊल. त्यानंतर चित्रपटाशिवाय नाटक, आकाशवाणी, ध्वनिमुद्रिका अशा अनेक निमित्तांनी त्या गीतरचना करीत आल्या आहेत. गेल्या सुमारे २५ वर्षांतील बाईंच्या गीतलेखनाचे फलित म्हणजे ११० निवडक गीतांचा हा प्रस्तुत संग्रह.

बाईंचे गीतलेखन अर्थातच नैमित्तिक म्हणावे लागेल. नाटकातील किंवा चित्रपटातील एखाद्या प्रसंगाच्या संदर्भात गीत रचणे, तसेच संगीतदिग्दर्शकाने कल्पिलेल्या स्वररचनेशी मेळ घालणारे असे त्या गीताचे अंत:संगीत निर्माण करणे हे एक तंत्र आहे. हे तंत्र आत्मसात करून ते स्वान्तःसुखाय राबवणे—त्याच्या मर्यादा स्वीकारून त्याचे सामर्थ्य पणाला लावणे—तंत्राच्या चौकटीत वावरूनही पुन्हा आपले गीत मुक्त ठेवणे—त्याचे स्वत्व जपणे, हे उघडपणेच एक आव्हान आहे. प्रत्येक रचनेत ही किमया साधणे अर्थातच अशक्य आहे. परंतु काही वेळा ती साधता येणे हे खचितच श्रेयस्कारक म्हणावे लागेल. ग. दि. माडगूळकरांसारखा समर्थ पूर्वसूरी असतानाही बाईंनी या क्षेत्रात आपलेही एक स्थान निर्माण केले. कारण गीतरचनेतील पूर्वसूरींचे तसेच पूर्वपरंपरांचे संस्कार व संचित घेऊन बाई रचना करीत आहेत हे जितके खरे तितकेच त्यांना गीतनिर्मितीतील 'स्वधर्म' गवसला आहे, हेही.

बाईंच्या गीतलेखनाचे प्रथमदर्शनीच मनात ठसणारे व अनेक वाचनांनंतर मनात स्थिरावत जाणारे वैशिष्ट्य म्हणजे त्यांच्या गीतांच्या रचनाबंधांतील वैचित्र्य. विविध रचनाप्रकारांचे मागणे पुरवू शकणारा लवचिकपणा त्यांच्या रचनाक्षमतेत आहे. अगदी तपशीलात्मकच विचार करायचे म्हटले तर लक्षात येते की इथे लावणी, पद, भूपाळी, भजन, भलरी गीत, अंगाई गीत इत्यादी पारंपरिक

---

'तोच चंद्रमा' : शांता ज. शेळके; अभिजित प्रकाशन, मुंबई ५१; १९७३; रु. ८/-

गीतप्रकार आहेत; गझल, बालगीत इत्यादी आधुनिक गीतप्रकार आहेत; ठुमरीच्या ढंगाने गावयाची 'का धरिला परदेश' इ. पदरचना, टप्प्याची धून घेऊन रचलेले 'आज सुगंध आला लहरत', चीजेसाठी बोल म्हणून गुंफलेले 'संगीतरस सुरस' अशी शास्त्रीय गायनाश्रयी रचनाही आढळते. 'ना ना ना ना' किंवा 'पालखी हाले डोले' या गीतांच्या रचनेचा ढंग बंगाली गीतांनुसार घडवलेला आहे तर 'पप्पा सांगा–' किंवा 'हाऊस ऑफ बॅम्बू' या पाश्चात्त्य गीतांच्या स्वैर प्रतिकृती आहेत.

तपशीलात्मक वैचित्र्य हा अर्थातच श्रेयाचा निकष ठरू शकत नाही—वैचित्र्य हे काही निखळ कलामूल्य नव्हे. पण एकतर वैचित्र्य हेच केवळ बाईंच्या गीत-रचनेचे वैशिष्ट्य नव्हे, आणि दुसरे म्हणजे हे वैचित्र्यही केवळ तपशीलात्मक, ढोबळ, स्वररचनांच्या अनुषंगाने अपरिहार्यपणे आलेले असे नाही. ते निव्वळ बाह्य घाटातील नाही. आंतर–रचनेतीलही आहे. गीतातील शब्दकळा, कल्पना चित्रे, भाषेचा बाज, अभिव्यक्तीचा ढंग, लयीचे स्वरूप ही प्रत्येक गीताच्या भावप्रकृतीनुसार बदलती आहेत रचनेतील हा चतुरस्रपणा बाईंच्या गीतलेखनाला श्रेयस्कारक ठरला आहे.

बालगीतासारखा एखादा रचनाप्रकार जरी विचारात घेतला, तरी त्यातील भावावस्थांचे व त्यातून अपरिहार्यपणे येणारे गीताच्या अन्य घटकांताल वैचित्र्य जाणवण्याजोगे आहे. एक साधेसे उदाहरण 'कोण कोण येणार?' व 'किलबिल किलबिल' या गीतांचे देता येईल. दोहींतील अनुभव स्वप्नसाजरा खरा, पण 'कोण कोण येणार?'मधील स्वप्नरम्य अनुभव पारंपरिक संकेतांनी रंगलेला आहे. त्यासाठी स्त्रीगीताची पारंपरिक, साधीसोपी, एकपदरी लय समर्पक वाटते. 'किलबिल 'मधील स्वप्नरम्यतेचे वळण वेगळ्या ढंगाचे, तेथील रचनाही तदनुसार वेगळ्या वळणाने घडली आहे या संग्रहातील लावणीच्या ढंगाच्या विविध रचनांतूनही अशा स्वरूपाचे वैचित्र्य स्पष्टपणे जाणवते.

बालगीताच्या निमित्ताने बाईंच्या आणखी एका श्रेयाचा उल्लेख करावासा वाटतो ही गीते यशस्वी झाली त्याचे मुख्य गमक लहान मुलांचे भावविश्व बाई आपलेसे करू शकल्या हे आहे हे भावविश्व उसनेपणाने मिरवल्यासारखे अवतरत नाही. प्रौढ संवेदनाक्षमतच्या माराखाली ते लवलेले नाही. ('ओली नक्षी। पाऊसपक्षी। कुणी पाहतो वाचू' अशा ओळी अपवादात्मकच म्हटल्या पाहिजेत.) छोट्यांच्या

अनुभवांचे साधे (non-complex) रूप बाईनी ढळू दिलेले नाही. नकली कल्पनारम्यता, लटकी निरागसता यांचा 'वापर' या गीतांत नाही.

उडो, बागडो, पडो, धडपडो,
लागत कोणा नाही

असे येथील स्वप्नरम्यतेचे सहजसिद्ध रूप आहे. अखेर बालगीतांतीलच नव्हे तर अन्य गीतांतील कसदारपणाही त्यांतील भावानुभवांच्या 'अस्सल'पणावरच्च मुळात आधारलेला आहे, हे उघडच आहे. जिथे मूळ अनुभवात कच्चेपणा आहे, तिथे तो गीताच्या सर्वांगातच झिरपला आहे.

प्रेमगीत ही आणखी एक फसगत करणारी जागा आहे. मळलेल्या पायवाटेने घसरत जाण्याचा धोका इथे बराच संभवतो. भावुकताही ग्रासू शकते. बाईंचे कलात्मकतेचे भान इथे पक्के जाणवते. प्रेमानुभवाचे चित्र रेखाटणाऱ्या गीतांत

हा मंद मंद वारा ही धुंद रातराणी

असे भावुकतेकडे झुकलेले गीत एखादेच आढळते. तसेच तांब्यांचे स्मरण करून देणारे काही चरण :

कसे पोचवू गीत तुला, अफाट वाहे मध्ये नदी
[ प्रीती जडली तुझ्यावरी ]

किंवा

आता कुठले मागे फिरणे
इथेच बुडणे किंवा तरणे
सर्वस्वे मी शरण तुला रे
तूच हवे ते करी ! [ भलत्या पडले भरी ]

हे पूर्वसूरींचे वळण गिरवल्याचे तुरळक व अपवादस्वरूप उदाहरण म्हणावे लागेल. 'माझी न मी राहिले 'सारखी 'गिरवलेली' रचनाही बाईच्या प्रेम-गीतांची प्रातिनिधिक रचना म्हणता येणार नाही.

शब्दांहुनी खरी ही डोळ्यांमधील भाषा
येतील काय हाती पाण्यावरील रेषा !
या वाहत्या जळाला देऊ नको किनारे !

असे तरल भावदर्शन हाच बाईंच्या प्रेमगीतांचा 'स्व 'धर्म आहे. केवळ मात्र अर्थातच नव्हे.

पारंपरिक गीतप्रकारांकडे वळले तरी बाईंच्या रचनेतील 'स्व 'त्व जाणवण्याजोगे आहे. पारंपारिक गीतप्रकारांचे माध्यम बाईंनी अनेकवार योजले आहे. अशा रचनांत पारंपरिकतेचा गंध राखून, तिच्याशी ऋणानुबंध जपून शिवाय एक ताजेपणा, स्वतंत्र वळण त्या आणू शकल्या आहेत. 'पावनेर ग मायेला करू' या गीतासारखी इतरही उदाहरणे या संदर्भात सांगता येतील. अर्थात पारंपारिक घाटांच्या केवळ पुनरावृत्तीच अशा रचना मुळीच आढळत नाहीत असे मात्र नाही.

बाईंच्या गीतांचा विचार करताना एक गोष्ट ठळकपणे जाणवणारी आहे, ती म्हणजे बाईंची गीतप्रकृती एकीकडून पारंपरिक रचनाप्रकारांशी, लोकगीतांशी निकटचे नाते सांगते, तर दुसरीकडून ती तरल भावकवितेशी सूर जुळविते. त्यांच्या गीतलेखनाचे हे दोन महत्त्वाचे पैलू म्हणता येतील.

लोकगीतांच्या कुळीतील गीतप्रकारांशी बाईंच्या गीतप्रकृतीच्च सहजधर्माने नाते जुळते. साधे पण ठसठशीत रूपसौष्ठव, शब्दकलेचा जिवंत बोली ढंग, सहजलालित्य, प्रासादिकता, सोप्या पण ढंगदार लांयी, रचनेतील प्रवाहिता हे धर्म बाईंच्या अशा रचनेत अगदी उपजतच असतात. अस्सल मराठमोळ, इथल्या मातीचा गंध घेऊन आलेले असे त्यांच्या या गीतांचे स्वरूप आहे. बाईंच्या गीतांचा हा 'मन्हाटी' बाज हा बराचसा त्यांच्या पूर्ववयातील संस्कारांतूनही आलेला म्हणता येईल. त्यांचे लहानपण खेड्यात गेले. तिथे कानावर पडलेल्या लोकगीतांच्या शब्दांनी व सुरांनी बाईंच्या लेखनावर आपली अशी पक्की मुद्रा उमटवली आहे.

एकीकडून अशी ठसठशीत लावण्यकळा घेऊन आलेली ही गीतरचना पुनः सूक्ष्मतरल काव्यात्मतेचे वळणही जपताना दिसते. बाईंची उमेदीची वर्षे आधुनिक व नव्या भावकवितेच्या सान्निध्यात उलटली. भावकाव्यरचनाही त्या बऱ्याच वर्षांपासून करीत आल्या आहेत.

क्षितिजाच्या पार दूर
मृगजळास येई पूर
लसलसते अंकुर हे
येथ चालले जळून

अशा ओळींतून त्यांच्यातील कवयित्रीचा स्पर्श जाणवतो. गीताचे 'गीत 'त्व भंगू न देता त्यात अवतरणारी तरल काव्यात्मता त्यांच्या गझलरचनेत प्रामुख्याने जाणवते.

चेटूक सावल्यांचे घेरीत ये जिवा
जाती मिटून वाटा साऱ्या अधांतरी

किंवा

वाहत्या पाण्यातुनी गुंफीत जावे साखळी
एक नाते मी तसे शोधीत आहे आपले !

हे काही चरणही याची साक्ष पटवतील. याच संदर्भात 'जाईन विचारीत रानफुला' व 'जिवलगा' या गीतांचे स्मरण होणे अपरिहार्य आहे. त्यांच्या अनेक सहजसाध्याशा भासणाऱ्या रचनांतील प्रसरणशीलता, सूक्ष्मार्थ पेलण्याची क्षमता लक्षणीय आहे. कवयित्री शांताबाई त्यांच्या गीतलेखनातून अशा जाणवत राहतात.

आणखीही एक गोष्ट या संदर्भात लक्षात घेण्याजोगी आहे. नैमित्तिक व हुकमी लेखन करताना काही वेळा केवळ सुबक रचनाच पदरी पडणे, स्वराकृतीच्या जरबेत गीताने आकार घेणे म्हणजे गीतसंगीतानुकूल होण्याऐवजी केवळ संगीताश्रयीच वठणे, हे सगळे ओघाने येतेच. परंतु बाईंच्या अशा ढळलेल्या रचनांतूनही हलकाफुलका नटवेपणा वा सवंगपणा आढळत नाही. नादमाधुर्याच्या लटक्या आभासात बाई फसत्या आहेत वा विशिष्ट नादाकृतीच्या मोहात गुंतल्या आहेत, असे दिसून येत नाही तसेच, प्रासादिकता हा बाईंच्या रचनेचा सहजधर्म आहे; परंतु त्यातून अभिव्यक्तीतील ढोबळपणा निष्पन्न झालेला नाही. आणखी एक महत्त्वाची गोष्ट म्हणजे भावुकते-पासून, भावविवशतेपासून त्यांनी आपले लेखन जपले आहे. शांताबाईंमधल्या कवयित्रीचा त्यांच्या गीतलेखनाला असलेला अंकुश असा अनेक पदरींनी जाणवतो. आपल्या एका गीतात बाई लिहितात :

असेन मी, नसेन मी — तरी असेल गीत हे
फुलाफुलांत येथल्या — उद्या हसेल गीत हे

अशी काही अम्लान गाते बाईंनी खासच आपल्याला दिली आहेत. अशा गीतांत शब्दांतून व्यक्त होणारे भाव व संगीत यांनी परस्परांना चैतन्य लाभवून दिले आहे ही खूण पटते. बाह्य गेयतेशी सूर जुळविणाऱ्या अशा अंतःगेयतेचे दर्शन बाईंच्या कोळीगीतांनी फार चांगल्या प्रकारे घडविले आहे. शब्दांतील, अनुभवांतील अंतःसंगीत ओळखल्याची खूण पटवणारी बाईंचा अशी गीते हे या संग्रहाचे देणे आहे.

शंकर रामाणी

## ख्रिस्तजन्म

मध्यरात्रीच्या हिवाळी झोपेंत ।
माझें स्वप्नपाखरू ललकारत गेलें
एका अंधायुगाचा अंत झाणि
विवस्त्र विराटांतून
एक स्फटिकशुभ्र प्रकाशपुत्र
दूरच्या टेकाडावर अल्लाद उतरतांना
मीं पाहिला...

नंतर केव्हातरी
माझ्या जाणिवांना जाग आल्यावर
बेमुर्वत त्यांनी तें स्वप्न पुसून टाकलें
आणि माझ्यांतील अटळ अंधाराला
मी सराईतपणें शरण गेलों.

## अव्यक्त

## अजूनहि कदाचित्...!

गजामधून बाहेर पाहत असतां त्याला वाटायचं
बाहेरच्या कोलाहलांतून अजूनही समूहघोष ऐकूं येईल,
एखादा गरुड आकाशांत झेपावतांना दिसेल,
अजूनही कदाचित् आपला पुनर्जन्म होईल...
—तो जो माणूस मेला
त्याची गोष्ट!

अंबरीष मिश्र

## येशील ?

समज,
की मी ह्या झिम्म झिम्मड पावसात
अगदी भिजून ओलाचिंब झालों—
इतका चिंब .....
की पाणी होऊन
पाण्यासारखा वाहत–धावत
नदी–नाल्यांतून, गटारांतून
पळत पळत
त्या दूऽऽरच्या अजस्र थंडगार समुद्राला
जाऊन मिळालों—
तर तू
एक संध्याकाळ होऊन
येशील समुद्रावर
शंख–शिंपले शोधायला ?

---

लवकरच प्रसिद्ध होणार : तीन नव्या कवींचे कवितासंग्रह

गुरुनाथ धुरी
कृ. श्री. पेडणेकर
अशोक नायगावकर

ज्ञानविज्ञान प्रकाशन
सोनेरी
२६ चरई
ठाणे ४०० ६०१

---

**साभार पोच :** (१) 'कल्पवृक्षाची फळे' : विजया जहागीरदार; प्रकाशक : गो. ना. मुसळे, मुक्ता भवन, गोकुळ पेठ, नागपूर; रु ३ (२) 'गीत–गीता' : विजया जहागीरदार; प्रकाशक : मोझरी गुरुकुंज आश्रम; रु. २–५०.

वा. रा. सोनार

## ग्रेव्हयार्ड

आता येथून पुढे ग्रेव्हयार्डला
सुरुवात होईल.
तुटलेल्या जिभांवर पाठ केलेल्या प्रार्थना
सांडायला हरकत नाही,
थडग्यांच्या भिंतींना किमान
कान नसतात या विश्वासाने.
कोवळ्या हातांच्या खिळ्यांतून वाहणाऱ्या
रक्त–ओघळासारखा प्रकाश सर्वदूर.
कावळ्यांनी झाकलेलें आकाश
प्रत्येकाच्या माथ्यावर शापातून उगवलेलें.
मोकळ्यावरचा वारा, काळजांची पंखमीट,
आंतड्यांत अडकलेलीं अवेळची करुणाष्टकें...
सारें शववाहिकेतून निर्धारपूर्वक येथपर्यंत.
गालावर गोठलेले थेंब काचेचे
गृहीत धरणारा न्यायमुद्रेचा जाडंजूड
पालखीतल्या पादुकांसारखा ग्रंथ...संहिता.
पलीकडचें कुंपण कधीच तोडलेलें.
आता खाचांतून धुकें जाईल
तेथपर्यंत ग्रेव्हयार्डचा साळसूद प्रदेश
प्रत्येकाच्या पावलांसाठी.

सुभाष प्रभू

## एक सावली

एक सावली सतत माझी पाठ शिवत असते...
वळून पाहावं तर ती बेमालूम हवेंत मिसळून गेलेली
नि हवा गर्द.
मग मी अधिकच रोखून पाहतों
तर तें एक झाड असतं आकाशभर पसरलेलं
आणि उन्हं उतरत असतात...

वसंत दत्तात्रेय गुर्जर

## चेहरा

तुझा चेहेरा असा कसा रे
दुर्मुखलेला
केशवसुतासारखा
आणि हें एक नवलच
मढेंकर
तुझ्या पाठीमागच्या
चाळींत राहयचा
तरो बरंच रे बरं
कोलटकर
चित्रं काढतो
तू त्याला सांग ना रे
केशवसुतांचें स्केच करायला
आणि
मढेंकरांच्या चाळीचं मुखपृष्ठ काढायला
पण त्याचे खांदे कां रे पडले
आणि
हे कविता–बिविता पण गोड लिहायचे
पण
ह्यांचे चेहेरे
ते आवडत नाहींत रे मला
बाकी
तू आत्तां हंसलास मात्र छान
काय वाटलं माहिती आहे,
ह्यांचं कारुण्यच तू हंसण्यात पिऊन टाकलंस।
तुझा चेहेरा असा कसा रे

**दोन कविता** : अशोक नायगावकर

## मग पुन्हा डौलदार रथाच्या पुढे

घोडा आकाशात उडाला उंचच उंच
( बाराव्या शतकातला किंवा तेराव्या शतकातला असेल )
कुठे घेऊन गेला ? आमच्याच पावलांवर अडखळला.
निःस्तब्ध कोसळला.
नर्मदेच्या पाठीवर आमच्या चाबकाचे फटकारे सोसून
उठलेल्या वळांच्या साक्षी संगमरवरी मीनाक्षीच्या आघाराने
उभ्या आहेत. इथे एक शतक संपलें.
घोडा पुन्हा मात्र आकाशात उडाला नाही.
जमिनीवर संथपणे चालत पावलांच्या धप्प आवाजात
स्वतःचा विचार करूं लागला. अजून तीन शतकें बाकी
आहेत. इथे पुन्हा एक शतक संपलें.
मग पुन्हा डौलदार रथाच्या पुढे
दिमाखाने घोडा धावूं लागला.
ही त्याच्या आयुष्यातील शेवटची महायात्रा
इथ आतम शतक सपल.

## स्वामी अमीवानंदांचे चरणीं

'हें असेंच आहे'च्या ठाशीव रचनेची साशंक धडधड
सतत सलते आतून
जें आहे म्हटल्याने नसतें साधत फारसें
अथवा पिटाळल्यानेही
जें सर्व मुळाक्षरांना धुळीस मिळवून
अलिप्त खदखदतें
त्या चुंबकीयास पकडणारे सापडतात पुन्हा
त्याच्याच कक्षेत
तें जिथून येतें त्याचें
जें थिजून असतें त्याचें
नांव आम्हांस माहीत नाही
खरेंच माहीत नाही
हें असण्यानसण्याचें पंचामृतस्नान
स्वामी अमीज्ञानंदांचे चरणीं ॥ पुढे चालूंच

विजयकुमार पवार

## हांक दे ना

निळें आकाश
तांबडा सूर्य
पेटल्या पहा या दिशाही
काळी माती
हिरवं रान
वेळ हीच मोहराची
साथ माझी
साद घाली
आग हवी विझण्यास ही
एकदां तू
हांक दे ना
सूर्य कलण्याआधी तरी !

कृ. श्री. पेडणेकर

## तिच्या मनामध्ये

तिच्या नावामध्ये काय !
संथ वाजतात पाय
शुद्ध हातामध्ये हेतू
मला घे तू मला दे तू
तिच्या वाणीमध्ये गाणीं
लौकिकाचीं सनातनी.
माझ्या आवेगांत वक्र
आक्रंदते तिचें चक्र:
अलौकिक ओघवती
रीत. लावण्यांत प्रीति
उन्मनीत धुंदी, ठसे
शरीरांत उठे बसे...
माझ्या अंगप्रत्यंगांत
मीही कांही तीही कांही
फक्त तिच्या मनामध्ये
मीही नाही तीही नाही...

सुनीता पुजार

## हें सोनचाफ्याचें फूल

" माझें तुझ्यावर... तुझें माझ्यावर... "
असें बोलूं नकोस ना कांहीबाही
हें हिवेंगार गवत बघ कसें निःशब्द पसरलें आहे
नको लाटा उठवूंस त्यावर
शीळ घालून

*

जीव तोडून भांडतांना तू फार उत्कट दिसतोस...
नुसत्याच चिरत जाणाऱ्या
तुझ्या एरवीच्या संथपणापेक्षा तें बरें—
निदान रक्तबंबाळ तरी होतां येतें !

*

अलिकडे अलिकडे निमित्तेंही नाहींशी
वारंवार नुसत्याच डोळेभेटी
कधी अबोल...कधी रुणझुणत्या...कधी रुसव्या...
असंख्य अर्थांच्या तुझ्या नजरा फसव्या.
कशाला हवा उगीच बोभाटा !
अंगावर असा सर्रकन काटा...

*

तुला कुठून मिळालें हें सोनचाफ्याचें फूल !
ही मी त्याच वळणावरून येत्येय—
साऱ्या झाडावर बोडक्या फांद्यांशिवाय
कांहींच तर नव्हतें...!

*

आपण निरोप घेतला तेव्हां
तू माझे हात ओठाजवळ नेलेस
सूर्य बुडत होता,
समुद्र हळूहळू केशरी होत गेला...
माझे हात परत मिळालेच नाहींत मला

*

माझ्या रक्ताला
वाहण्याचा मोह होत नसेल
असं वाटतं का तुला !
त्याचें हरवून गेलेलें लालपण
शोधण्यासाठी वाहायचें
तरी आतां शक्य नाही
इतक्या निस्त्राण झाल्या आहेत वाटा...

*

वादळ होऊन आलायस
पण उध्वस्त व्हायला माझें नगरच शिल्लक नाही...

*

तुझ्याकडे निघतांनाही फाटकाच होता पदर
आणि हेंही ठाऊक नव्हतें—तुला हात नाहींत

*

मलाही ठाऊक नव्हतें :
कांठावर बसून मी तुझेंच प्रतिबिंब शोधत होतें.
माझ्या आधी कांठावरच्या झाडांना हे कसें कळलें !

*

किती वळून पाहायचें नाही ठरवलें
तरी तुझ्या डोळ्यांत भरून आलेला समुद्र
माझ्यामागून उफाळत आलाच.
माझ्यामागून पुढे येऊन ठाकला.
तुला सांगायचें राहून गेलें—
मला इतक्यांत बुडायचें नव्हतें...

## दोन कविता : तुलसी परब

### शोकांतिका घडतांना

कावळा बसतो
नि फांदी मोडते
तसं एक हृदय थांबवतं
आपल्या कल्पनांची भरारी.

वास्तव केवढं कठोर असतं :
कावळा–फांदी–हृदय
एक नकळतचा त्रिकोण.

कशी वंशपरंपरा या त्रिकोणाची
शरण जातांना प्रत्येकदां उलटा—
कावळ्याच्या पंखाला,
हृदयाच्या डंखाला,
नि फांदीच्या लाल पिवळ्या विस्तवाला.

कशी महत्तम अनागोंदी
वास्तव नि फांदी
यांची डावीउजवी उलंघ्य नातीं.

शोकांतिका घडतांना कधीही
तात्कालिक रचनातत्त्वांचीच गर्दी
(आढळ तिचा सभोवार तरी
जमा डोळ्याला ओलावा नि डोळ्याचाच भार जरी)

असलं का म्हणून हें चित्र
नि बंडावाही आपला तसलाच विचित्र !
का म्हणून !
हें असलं.

## पृथीवी

पृथीवी
सपाट बसून
तिच्या चार लाकडां
पायावर आक्रसून

पक्षी
तिला खेंचून
आणावी समुद्रांतून
तशी
आणतो ती
भाकरीसारखी सोपी सहज
बर्फावर ठिक्कर काळी
अतिरिक्त लोभस
पडलेली,
पडत चाललेली.

शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय
दा. क्र. 8124
ग्रंथ शाखा स्थळ

---

**ऋचा** नव्या वाचकांसाठी खास सोय.

खालीलपैकी कोणत्याही ठिकाणी किमान दहा रुपये देणगी देऊन
'ऋचा' चे सर्व (दहा) अंक आपण मिळवू शकाल.

**अकोला** : श्री. पुरुषोत्तम बोरकर, अघोर वाडा, जयहिंद चौक, जुने शहर.
**डोंबिवली** : श्री. परेन जांभळे, ४ सिताबाई निवास, दीनदयाळ क्रॉस रोड.
**नागपूर** : श्री. अनिल दिगंबर कुलकर्णी, सेंट्रल बझार, नवी रामदास पेठ.
**नासिक** : श्रीं. प्रफुल्ल चौधरी, चौधरी बिल्डिंग, बोहरी लेन.
**पुणे** : सौ. सुप्रिया अत्रे, यशोधन, इंदिरा सोसायटी, एरंडवणे.
**बडोदे** : श्री. दिलीप घोलप, खंडेराव मार्केटसमोर.
**मुंबई** : १) श्री. सतीश काळसेकर, २८ शिशिर, बँक ऑफ बरोडा कॉलनी.
बामनवाडा, विलेपार्ले (पूर्व).
२) सौ. वासंती मुझुमदार, प्रसाद, ६९ रानडे रोड, दादर.
किंवा
**ठाणे** : १) ज्ञानविज्ञान प्रकाशन, सोनेरी, ३६ चरई.
२) श्री. म. पां. भावे, ४६ आनंदाश्रम कॉलनी, नौपाडा.

आपल्या नव्या कविता
किंवा काव्यविषयक लेखनही
'ऋचा'साठी हवे आहे.

## दोन कविता : तुलसी परब

### शोकांतिका घडतांना

कावळा बसतो
नि फांदी मोडते
तसं एक हृदय थांबवतं
आपल्या कल्पनांची भरारी.

वास्तव केवढं कठोर असतं :
कावळा–फांदी–हृदय
एक नकळतचा त्रिकोण.

कशी वंशपरंपरा या त्रिकोणाची
शरण जातांना प्रत्येकदां उलटा—
कावळ्याच्या पंखाला,
हृदयाच्या ढंखाला,
नि फांदीच्या लाल पिवळ्या विस्तवाला.

कशी महत्तम अनागोंदी
वास्तव नि फांदी
यांची डावीउजवीं उलंघ्य नातीं.

शोकांतिका घडतांना कधीही
तात्कालिक रचनातत्त्वांचीच गर्दी
(आढळ तिचा सभोवार तरी
जमा डोळ्याला ओलावा नि डोळ्याचाच भार जरी)

असलं का म्हणून हें चित्र
नि बंडावाही आपला तसलाच विचित्र !
का म्हणून ?
हें असलं.

## पृथीवी

पृथीवी
सपाट वसून
तिच्या चार लाकडां
पायावर आकसून

पक्षी
तिला खेंचून
आणावी समुद्रांतून
तशी
आणतो ती
भाकरीसारखी सोपी सहज
बर्फावर ठिक्कर काळी
अतिरिक्त लोभस
पडलेली,
पडत चाललेली.

---

**ऋचा** **नव्या वाचकांसाठी खास सोय.**

खालीलपैकी कोणत्याही ठिकाणी किमान दहा रुपये देणगी देऊन 'ऋचा' चे सर्व (दहा) अंक आपण मिळवू शकाल.

---

**अकोला** : श्री. पुरुषोत्तम बोरकर, अघोर वाडा, जयहिंद चौक, जुने शहर.
**डोंबिवली** : श्री. परेन जांभळे, ४ सिताबाई निवास, दीनदयाळ क्रॉस रोड.
**नागपूर** : श्री. अनिल दिगंबर कुलकर्णी, सेंट्रल बझार, नवी रामदास पेठ.
**नासिक** : श्री. प्रफुल्ल चौधरी, चौधरी बिल्डिंग, बोहरी लेन.
**पुणे** : सौ. सुप्रिया अत्रे, यशोधन, इंदिरा सोसायटी, एरंडवणे.
**बडोदे** : श्री. दिलीप घोलप, गंडेराव मार्केटसमोर.
**मुंबई** : १) श्री. सतीश काळसेकर, २८ शिशिर, बँक ऑफ बरोडा कॉलनी. बामनवाडा, विलेपार्ले (पूर्व).
२) सौ. वासंती मुझुमदार, प्रसाद, ६९ रानडे रोड, दादर.
किंवा
**ठाणे** : १) ज्ञानविज्ञान प्रकाशन, सोनेरी, ३६ चरई.
२) श्री. म. पां. भावे, ४६ आनंदाश्रम कॉलनी, नौपाडा.

---

**आपल्या नव्या कविता**
**किंवा काव्यविषयक लेख नही**
**'ऋचा' साठी हवे आहे.**

---

## 'ऋचा' विषयी थोडेसे

'ऋचा'च्या पूर्वसंकल्पित दहा अंकांपैकी हा शेवटचा अंक. अनेक नवे कवी, काव्यक्षेत्रातील व्यासंगी व्यक्ती व काव्यरसिक यांच्या साहाय्यामुळेच हे सर्व अंक प्रसिद्ध करणे शक्य झाले, हे कृतज्ञतापूर्वक नमूद करावेसे वाटतें.

'ऋचा'चा हा उपक्रम पुढे चालू ठेवावा असे काही जण अधूनमधून सुचवीत असतात. त्या दृष्टीने निरनिराळ्या प्रकारची मदतही अनेकांकडून मिळू लागली आहे. त्यामुळे दुसऱ्या वर्षीही 'ऋचा' चालू ठेवण्याचा निर्णय घेतला असून, 'ऋचा'च्या स्नेह्यांच्या मदतीने या वर्षी फिमान सहा अंक प्रसिद्ध करता येतील असा विश्वास वाटतो.

हे अंक प्रसिद्ध होताच नेहमी वाचकांकडे पाठविण्यात येतील. अंकांसाठी देणगीची अपेक्षाही अर्थातच आहे. अंक मिळू लागताच देणगी पाठवावी ही विनंती.

'ऋचा'चे काम करीत असतानाच हाती आलेल्या काही कवितांचे संग्रह लवकरच प्रकाशित करण्याचे योजिले असून, त्यांपैकी पहिल्या तीन संग्रहांची नावे याच अंकात इतरत्र प्रसिद्ध केली आहेत.

—संपादक-प्रकाशक

REFBK-0022364

REFBK-0022364

लघु-अ-नियतकालिक. अंक १०/१० : २५ जाने. ७७.
मुद्रक-प्रकाशक : सुशीला पानसे, ज्ञानविज्ञान प्रकाशन, सोनोरी, ३६ चरई, ठाणे ४०० ६०१. मुद्रणस्थळ : संगम प्रिंटिंग प्रेस, जुना मुंबई रस्ता, ठाणे ४०० ६०१.
संपादक : रमेश पानसे, सुनील कर्णिक.